# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

[ वर्ष ४२ ] आकोला:—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख ७ माहे सप्टेंबर सन १९०८ इसवी [ अंक ३४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
धाहेरगांवीं ट. हा. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचना:— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जा तील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या धटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल्दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A Phillips एजंट

नं ७३

### नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिशीनें खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं माझा मुलगा नामे रामचंद्र वल्लद तुकाराम हा असून तो वाईट चालीचा निघाल्यामुळें तो पैशाची उधळपट्टी करीत आहे. करितां त्याजला कोणीही कोणतेंच प्रकारचें कर्ज देऊं नये. व त्याचे जवळून कोणतीही स्थावर जंगम जिनगी गहाण खरेदी अगर बक्षीस घेऊं नये. अशा रीतीनें कोणी घेतल्यास त्याची जबाबदारी घेणाराचे शिरावर राहिल. खालीं सही करणार याजवर कोणतेही प्रकारचा बोजा राहणार नाहीं. व ती वर लिहिलेले आपले मुलाचे कोणतेही कृत्याबद्दल जबाबदार राहणार नाहीं. कळावें हा नोटीस ता. २९-८-१९०८ इसवी

सही

तुकाराम वल्लद बसवाजी पाटील वस्ती माक्त ता० खामगांव निशाणी

नं. घ. २८ हातची खुद्द

### नोटीस

गणेश वासुदेव निमकर राहणार अकोलें हल्लीं नाणत्ता यांस व सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं सदर्हू गणेश वासुदेव निमकर याजवर गोविंद अंताजी ब्राह्मण चितळे राहणार अकोलें यानें दावा नंबर २३ सन१९१८ चा तारीख १४-८-१९०८ रोजीं दाखल केला आहे व त्याच्या सुनावणीची तारीख २९ माहे सप्तेंबर सन १९०८ ची नेमली आहे. तरी त्या तारखेस त्यानें स्वत: अगर योग्य मुखत्यार अगर वकील मार्फत आमचे कोर्टांत सकाळीं १० वाजतां हजर व्हावें. त्याप्रमाणें न केल्यास कायद्या प्रमाणें व्यवस्था केली जाईल. तारीख २५ माहे आगस्ट सन १९०८ इ०

J. R. O'Grady
ऑडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज

नं. घ. २९ अकोलें.

### नोटीस

नोटीस बेशमी गंगाबाई जवजे मेहेरलाल मारवाडी ब्राह्मण राहणार सुनगांव तालुके जळगांव जिल्हा बुलडाण ईस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं माझी चुलती असून तूझा नवरा मेहेरलाल हा माझा चुलता मयत झाला. हल्लीं आपण सर्व एक कुटुंबांतील असून एकत्र आहों असें असून त्याचे पाठीमागें तूं मजला न विचारतां दुसरे लोकांचे नादी लागून पूर्वीचा मुखत्यार खंडेराव शंकर व ननुलाल दालचंदजी या उभयतांस कुलमुखत्यारपत्र दिलें आहेस मुखत्यारपत्र देण्याचा तूझा अधिकार नाहीं तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस मीच मालक आहे असें असतां विनाकारण माझें जीनगीची नासधुस करण्या करितां अल्प समजूतीनें सदहू ईसमांस मुखत्यारपत्र दिलें आहे तें मुखत्यारपत्र रद्द करावें. न केल्यास त्याजपासून जें नुकसान होईल त्याजबद्दल जबाबदार तुजला धरलें जाऊन दिवाणींत काम चालविणें भाग पडेल. कळावें. ता. २२-८-१९०८

सही

चुनीलाल मूळचंद दस्तूर खु:द

नं. घ.३०

### नोटीस

रा. रा. भाई काशिनाथ मंत्री दुकान मुंबई ठिकाणा काळकादेवि यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपले कडून नोटीस एका सॉलीसिटर मार्फत तारीख १२-९-०८ ची आली व दुसरी नोटीस एका वकीला मार्फतची ता० ३०-७-०८ ची आली आशा दोन्ही नोटीसा आह्मास पावल्या. सदर्हू दोन्ही नोटीशींत आपण लिहितां कीं तारीख ४-९-०८ इसवी रोजी वऱ्हाडसमाचार आकोला यांजकडून तुह्मी नोटीस दिली त्यांत आमचेवर अकळवेण्या करितां व आमची रक्कम बुडविण्याकारिता खोटी नोटीस दिली. ती नोटीस आमची नोटीस पावल्या दिवसापासून तीन दिवसाचे आंत परत प्रसिद्ध करून त्याच वऱ्हाडसमाचारानें आमची माफी मागून घ्या नाहीं तर आह्मी तुमचेवर फौजदारी करूं आणि आमची रक्कम तुमचेकडे घेणें आहे त्याजबद्दल फिर्याद करून खर्चासुद्धा तुमचे कडून घेऊं. त्यांस ठीक आहे परंतू आपणास आह्मी जी पूर्वीं तारीख ४-९-०८ इ. रोजीं वऱ्हाडसमाचार आकोला मार्फत नोटीस दिली ती फार बरोबर आहे व. आमचे आनामत आसलेले डागीने आपण पचवून घेण्या करितां आह्मास अशा धमकीच्या नोटीसा देतां अशा धमकानें आह्मी भिऊन आपणास डागीने पचूं देणार नाहीं. हें पूरें लक्षांत ठेवणें आणि तुमचा आमचा आडती संबधानें जे कांहीं सट्याचा बेपार झाला त्या सट्याचे बेपाराबद्दल आपण लिहितां कीं आमची रक्कम तुमचेकडे घेणें निघत आहे. परंतु आह्मी आपणांस तारीख ४-९-०८ इ. रोजींचे नोटीशींत लिहीले आहे कीं तुमचें आडतींत जवस, रुई, तेल, चांदी, एरंडी वगैरे मालाचा सवदा ह्मणजे सटा आह्मी केला त्यांत आमची रक्कम आपणाकडे बरेंच घेणें निघत आहे त्याजबद्दल हिशेब आपण समक्ष येऊन कबूल केल्याप्रमाणें एक महिन्याचें आंत करणें. त्यास आपण अद्याप हिशेब करण्या करितां येत नाहीं. आपणाकडे रक्कम घेणें आहे तीही पाठवित नाहीं. उलट या कुंभाडाच्या व बदनियतीच्या नोटीसा आह्मास देतां हें काम आपणास उचित नाहीं. आपण ज्या दोन्ही नोटीसा आह्मास दिल्या त्या आमचे आनामत ठेवलेले डागीणे पचाविण्याच्या हेतुनें व आमची रक्कम हिशोबा आन्वये आपणाकडे घेणें निघत आहे ती बुडविण्याचे हेतुनें दिले आहेत. त्यां दोन्ही नोटीसा अगदीं खोट्या आहेत. अशा नोटीसांची धमकी देण्यानें आपणास फार मुशकील पडेल. कारण आपण रस्ता सोडून गैर रस्त्यानें चालतां करितां आपणास पून: सदर्हू नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं हीं नोटीस पावल्या दिवसापासून ३ दिवसांचे आंत आमचे अनामत असलेले डागीणे तुमचेपाशीं आहेत ते पारसल करून टपाल मार्गानें पाठवून देणें व पंधरा दिवसांचे आंत येऊन हिशेब करून आमची रक्कम आपणाकडे आज तारीख पावेतों घेणें निघेल ती यावी. असें न केल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल. त्याचा खर्च जो होईल तो आपणास द्यावा लागेल. कळावे तारीख १ माहे सप्टेंबर सन १९०८

सही

बेगराज रामगोपाल मारवाडी दुकान देऊळगांवराजा तालुके चिखली जिल्हा बुलडाणा दस्तुर खु:द

नं. घ. ३१

### जाहिरात

सर्वत्र लोक रहाणार असलगांव तालुके जळगांव जि० बुलढाणें व इतरही ठिकाणे यांस:—

खालीं सह्या करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं आह्मां दोघा पैकीं रंभु याचे कडेस कोणाचेंही कर्ज नसून रावजी कडेस फक्त तोताराम शामरावचें थोडें कर्ज आहे. या शिवाय आह्मी कोणाचे कर्जदार नाहीं व आह्मी कोणाला जामीन नाहीं आह्मी कोणाला कोणत्याही रीतीनें कोणत्याही रकमेबद्दल जबाबदार नाहीं असें असतां आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं एका इसमानी आमच्या जामीनक्या आमचे मागें ६००।६०० रुपयास टाकून घेतल्या. आह्मी दोघांनीं किंवा आमच्या पैकीं कोणी ही एकानीं कोणा जवळून कांहीं कर्ज काढलें नाहीं किंवा आह्मी कोणालाही जामीन झालों नाहीं जर कोणाला आमच्यावर जामीनकी किंवा अन्य तऱ्हेनें कांहीं ह्मणणें असेल तर त्यांनीं एकदम कोर्टांत फिर्याद करावी. हल्लीं आह्मी देण्यास तयार आहों आह्माला लिहितां वाचतां किंवा सही मुद्रां करितां येत नाहीं. सबब कोणी आह्मास डुबविण्याकारतां हें काम केलें असावें. ज्याचा आमचेवर पैसा घेण्याचा हक्क असेल त्यांनीं आतां मुदतीची वाट न पहातां शाबित करून घ्यावा. पुढें मी किंवा माझे वारस जबाबदार रहाणार नाहीं. याची नक्कल विशेष माहिती साठीं खालील इसमास रजिस्टरनें दिली आहे. कळावें. तारीख २।९।०८ इ०

१ मोकदम पाटील व पटवारी असलगांव
१ टकर्डा वल्लद महादू वानखेडे असलगांव
१ मोहनलाल मारवाडी असलगांव
१ विठू वल्लद जानजी माळी असलगांव
१ बळीराम वल्लद सुर्यभान असलगांव
१ कादरखा मुसल्मान जळगांव.

सह्या

सहीची निशाणी रंभु वल्लद विठोबा याची असे.

सहीची निशाणी रावजी बोंद्रुजी नि० खु०

नं० घ. ३२

होतीलाल वर्मा यांजवर अलीगड येथें राजद्रोहाचा खटला होऊन त्यांस सात वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा देण्यांत आली होती. वैदिक आश्रम बोर्डिंग मधील मुलांस एक राजद्रोही हस्तपत्रक वाटल्याच्या आरोपावरून त्यांजवर अलीगड येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपुढें दुसरा खटला चालूं आहे त्यांचे बरोबर वैदिक बोर्डिंगचे सुपरिंटेंडंट रामस्वरूप यांनाही अरोपी करण्यांत आलें आहे.

बेझवाड्याचे डे. मॅजिस्ट्रेट यांनीं 'तेलगू स्वराज्य' पत्रावरील खटल्यांतील दोघा आरोपींवर इं. पि. को. १२४ अ १५३ अ व ५०५ प्रमाणें चार्ज ठेवून त्यांस सेशन कमिट केले. याच आरोपींवरील दुसरा खटला आजपासून सुरूं होणार आहे.

तिनिवेल्ली येथील दंग्यांतील आरोपींच्या पहिल्या तुकडीवरील खटल्याचा निकाल ता० २९ रोजीं तिसऱ्या प्रहरीं सांगण्यांत आला. कोर्टीत व कोर्टाच्या आजुबाजूच्या रस्त्यावर लोकांची अतिशय गर्दी जमली होती. आसि. पोलिस सुपरिन्टेन्डन्ट हे हत्यारबंद पोलिसच्या तुकडीसह हजर होते. आरोपीस पुढीलप्रमाणें शिक्षा फर्माविण्यांत आल्या:—गुरुनाथ अय्यर यांस सात वर्षे काळेपाणी, लोकनाथ अय्यर यांस पांच वर्षांची सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंड; शंकर नारायण पिले, रामलिंग पिले व शंकर अय्यर या त्रिवर्गांस प्रत्येकीं पांच वर्षांची सक्तमजुरी व पांच पांचशे रुपये दंड; अमीन कनकसमापति पिले व इतर आरोपी यांस प्रत्येकी पांच वर्षांची सक्तमजुरी; एका कलाध्यास एक वर्षाची सक्तमजुरी; याप्रमाणें शिक्षा देण्यांत आल्या. चार आरोपीस दोषमुक्त ह्मणून सोडून देण्यांत आलें.

म्हैसूर संस्थानांत वर्तमानपत्राचा नवा कायदा पास झाल्यामुळें म्हैसूर येथें देशी भाषेंत प्रसिद्ध होणारें 'भारत' नांवाचें दैनिक पत्र व 'वृत्तांत चिंतामणी' नांवाचें साप्ताहिक पत्र व आणखी चार वर्तमानपत्रें प्रसिद्ध होईनाशीं झालीं आहेत.

### नरेंद्र गोस्वामी याच्या खुनाची हकीगत

अलीपूर बाँबच्या खटल्यांतील माफीचा साक्षीदार नरेन्द्रनाथ गोस्वामी यास तुरुंगांतल्या तुरुंगांत गोळी घालून ठार कारण्यांत आलें. सविस्तर हकीगत पुढें दिल्या प्रमाणें आहे. ता० ३१ आगष्ट रोजीं सकाळी ७ वाजतां कॉन्विक्ट हवालदार हिगिन्स ( हा दहा वर्षांची शिक्षा भोगीत आहे ) ह्याला बरोबर देऊन गोस्वामीस दत्ताकडे इस्पितळांत रवाना करण्यांत आलें. आपण जवळ नसून ते एकटेच असतील तर दत्त उघडपणें बोलेल असें समजून हिगिन्स इस्पितळाच्या माडीवर जाऊन बसला. कांहीं वेळानंतर हिगिन्स यानें बार ऐकिला. गोस्वामीच्या एका सेकंदांत बचावासाठीं धांवला. हिगिन्सनें दत्ताशीं झगट केली व दत्तानें सोडलेली एक गोळी हिगिन्सच्या मनगटावर लागली, हिगिन्सला झटका देऊन दत्त निसटला व तो गोस्वामी याचा पाठलाग करीत खालीं गेला. इतक्यांत दुसऱ्या वार्डीतून सत्येंद्रनाथ बोस एक पिस्तुल हातीं घेऊन आला हे दोघेजण गोस्वामीवर गोळ्या झाडूं लागले. हॉस्पितळच्या बाहेर गोस्वामी जात असतां ते सारखा त्याचा पाठलाग करीत होते व गोळ्या झाडण्याचें कामही त्यांनीं सारखें चालूं ठेवलें होतें. जलरनें बोस याला धरिलें परंतु दत्तानें गोस्वामी याचा पाठलाग केला. पन्नास यार्डपर्यंत धांवत गेल्यावर खांद्यावर झालेल्या जखमेंतून वाहणाऱ्या रक्ताच्या पाटानें थकून जाऊन गोस्वामी खालीं पडला. बाजूच्या दारांतून बाहेर जाऊन जलर दत्ताला थांबविण्याकरितां आला परंतु दत्त यानें रिव्हाल्व्हर आपल्याकडे रोंखला आहे असें पाहून तो दाराच्या पाठीमागें गेला. इतक्यांत एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा भोगीत असलेला व हॉस्पिटलपासून कांहीं अंतरावर असलेल्या ऑफिसांत कामांत गुंतलेला लिटन नांवाचा एक युरोपियन वॉर्डर तेथें आला. तो धैर्यानें दत्तावर चाल करून गेला. दत्ताचें पिस्तुलाची नळी लिटनच्या कपाळास चाटून गेली व गोस्वामीपासून दोन फुटाच्या अंतरावर लिटन व दत्त ह्यांची झटपट सुरूं झाली. दत्त यानें लिटन ह्याच्या पेंचांतून आपली सुटका करून घेऊन गोस्वामीच्या पडलेल्या शरीरावर आपल्या पिस्तुलाचा दस्ता ठेविला व त्याच्यावर शेवटची गोळी झाडली. नंतर दत्त यानें आपलें रिकामें झालेलें पिस्तुल टाकून त्याला धरण्यास आलेल्यांच्या भिनुटपणें स्वाधीन झाला. खुनासंबंधाच्या आरोपाची चौकशी अलीपूरचे डिस्ट्रीक्ट म्यॉजिस्ट्रेट रा. रा. मार साहेब हे तुरुंगातच करित आहेत.

नरेंद्रनाथ गोस्वामी याचा खून कारणारापैकीं एक आरोपी कनय्यालाल दत्त यानें खूनासंबंधानें पुढील आशयाचा खुलासा केला आहे:— दोनच बंदुका होत्या. एका साक्षीदारानें सांगितल्याप्रमाणें तीन नव्हत्या. इंन्दिरानाथ नन्दी संबंधानें जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे तो सर्वस्वी खोटा आहे. गोस्वामीच्या खूनासंबंधानें त्याला कांहीं एक माहिती नाहीं. मी व सत्येन्द्र हे दोघेच त्याच्याबद्दल जबाबदार आहोंत. मीच गोस्वामीचा खून केला. त्याचें कारण सांगण्याची माझी इच्छा नाहीं. पण इतकी लपवालपव कशाला ? मी त्याचें कारण सांगतों. त्यानें आपल्या देशाशीं फितुरी केली ह्मणून मी त्याला ठार केलें. सत्येन्द्रनाथ बोस व कनय्यालाल यांच्यावरलि खटल्याची तारीख १४ सप्टेंबर ही नेमली आहे. अलीपूर सेंट्रल जेलमध्यें नरेन्द्राचा खून झाला, त्यासंबंधांत तुरुंगांत बंदुका कशा आल्या, हें तुरुंगावरील अधिकाऱ्यांना अद्याप गूढच आहे ( ता. १ ) रोजींच डि. मॅजिस्ट्रेट रा. रा. मार यांची चौकशी संपली- सत्येन्द्रनाथ बोस व कनय्यालाल दत्त या दोन्हा आरोपींना सेशन्स कमिट करण्यांत आलें. आपल्यापुढें आलेल्या पुराव्यावरून गुन्हाची जी हकीकत समजली ती मॅजिस्ट्रेटनी आपल्या हुकुमांत नमूद केली आहे.

## सुविचार समागम.

इंडियन रिव्ह्यूच्या ताज्या अंकांत मि. क्रेस्कील यांनीं 'हिंदुस्थानचें पुनरुज्जीवन' या अर्थाच्या मथाळ्याखालीं एक लेख लिहून, पक्षपातबुद्धीनें लिहिणाऱ्या अँग्लोइंडियन लेखकांच्या विचारांचें पुनरुज्जीवन केलें आहे. राष्ट्राच्या पडत्या काळांत त्याच्या स्वतःच्या परंरेंतील इष्ट भागांचा विकास करण्यावर भित ठेवल्यानें बरेंच फायदेशीर काम होईल हें ततहि त्यांना मान्य नसून, हिंदुस्थानच्या बाबतींत तर तसें केल्यानें प्रगतीला उलट विरोध होईल असें त्यांनीं प्रतीपादन केलें आहे. जातीभेदावर त्यांचा कटाक्ष आहे हें सगणें नकोच. आणि त्या अनिष्ट प्रकारामुळें सहकारित्वाच्या आधारावरील पद्धति येथें फलद्रूप व्हावयाच्या नाहींत, असें त्यांनें अपलें मत दिलें आहे. हिंदुस्थानाचा पौराणिक काळांतील इतिहास घ्या किंवा अलिकडच्या काळांतील स्वराज्याचा इतिहास घ्या, त्यांतून या मताचें खंडन करण्याला पुरेसा पुष्कळ पुरावा सांपडतो. असा पुरावा या मासिकाच्या याच अंकांत एका लेखामध्यें दिला आहे. 'हिंदुस्थानांतील प्राचीन स्थानिक स्वराज्याचें' स्वरुप लोकांपुढें मांडून मि. हयवदनराव यांनीं एक मोठी महत्वाची कामगिरी केली आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जाती स्थानिक स्वराज्याला बाधक नसून उलट्या पोषकच झालेल्या आहेत, त्यांची रचना नियमविरहित नसून अलिकडच्या लोकसत्ताक संस्थांच्या तत्वावर केलेली होती आणि जरी निरनिराळ्या जातींच्या निरनिराळ्या पंचाइती होत्या तरी एकंदर समाजाची ह्मणून एक पंचाईत असून तींत सर्व प्रमुख जातींच्या प्रतिनिधींचा समावेश होत असे, हें त्यांनीं दाखविलें आहे. पंचाइती हा आमच्या भारतीय समाजरचनेंतील एक महत्वाचा विशेष आहे आणि याच असाधारण प्रकारावरून भारत वर्षाला पंचायतींचें राष्ट्र असें नांव इतिहासकारांनीं दिलेलें आहे. बौद्धकालीन मागधी साम्राज्यांतील चंद्रगुप्त निर्मित नगरसंस्थांची ख्याती अजरामरच आहे. चंद्रगुप्ताच्या दरबारीं असलेल्या ग्रीक वकीलानें त्याचे राज्यांतील मोठमोठ्या शहरीं स्थापिलेल्या पडंगीत स्थानिक स्वराज्याचें वर्णन केलें आहे. मागधी साम्राज्याला समकालीन असणाऱ्या पांड्य व चोल या राज्यांत अशाच नमुन्याची स्थानिक स्वराज्यपद्धति होती आणि तिच्यामुळेंच केंद्रस्थानीं असलेल्या सत्तेला बळकटी मिळत होती. त्यानंतर सुमारें हजार वर्षांनीं कीर्तीच्या उच्च शिखरावर चमकत असलेल्या विजयनगरच्या साम्राज्यांतहि स्थानिक स्वराज्यांच्याच आधारावर सम्राट्सत्ता स्थिर होती आणि तेव्हांहि जातिभेदामुळें त्या अधाराला कमकुवतपणा आला नाहीं किंवा मुख्य सत्ता डळमळीत झाली नाहीं. जातिभेदाचें अनिष्ट स्वरुप बळेंच वारंवार पुढें ढकलण्यांत सद्धेतु नाहीं हें आमच्या राष्ट्राच्या परंपरेवरून सिद्ध होऊं शकतें.

हिंदुस्थान रिव्ह्यूमध्यें वरील वादाशीं संबंध असलेल्या एका मुद्याचा अंतर्भाव झालेला असा एक लेख आला आहे. ट्रान्सव्हालांत जाऊन राहिलेल्या हिंदी ब्रिटिश प्रजाजनांना तुच्छतेनें वागविण्यांत ट्रान्सव्हाल सरकार जो हट्ट धरीत आहे त्यांतील मर्म या लेखांत मि० रिच यांनीं जगापुढें मांडलें आहे. हिंदुस्थानांतील लोक जातिभेद पाळतात ह्मणून ते अडाणी, अशिक्षित असें वारंवार नाक चढवून प्रतिपादणाऱ्यांचे जातभाई ट्रान्सव्हालांत कसे वागत आहेत हें पहाण्यासारखें आहे. मि. रिच ह्मणतात ट्रान्सव्हालांतील सर्व तंट्याच्या मुळाशीं जातीचा प्रश्न आहे. आपण गोरे, आपण ही भूमी प्रथम शोधून काढून तेथें वसति केली, आतां काळ्यांनीं तेथें येऊं नये, या हटवादामुळेंच ट्रान्सव्हालांतील व एकंदर ब्रिटिश वसाहतींतील सर्व अरिष्ट उद्भवलें आहे. जातीभेदाविषयीं ज्यांच्या मनांत येवढीशीं देखील सहिष्णुता नाहीं, त्यांना स्वराज्याचे हक्क मात्र साम्राज्य सरकारांतून खुशाल मिळतात. मग ते हिंदुस्थानाला नाहीं ह्मणण्याचें कारण जातिभेद किंवा त्या विषयींची काल्पनिक असहिष्णुता नाहीं हें सिद्ध होत नाहीं काय ? दुसरें एक कारण हिंदी प्रजेला वसाहतींत न येऊं देण्याला आहे आणि तें फारच चमत्कारिक आहे. हिंदी प्रजा सुशिक्षित असून थोडीशी ज्ञाती आहे. त्यांच्या संगतीनें किंवा त्यांच्या उदाहरणानें ट्रॅन्सव्हालतील मुळचे लोक आपआपले हक्क स्थापित करूं लागेल तर कसें ? हा विचार या प्रकरणांत मोठ्याच महत्वाचा होऊन बसला आहे. प्रश्न अडचणीचा तर खराच. पण 'हांसत कर्म करावें भागावें रडत तेंचि परिणामीं' ही वाणी कधीं खोटी होईल काय ?

आशियांतील राष्ट्रें आज जरी निर्माल्यवत् दिसत असलीं किंवा तशीं आहेत असें भासविण्याचा दुष्ट प्रयत्न कोणी करीत असलें, तरी मूळचीं तीं तशीं नाहींत, आशियाखंड आपल्या निरानिराळ्या भागांत आढळून येणाऱ्या कांहीं साधारण बाबतींमुळें संयुक्त अशा स्वरूपांत नांदण्यास समर्थ असावें अशा प्रकारचा त्या राष्ट्राचा पूर्वेतिहास आहे आणि तशीच अभिमाननीय परंपराहि त्या खंडात दिसून येते, हें मि. मेथा यांनीं दाखविलें आहे. आसिरिया बाबिलन या पश्चिमेकडील राष्ट्रांचा व भारतवर्षाचा एकमेकांवर धर्मसंबंधीं कल्पना, शिल्पशास्त्र, ज्योतिषशास्त्र इत्यादि बाबतींत परिणाम झालेला आहे. मध्य व पूर्व आशिया यांचें एकीकरण करण्यास, पश्चिम आशियाला जसा महमदी धर्म तसा, बौद्धधर्म कारण झाला. बौद्धधर्मांतील तत्वज्ञानासंबंधी कल्पनाबरोबरच बऱ्याचशा व्यावहारिक कल्पना आणि संस्था चीन व जपान या राष्ट्रांत शिरल्या. बुशिडोचें साम्य रजपुतांच्या किंवा मराठ्यांच्या राष्ट्रधर्माशीं किती आहे हें पहाणारास या विधानाविषयीं शंका उरणार नाहीं. कलाकौशल्याचे बाबतींत भारतवर्षीतील कल्पनांचा प्रादुर्भाव आशियांतील बऱ्याच देशांत झाला असून तेथें त्या चिरस्थायी झाल्या आहेत. पराक्रमी भारतांच्या बौद्धिक तेजाचा परिणाम हिंदुस्थान, चीन व इराण या देशांवर पुष्कळसा झालेला दिसून येतो. पश्चिम आशियाच्या बऱ्याचशा भागावर आरबी तत्व-

ज्ञानाचा पगडा बसला, पण इराणांत या तत्वज्ञानाशीं वैदिक तत्वज्ञानाचा संयोग होऊन सुफीपंथ निर्माण झाला. आशियांतील मोंगल आणि तुर्की योध्यांच्या पुढें सातशें वर्षांपर्यंत सर्व युरोप खंड नमून राहिलेलें होतें. युरोपाची तेव्हां निकृष्टावस्था होती ह्मणून तेथें आशियाचें वर्चस्व बनलें हें जसें खरें आहे त्याचप्रमाणें पतित आशियाच्या पुनरुज्जीवनानंतर युरोपाला त्याचे पुढें हात टेकावे लागले हेंहि खरें आहे.

आपल्या देशांत वर्तमानपत्रांच्या वाचनाला वाजवीपेक्षां जास्त महत्व देण्यांत येतें अशी मि. दादाचानजी यांनीं तक्रार केली आहे. ती बऱ्याच अंशानें खरी असली तरी तसें होणें परिस्थित्यनुरुप अपरिहार्य आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ग्रंथांच्या वाचनानें विचार जसे परिपक्व होतात तसें वर्तमानपत्रांच्या लेखांनीं होत नाहींत हें अगदीं खरें आहे. पण पुस्तकें घेऊन तीं वाचण्याकडे निराळा वेळ व पैसा खर्च करण्यापेक्षां एकांत दोन कामें झाल्यास तें जास्त सोईचें होईल, हें उघड आहे. आजच्या स्थितींत केवळ तात्कालिक महत्वाच्या प्रकरणांत फारसा वाद घालीत बसण्यापेक्षां जेणेंकरून सुविचारांची जोड वाचकांना होईल असे लेख आपल्या वाचकांना पुरविणें आवश्यक आहे या विषयीं मतभेद होऊं शकणार नाहीं. चालू प्रकाराची माहीती व त्या बरोबरच सतत उपयुक्त होणाऱ्या विचारांचा संग्रह वाचकांस करून घेतां येईल तर त्यांचा वेळ आणि पैसा वांचून, जनतेवर मोठे उपकार होतील. ही जबाबदारी पत्रकर्त्यांनीं ओळखली पाहिजे. वाचकांकडे यांतील दोष कमी असून पत्रकर्तेंच जास्त प्रमाणानें दोषी ठरले पाहिजेत. सद्विचार ग्रंथांतून वाचले काय किंवा निराळ्या कागदावरून वाचले काय, ते सारख्याच महत्वाचे मानले गेले पाहिजेत; अक्षय्य महत्वाचे विचार कोणते आणि तात्पुत्या वादाकरितां पुढें आलेला भ्रामक कोटिक्रम कोणता यांचा वाचकांनीं विचार केला पाहिजे आणि लेखकांनींहीं त्यांना तसें वळण लावलें पाहिजे. असें झालें ह्मणजे वर्तमानपत्रांच्या वाचनाचा दुष्परिणाम होणार नाहीं.

जॉनकुंपनीच्या ' सत्यस्वरूपांतील एक एक हिडीस प्रकार उजेडांत येऊं लागला आहे. मागें एकदां कंपनीच्या अंमलांत हिंदुस्थानच्या व्यापाराला कसें मुसकें घालण्यांत आलें याची माहिती करून दिली आहे. तसाच आणखी एक मासला हिंदुस्थान रिव्यूंत प्रसिद्ध झाला आहे. जहांगीर बादशहाच्या दरबारीं प्रथम आलेला इंग्लिश वकील सर टामस रो हा व कंपनी यांमध्यें झालेला पत्रव्यवहार उपलब्ध झाला असून त्यावरून कंपनीच्या राजनीतीची चांगली माहिती होते. इकडे जेम्स राजा जहांगीराला पूर्ण स्नेहाचें व सलोख्याचें आश्वासन सर टॉमस रो बरोबर दिलेल्या पत्रांत देत असतां, हिंदुस्थानांत युद्ध उपस्थित करण्याचा विचार कंपनीनें कसा चालविला होता, दोघांच्या भांडणांत शिरून स्वार्थ साधण्याची कंपनीची टराविक शकल सर टॉमस रो याला कशी व कां पसंत नव्हती, कंपनीच्या लौकिकाकरितां फक्त समुद्रावरच व्यापार चालू ठेवण्याची सल्ला त्यानें कशी दिली वगैरे माहिती फारच महत्वाची आहे.

राजकीय आकांक्षांच्या विचारांत सर्व राष्ट्र गर्क असतां सामाजिक संस्कृतीकडे कोणीच मनापासून लक्ष देत नाहीं याचा मि० सुंदरम अय्यर यांना विषाद वाटत आहे, आणि तो रास्तच आहे. कारण सामाजिक सुधारणेचीं त्यांचीं तत्वेंच राजकीय चळवळींना पोषक अशीं आहेत. केवळ सुधारणा या नांवाकरितां सुधारणा पाहिजे ह्मणणाऱ्यां पैकीं ते नाहींत. राजकीय उन्नतीचे पूर्वी सामाजिक स्थितींत धेडाळी माजवा असें त्यांचें ह्मणणें नसून समाज शुद्ध व एकस्वरूप होण्याला आवश्यक प्रकारचा प्रेमभाव सर्वांत उत्पन्न व्हावा ह्मणूनच कांहीं दुष्परिणामकारक सामाजिक बंधनांचा पुनःविचार व्हावा येवढेंच त्यांचें ह्मणणें आहे.

# वऱ्हाडसमाचार

भाद्रपद शुद्ध ११ शके १८३०

## सरकार शेतकऱ्याकरितां काय करीत आहे!

### ( १ )

हा प्रश्न प्रत्येक विचारी हिंदी मनुष्याच्या मनांत अनेकदां उद्भवतो. किंबहुना हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीकडे लक्ष देतां या प्रश्नाला जास्त व्यापक स्वरुप येऊन ‘सरकार शेतकऱ्याकरितां काय करीत आहे’ याचें पर्यवसान वास्तविक ‘सरकार हिंदी राष्ट्राकरितां काय करीत आहे?’ या प्रश्नांत होतें. ह्या प्रश्नाला काय उत्तर मिळतें वरें? या प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. हिंदी शेतकऱ्यांच्या ज्या दोन मुख्य गरजा आहेत त्या त्यांची सांपत्तिक अर्थात् सामाजिक स्थिति सुधारणें आणि त्यांची औद्योगिक स्थिति सुधारणें या होत. समाजांतील एक घटकावयव या नात्यानें शेतकऱ्यांवर काय काय जबाबदारी असते आणि या दृष्टीनें हिंदी शेतकऱ्यांची जी निकृष्टावस्था झालेली आहे तिचीं कारणें काय आणि या निकृष्टावस्थेंतून त्याची उन्नति होण्याचे उपाय कोणते हा फार व्यापक प्रश्न आहे. या बाबतींत सरकारकडे आणि समाजाच्या पुढाऱ्यांकडे कोणती जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी ओळखून त्याप्रमाणें हे दोन पक्ष काम करीत आहेत किंवा नाहींत हाहि तितकाच व्यापक प्रश्न आहे. यापैकीं सरकारनें आपलें कर्तव्य बजाविलें किंवा नाहीं याचा खल आजपर्यंत अनेक वेळां झालेला असून दोन्ही बाजू जगापुढें मांडण्यात आलेल्या आहेत. परंतु हा तंटा मिटला नसून सध्यांच्या एकंदर परिस्थितींत हा तंटा अशा तऱ्हेनें मिटेल अशी आशाहि दिसत नाहीं. ‘सरकार शेतकऱ्या करितां काय करीत आहे’ या प्रश्नापैकीं सांपत्तिक बाजूचा असा निकाल लागला आहे. वास्तविक या प्रश्नांत हीच बाजू प्रधान असल्यामुळें तिचेंच असें भिजत घोंगडें पडल्यावर मुख्यतें तिच्यावरच अवलंबून राहणारी जी दुसरी बाजू तिचें योग्य उत्तर मिळण्याचा फारसा संभव नाहीं. शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्या संबंधाचे ह्मणून जे मार्ग समाजांतील पुढाऱ्यांनीं आणि सरकारनें पसंत केले आहेत त्यांत जवळ जवळ ३६ चा आंकडा आहे. शेतकऱ्यांचें हित करण्याकरितां ह्मणून ज्या मार्गाचें सरकार अवलंबन करीत आहे त्यांवर समाज पुढाऱ्यांचा विश्वास नाहीं एवढेंच नव्हे तर या मार्गापासून शेतकऱ्यांचें उलट नुकसान मात्र होत आहे असें त्यांचें मत आहे. अशा प्रकारें शेतकरी वर्गाचा सांपत्तिक आणि ह्मणूनच सामाजिक पाया डळमळीत असतां त्यांचा उद्योग चालणार कसा आणि त्यांची औद्योगिक स्थिति सुधारणा कशी? हा फार बिकट प्रश्न आहे. तथापि एका बाबतींत तरी सरकारचें आणि समाज पुढाऱ्यांचें एक मत झालेलें दिसत आहे. शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याच्या मार्गासंबंधानें त्यांचा कितीही मतभेद असला तरी शेतकीची स्थिति सुधारण्यासंबंधानें मात्र या दोन्ही पक्षांचें एक मत आहे. आतां शेतकऱ्यांची स्थिति सुधारल्या शिवाय शेतकीची स्थिति सुधारणें शक्य आहे कीं नाहीं हा प्रश्न शिल्लक राहतोच, आणि हा प्रश्न कसा अडला आहे हें वर सांगितलेंच आहे. तथापि शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यांत जरी सरकारचें आणि लोकांचें द्विधा मत असलें तरी शेतकीची स्थिति सुधारण्यासंबंधानें द्विधा मत नाहीं, तेव्हां या सुधारणेच्या बाबतींत तरी लोकांनीं सरकारला मदत करावी असें सरकारचें ह्मणणें आहे. ह्मणून शेतकीची स्थिति सुधारण्याकरितां सरकार काय करीत आहे आणि त्यापासून हिंदुस्थानांतील शेतकऱ्याला जरी नव्हे तरी—शेतकीला कितपत फायदा होण्याचा संभव आहे हें पाहणें इष्ट आहे. ह्मणून हिंदुस्थान सरकारच्या ‘बादशाही शेतकी खात्या’चा १९०५–०६ व १९०६–०७ या सालांचा जो एक अहवाल प्रसिद्ध झाला त्याचें पर्यालोचन आजच्या लेखांत करण्याचा विचार आहे.

प्रसंगानुसार मधून मधून आमच्या सरकारला शेतकीची सुधारणा करण्याची आठवण होत असते. सन १८६१ सालीं अमेरिकेंत झालेल्या यादवी युद्धापर्यंत आमचें सरकार शेतकीच्या बाबतींत स्वस्थ घोरत होतें. परंतु या सालीं अमेरिकेंत सर्वत्र यादवी युद्धाची गडबड चाललेली असल्या कारणानें कपाशीची मुळींच लागवड झाली नाहीं, त्यामुळें कपाशीचे भाव अतोनात चढले, लंकेशायर मधील गिरणीवाल्यांना कापूस मिळेनासा होऊन त्यांचा धंदा बसला, बहुतेक गिरण्या बंद करण्याची पाळी आली, हजारो इंग्रज मजूर अन्नान्न करीत हिंडू लागले आणि सर्व इंग्लंडभर हाहाकार उडाला. कापूस कोठून मिळेल हा सर्वांना प्रश्न पडला. त्यावेळीं इजीप्त देशांत कपाशीचा पैदास करीत नसल्याकारणानें अमेरिकेशिवाय कापसाचा पुरवठा करणारा असा दुसरा देश ह्मटला ह्मणजे हिंदुस्थानच! तेव्हां ही स्थिति पाहून आमचें सरकार खडबडून जागें झालें. हिंदुस्थानांत शक्य तितकी कापसाची निपज करण्याचें ठरून तेवढ्या करितां एक कापूस खातें उघडण्यांत आलें. या खात्यामार्फत कपाशीचे प्रयोग सुरू होऊन ज्यांनीं कधीं कपाशीचें झाडही पाहिलें नसेल अशा कित्येक विद्वान् इंग्रज ‘माळ्यांचे’ खेऱ्यावारी पगार सुरू झाले. हजारों टन सरकी परदेशांतून आणून तिची सशास्त्र लागवड या माळ्यांनीं सुरू केली. या खात्याकरितां दरसाल बजेटांत लाखों रुपयांच्या रकमा मंजूर होऊं लागल्या. असा एकंदरींत थाट उडून गेला.

परंतु थोड्याच दिवसांत हें खातें निजधामास गेलें. इंग्लंडांतून आणलेले शास्त्रज्ञ माळी आपली शिकस्त करीत होते परंतु हिंदुस्थानचीं शेतें फार हट्टी. तीं कांहीं केल्या पिकेनातच! लक्षावधी रुपये खर्च होऊनहि हिंदुस्थानांत कापसाची जास्त पैदास होण्याचीं चिन्हें या माळ्यांना दिसेनात. तिकडे अमेरिकेंतील युद्ध या सुमारास संपून कापसाची लागवड पूर्ववत् सुरू झाली. अर्थातच ‘गरज सरो आणि वैद्य मरो’ या न्यायानें लँकेशायरच्या गिरणीवाल्यांनाहि हिंदुस्थानची फारशी पर्वा राहिली नाहीं. मग आमच्या सरकारला तरी शेतकीची सुधारणा करून काय करावयाचें होतें? त्या विद्वान् माळ्यांना स्वदेशी बोळवून सरकारनें तेव्हां जी गाढ झोंप घेतली; सहा सात वर्षें झालीं, पुनः एक दोन कारणें उपस्थित झाल्यामुळें तें जागें झालें आहे!

पांच वर्षांपूर्वीं मि. फेल्पस् या नांवाचे एक अमेरिकन गृहस्थ हिंदुस्थान पहाण्यास आले होते. इकडे बहुतेकांचा धंदा शेतकीचाच असतां शेतकी संबंधानें सरकारची विलक्षण अनास्था पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें. इंग्लंडमध्यें शेतकी हा एक दुय्यम प्रतीचा धंदा आहे. असें असतांहि शेतकीच्या सुधरणेकरितां इंग्लंडांत जितके पैसे खर्च होतात तितके देखील पैसे जेथें शेतकी हा बहुतेकांचा धंदा आहे अशा इंग्लंडच्या तेरापट मोठ्या देशांत हिंदुस्थान सरकार खर्च करीत नाहीं याचें कारण काय असावें असें त्यांना मोठें गूढ पडलें. लोकांच्या फायद्याची गोष्ट करण्याचा कधीं प्रसंग आला असतां आमच्या सरकारची एक कायम ठशाची अडचण पुढें येत असते. ती कोणाती तर पैशाची! सरहद्दीवरील युद्धांकरितां किंवा दिल्लीदरबार सारख्या नाच तमाशा करितां खर्च करण्यास ज्या सरकारा जवळ कोट्यावधी रुपये असतात त्या सरकारा जवळ शेतकीच्या सुधारणेकरतां पैसा सांपडूं नये यांत नवल तें काय? परंतु फेल्पस् साहेबांना या एकंदर स्थितीबद्दल फार वाईट वाटून त्यांनीं हिंदुस्थानच्या शेतकीच्या सुधारणेकरितां आपल्या पदरचे २५००० पौंड सरकारच्या स्वाधीन

केले ! सर्व जगांत 'सुधारलेले' ह्मणून नावाजलेल्या आमच्या इंग्रज सरकारला हिंदुस्थानची शेती सुधारण्याकरितां एका अमेरिकन गृहस्थानें देणगी दिलेली पाहून फार शरम वाटली, आणि या एकंदर प्रकारामुळें आपली सवाटाखाची झांकली मूठ भर जगांत उघडी झालेली पाहून फार वाईट वाटलें ! याची भरपाई करण्या करितां एक भलें जंगी शेतकी खातें अगदीं नव्या सुधारलेल्या धर्तीवर काढण्याचें ठरलें ! अशा प्रकारें यक्षिणीची कांडी फिरल्यावर मग काय विचारतां सर्वत्र एकच गडबड उडाली. प्रांतानिहाय शेतकी खातें, त्याचे डिरेक्टर, डेप्युटी डिरेक्टर इ० तयार होऊन त्यांच्याहून वरिष्ट असें बादशाही शेतकी खातें बनविण्यांत आलें. बंगाल्यांत पुसा एथें १३०० एकर जमीन घेऊन तेथें एक मोठें थोरलें संशोधन गृह आणि प्रयोग क्षेत्र करण्याचें ठरलें. या संस्थेकरितां जाड्या जाड्या पगारावर विलायतेंतून बादशाही तज्ञ Imperial Expert आणिलें. प्रांतानिहाय शेतकीचीं विद्यापीठें निघालीं. अशा प्रकारें या बादशाही शेतकी खात्याचें काम जारीनें सुरू झालें. त्याला आज तीन वर्षें झालीं.

## स्टेड साहेबांचें सर्टिफिकेट.

तुर्कस्थानानें कॉन्स्टिट्यूशन मिळविलेलीं पाहून रिव्हू ऑफ रिव्हूजचे संपादक मि० स्टेड यांना हिंदुस्थानची आठवण झाली असून, त्यांतच रा० टिळक यांना झालेल्या 'अमानुष' शिक्षेच्या बातमीची भर पडल्यामुळें, त्यांचें लक्ष सर्व जगांत शांतता राखण्याच्या भगीरथ प्रयत्नांकडून थोडेसें हतभागी हिंदुस्थानाकडे वळलें आहे. सर्व जगाची शांतता भंग पावण्याचें मुख्य केंद्र हिंदुस्थान आहे हें सर्व राजनिती विशारदांना अवगत असतां, मि. स्टेड सारख्या 'विभूतींचें' लक्ष या देशाकडे अवश्य तितकें राहूं नये हें अगदींच चमत्कारिक आहे. जगांत शांतता नांदली पाहिजे ह्मणून दुसऱ्या भोळ्याबापड्या राष्ट्रांना शस्त्रास्त्रांची तयारी बंद करावयाचा कोरडा उपदेश करणाऱ्या इंग्लंडांतलेच मि. स्टेड हे रहिवासी आहेत, हें कसें विसरतां येईल ? तरी पण तुर्कस्थानानें सनदशीर राज्यपद्धति आपल्या राजाकडून चालूं करविली तशीच ती हिंदुस्थानांतहि चालूं करणें योग्य आहे असें सर्टिफिकेट मि. स्टेड यांनीं दिलें आहे, हें कांहीं थोडें नाहीं. वास्तविक पहातां या सर्टिफिकेटाचा उपयोगहि जितक्यापुरता तितकाच आहे. रक्तस्त्रावविरहित क्रांति होऊं शकते हा अनुभव तुर्कस्थानानें आणून दिला आहे. आपल्याला जें कांहीं करावयाचें तें कायदेशीर मार्गानें करावयाचें असा हिंदुस्थानांतील लोकांचाहि कृतनिश्चय आहे. पण मग तुर्कस्थानांतील लोकांची इच्छा फलद्रूप कां झाली आणि हिंदुस्थानांतील लोकांची इच्छा सफळ कां होत नाहीं, असा प्रश्न उद्भवतोच. आह्माला या प्रश्नाचें स्पष्टीकरण येवढेंच दिसतें कीं हिंदुस्थानांतील लोकांनीं आपल्याला काय पाहिजे हेंच अद्याप निश्चित केलेलें नाहीं, मग तें जाहिर करण्याची गोष्ट तर दूरच राहिली. हिंदुस्थानाला सनदशीर राज्यपद्धति पाहिजे असें कांहीं विचारी आणि समंजस लोकांचें ह्मणणें आहे; पण ही इच्छा जर सर्वथा इष्ट असेल तर ती ते आपआपल्याच जवळ कां ठेवतात ? आपल्या अडाणी आणि अशिक्षित बांधवांस कां सांगत नाहींत ? त्यांनीं तसें केलें असेल तर त्याचा परिणाम व्हावा तसा झालेला नसल्यामुळें त्या उद्योगाला लागून तो पुरा केला पाहिजे. तीस कोटि हिंदी प्रजेची इच्छा एकवटल्यानंतर सनदशीर राज्यपद्धति हिंदुस्थानांत सुरू करण्याचें सरकारच्या मनांत नसलें तरी तसें कायद्याच्या रूपानें घडून येईल. प्रयत्नांतीं परमेश्वर ! पण आह्मी पहिलें पदच विसरतों, तेथें परमेश्वरानें तरी काय करावें ? आणि आमचा सर्वांचा निश्चयच जोंपर्यंत झालेला नाहीं तेथें मि. स्टेड सारख्यांच्या सर्टिफिकेटांचा तरी काय उपयोग ?

## चिरायु होवोत

राजश्री दादाभाई नवरोजी यांस गेल्या शुक्रवारीं ८९ वर्षें लागलें. ईश्वर कृपेनें त्यांच्या देखतच प्रस्तुतचे ढग नाहींतसे होऊन लवकरच त्यांच्या या प्रिय देशाला सोन्याचे दिवस येवोत. मुंबईचे गव्हरनर सर क्लार्क अशाच रितीनें त्यांचें अभिनंदन करितात आणि सर्व इंडिया परमेश्वरापाशीं हीच प्रार्थना करीत आहे.

## √ सुळ सुळाट

पोलिसांचा डिटेक्टीव्ह कोठें व कोण असेल याचा नेमच नाहीं. कदाचित् उजवा डोळा एका सार्वजनिक पक्षाकडे असून डावा डोळा पोलिसचा गुप्त हेर असेल असाहि संशय ज्याचा त्यालाच येण्या इतकी विलक्षण स्थिती होत चालली आहे ! ही देखरेख अभिनंदनीय होय. पैशाला ही जहाल आडनांवी मंडळी फार लवकर वश होतात असें ह्मणतात.

## √ निर्बंध

गुन्ह्याबद्दल शिक्षा करणें हें निराळें आणि गुन्हा होण्याच्या वाटाच बंद करणें हें दुसरें. सरकारच्या दृष्टीनें या दुसऱ्या प्रकारच्या उपायांचा जितका स्वीकार व्हावयाला पाहिजे तितका तो होत नाहीं ही गोष्ट हल्लीं चालूं असलेल्या राजद्रोहाच्या खटल्यावरून चांगली ध्यानांत येते. जें वाक्स्वातंत्र्य किंवा लेखनस्वातंत्र्य इतकें संकटमय व अडचणींचें आहे तें तसलें स्वातंत्र्य अनुभवण्याच्या सुखपेक्षां तत्संबंधी दुःखाचा डोंगर फारच विस्तीर्ण पसरलेला आहे. जेव्हां राष्ट्रांतील चांगले चांगले लोक कायद्यानें राजद्रोही ठरतात. व काळेपाण्याच्या शिक्षा भोगण्यासाठीं एकामागून एक असे भराभर पाठविले जात आहेत तेव्हां तो कायदाच दुष्ट व चुकीचा झाला आहे असें ह्मटलें पाहिजे. जर महाराष्ट्राचे राजश्री टिळक किंवा मद्रासचे राजश्री सुब्रह्मण्य अय्यर हे राजद्रोही ठरतात तर राजनिष्ठेचें कडकडीत व्रत कोणालाच पाळतां येत नाहीं असें ह्मटलें पाहिजे; आह्माला तर अलिकडे असें वाटूं लागलें आहे कीं जें वर्तमानपत्र सरकारला आवडत नाहीं तें सरकारनें बंद करावें. हा निर्बंध कांहीं विवक्षित कालापर्यंत अंमलांत आणावा. लेखांची कांहीं नियमित संख्या राजद्रोहात्मक वाटली तर असा निर्बंध देण्यांत यावा. अशा रितीनें लोकांच्या आपदा व हाल अपेक्षा टळतील आणि सरकार हल्लीं इतकें अप्रिय न होतां प्रस्तुतचा असंतोष उत्पन्न होणार नाहीं. आह्माला राजद्रोहाच्या खटल्यांच्या धामधुमी लढायांच्या बातम्याप्रमाणें महत्वाच्या झाल्या आहेत आणि जणूं काय, सरकार व प्रजायांच्या मध्यें लढाईच नवी जुंपली आहे असें दिसतें.

## √ सद्वर्तन

राजद्रोहाच्या गुन्ह्यांचा प्रतिबंध करण्यासाठीं कायद्यानें दुसरी एक योजना करून ठेविलेली आहे. जे कोणी असला गुन्हा करण्याला प्रवृत्त आहेत असें जिल्हा माजिस्ट्रेटास वाटतें त्यांच्या कडून एक वर्ष मुदतीपर्यंत योग्य जामीन घेण्यांत यावे असा नियम क्रिमिनल प्रोसिजरांत १८९८ सालींच घालण्यांत आला आहे. या नियमाच्या आधारें बुलढाण्याचे जिल्हा माजिस्ट्रेट मेजर कोलंब साहेब यांनीं खामगांवचे गृहस्थ रा० रा० पन्नालाल व्यास यांजवर नोटीस काढली आहे. दोन हजार रुपयांचा जातमुचलका व प्रत्येकी २ हजार रुपयांच्या लायकीचे तीन जमीनदार जामीन तुह्मांकडून कां घेऊं नयेत याचीं कारणें दाखविण्यासाठीं ता० १० सप्टेंबर रोजीं बुलढाण्यास हजर होण्याविषयीं समन्स निघालें आहे. या समन्साचें कारण असें कीं खामगांवास 'प्रताप वाचनालय' नांवाची लायब्ररी आहे. तिचा वार्षिक समारंभ गेल्या १९ जुलै रोजीं झाला. राजश्री टिळक यांच्या वाढदिवसाच्या संस्मरणार्थच ही संस्था स्थापिलेली आहे. आणि ह्मणूनच त्याच मंगल दिवसाच्या निमित्तानें हा समारंभ करण्यांत आला. यावेळीं राजश्री व्यास यांचें संभाषण झालें. त्या भाषणांत राजद्रोहात्मक विधानें आहेत असा पोलिसाकडून रिपोर्ट गेला तेव्हां अशी नोटीस काढणें भाग झालें. या रिपोर्टावरून त्या विधानांचा ओघ असा दिसतो कीं रा० टिळक १८५६ त जन्मले ही गोष्ट त्याच्या पुढील सालीं जें भयंकर बंड झालें त्याच्यामुळें ध्यानांत राहील. रा० टिळक यांनीं सांगितलेलीं तत्वें ह्मणजे स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य हीं लक्षात बाळगा. एक दिवस मरावें लागतेंच तेव्हां मरणाचीही पर्वा न करितां हीं तत्वें अंमलांत आणण्यास हटूं नका. गाझिनी व गारिबाल्डी यांनीं इटली देश स्वतंत्र केला. शिवाजीनें मुसलमानांच्या हातून इंडिया मुक्त केला. रा० टिळक, खापर्डे हे देवाचे अवतार आहेत. त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें वागा ह्मणजे गोऱ्या लोकांसही हांकलून देता येईल. माझिनीचें उदाहरण पुढें ठेवा. रशियन लोक झारबरोबर भांडले आणि त्यांनीं डूमा ही संस्था संपादली. या रशियन पद्धतीनें आपल्याहि देशाला स्वराज्य मिळेल.

अशा तात्पर्याच्या वाक्यांनीं राजश्री व्यास यांनीं सभेला संबोधलें असेल तर मेजर कोलम्ब यांनीं सद्वर्तनाबद्दल जामीन मागितला हा यांचा चांगूलपणाच होय. या प्रकरणांत खामगांवच्या कांहीं नेमस्त वकील मंडळीच्या साक्षी व्हावयाच्या आहेत. खुद्द सभेचे अध्यक्ष रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होते. आणि ते इतक्या नेमस्त विचारांचे पुढारी आहेत कीं सभांमधून असल्या भाषणास ते अवसर देतील असें आह्मांस निदान वाटत नाहीं. चौकशी येत्या गुरुवारीं होणार आहे तेव्हां आह्मी विशेष लिहूं इच्छित नाहीं. फक्त अशा प्रकरणांत खऱ्या रिपोर्टाचीच मोठी अपेक्षा आहे.

## टवाळकी

हल्लींच्या जहाल वातावरणांत सभ्याचार शिष्ट संप्रदाय, परस्पर सद्भाव इत्यादिकांस तिलांजली देण्यांत आलेली दृष्टीस पडते. पोरवडा फार बोकाळला आहे. आणि अत्याचाराला अपर्यायानें चांगल्या जहाल लोकांच्या आक्षेपार्ह, धिक्कारदर्शक व तृणीभूत करणाऱ्या भाषणांच्या शिक्षणानें उत्तेजन मिळूं लागलें आहे. नवीन पिढीशीं वागतांना वडील पिढीनें आपला मान राहून तिला सद्बोध मिळेल असें वागलें पाहिजे. नाहीं तर, अलिकडे कांहीं त्याज्य मूर्ती देव्हाऱ्यांत बसूं लागल्या आहेत. ही गोष्ट योग्य वेळींच टाळली पाहिजे. राजश्री टिळक उत्तम शिक्षक असून त्यांच्या विषयीं ज्या सद्गुणांमुळें त्यांच्या ठायीं उत्कृष्ट पूज्यभाव जागृत आहे त्या सद्गुणांची राखरांगोळी त्यांच्या भक्ताकडून न होईल अशी खबरदारी घेणें जरूर झाले आहे. एक नवीनच टवाळकी उजेडांत आली आहे. आमच्या नगरांतील परमपूज्य गुरुवर्य राजश्री आण्णा साहेब महाजनी यांस धमकीचें व जीव घेण्याच्या दहशतीचें एक चांडाळदृष्टीचें पत्र नुकतेंच आलें आहे. हें पत्र फाडण्या लायकच आहे पण असा विचार जहाल वातावरणांत निपजला नाहीं तर त्याचें उत्पत्ति स्थान तरी कोणी सांगेल तर लोकांवर त्याचे उपकार होतील.

# वऱ्हाडवृत्त.

हवामान:— पावसाचा कंटाळा आला असून प्रस्तुत पूर्वे कडून जो पाऊस येतो तो मोठ्या जोरानें झोडतो. एकंदर पाणी ३० इंच पडलें. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं

लागू केला— १९०८ ~ मुदतीचा कायदा वऱ्हाडास लागू केला असून त्या अन्वयें गहाणाच्या फिर्यादीस बारा वर्षांची मुदत संपली असल्यास अधीक दोन वर्षांचा काळ मिळाला आहे.

## नोटीस

नोटीस वेशमी खंडेराव शंकर कुलकर्णी रा. सुनगांव ता. जळगांव जि. बुल्डाणा यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मेहेरलाल चुनीलाल या दुकानचे मेहेरलाल व चुनीलाल. असे आम्ही दोघे मालक आहों. व आम्ही समाइकचे कुटुंबांत आहोंत. मेहेरलाल हा माझा चुलता होता तो हल्ली मयत झाला आहे. सबब दुकानचा मालक मी एकटाच राहिलो आहे. मेहेरलाल हा वडील असले मुळें तुह्मास त्याचे मर्जीनें मुकत्यारपत्र दिलें होतें तो मयत झाला आहे. यापुढें तुह्मास नौकर ठेवण्याची इच्छा नाहीं. ह्मणून तुह्मी फंदफितूर करून आमचे जिंनगीची आफरातफर करण्याचे तुमचे मनांत आहे. व त्या करितां आमची चुलती गंगाबाई जवजे मेहेरलालजी इजला फितूर देऊन तीचे जवळून मुकत्यारपत्र घेतलें आहे. हें गैर आहे व बेकायदेशीर आहे. तुह्मास त्या मुकत्यारपत्रावरून आमचे जिंनगी-संबंधानें अगर मेहेरलाल चुनीलाल या दुकानचे जिनसीसंबंधानें अगर दुकान तर्फे कांहींच कामकारभार करण्याचा अधिकार नाहीं. गंगाबाई इजला मुकत्यारपत्र देण्याचा कांहीं अधिकार नाहीं ती फक्त अन्न वस्त्राची मालकीण आहे. तीनें दुकानतर्फे मुकत्यार-पत्र दिलें असल्यास तें रद्द असें. तुमची आमची तक्रार होऊन तुह्मास नोकरींतून काढले आहे. तुमचे जवळ आमचे दुकान संबंधीं जे कांहीं कागद पत्र व हिशोबी संबंधानें हुकुमनामे दरखास्ती वगैरे व पैसे आपले अगर दुसरें कांहीं असल्यास आमचे स्वाधीन करून आमची पावती घ्यावी. त्या प्रमाणें कचेरीचे कामाकरितां कोण्या कागदावर मेहेरलालच्या व माझ्या सह्या घेऊन तुह्मी कागद नेले आहेत तें सह्यांचे कागद वापस करावे. तुह्मास त्या सह्यांचे कागदा पक्त अजें वगैरे करण्याचें कारण नाहीं. जर तुह्मी त्या सही केलेल्या काग दाचा भलतेच कामाकडेस उपयोग कराल अगर कांहीं भलते लिहाल तर रीती-प्रमाणें तजवीज केली जाईल. व आमची चुलती गंगाबाई ईस फूस लाऊन कांहीं कागद पत्र व लेख करून अगर दागदागीनें घेतल्यास तुमच्यावर फौजदारी काम चालवूं. कळावें. ता. २२।८।०८ इ०

सही

चुनीलाल मुळचंद द. खु.

नं. घ. २४

## नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मेहेर लाल चुनीलाल या नांवचें दुकान कसबे सुनगांव तालुके जळगांव येथें असून मेहेरलाल हा माझा चुलता मयत झाल्या-वरून त्याची बायको ह्मणजे माझी चुलती गंगाबाई हिनें तिचा जांवई नेनू-लाल दालचंद रहाणार हुसंगाबाद व खंडेराव शंकर राहणार सुनगांव तालुके जळगांव या उभयतांस कुळ मुखत्यारपत्र दिलें आहे. खरोखर माझी चुलती ही अन्नवस्त्राची मालकीण आहे तिजला मुख-त्यारपत्र देण्याचा अधिकार नाहीं. सबब कळविण्यांत येतें कीं सदर्हू मुखत्यार यास आमचे दुकानासंबंधीं आपसांत तोडजोड करून वसूल देऊं नये. व पावती घेऊं नये व कोणत्या प्रकारें व्यवहार करूं नये केल्यास पुढें कोणतेच सबब ऐकिली जाणार नाहीं, शिवाय इसमावें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. कळावें. तारीख २२ माहे ऑगष्ट सन १९०८ इ०

सही

चुनीलाल मुळचंद द० खुद.

नं. घ २५

## नोटीस

नोटीस वेशमी नेनूलाल दालचंदजी साहू दुकान हुसंगाबाद यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मेहेरलाल चुनीलाल या नांवचें सुनगांव येथें आमचे दुकान असून हल्लीं मेहेरलाल मयत झाल्यामुळें त्या दुकानचा मालक एकटा मीच आहे. माझी चुलती गंगाबाई जवजे मेहेरलाल फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. असें असून तुह्मी तिच्या जवळून कुळमुखत्यार पत्र घेतलें आहे. हें बरोबर व कायदेशीर नाहीं. सबब या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं सदर्हू मुखत्यार पत्रावरून तुह्मी आमच्या असाम्यापासून वसूल घेऊन पावती देऊं नये. अगर आपसांत तडजोड करूं नये. व दुकानासंबंधीं कोणतीएक देवघेव करूं नये. केल्यास त्याची जबाबदारी आमच्यावर नसून तुमच्यावर आहे. तुमचें मुखत्यार पत्र रद्द केलें आहे. कळावें ता. २२-८-१९०८ इ.

सही

चुनीलाल मुळचंद द. खुद

नं. घ. २६ रा. सुनगांव

## नोटीस

नोटीस वेशमी (१) चंद्रभागाबाई जवजे नारायणराव आणि (२) सारजाबाई जवजे नारायणराव देशमूख उभयतां राहणार पातूर शेखबाबू यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं गुणवंताबाई जवजे सोनाजी देशमूख पाटलीण ही १९-९-०७ इ० रोजीं मरण पावल्या कारणानें मी सोनाजीचा वारस ह्मणून मला सरकारानें पाटील नेमिलें आहे. सोनाजी देशमूख याची सर्व स्थावर जंगम जिनगी तुह्मी बळातकारानें गुणवंताबाईचे मरणानंतर सर्व आटपून बसला आहां. तुमचा त्या जिनगीवर कोणत्याच प्रकारचा हक्क-संबंध नाहीं. आणि ती जिनगी हल्लीं विकून टाकून सर्व जिनगीची वाताहात कर-ण्याच्या बेतांत तुह्मी आहां असें कळलें. तुह्माला जिनगी विकण्याचा अधिकार नाहीं. तुमच्या खरेदीचा गहाणाचा किंवा दुसरा कोणताही व्यवहार जिनगीला बांधू शकणार नाहीं. कळावें ता. ३०-८-१९०८ इ.

सही

लक्ष्मण डोंगरसींग देशमूख पाटील रा. पातूर हल्लीं वस्ती सैतांग द. खुद

नं. घ. २७

आमचे ... लोकांना ...



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुह्मी कृपा करून पाठ विलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत (रु. १०८) फारच कमी ठेवलेली आहे. कळा. विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप रायी (ग्वालेर) | श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून

पी. सी. जोगळेकर

आणि कंपनी

म्या. एजंटस्

नं. १३

नवे सराय परोपरी

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आमचे येवले येथें तयार होणारे पितां-बर पैठण्या व खण वगैरे माल बाहेर-गांवी पाठवित असतो माल खात्रीबंद मा-फक दरानें व योग्य पद्धतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जा-ईल माल स्वस्त सुबक व बक्तशिर पाठ-वीत आहोत. आह्मांस शेंकडों पत्रें आलीं आहेत.


पत्ता:—

श्रीनिवास बाळकृष्ण होळे जनरल मर्चंट व कमिशन एजंट.

नं. ७२ येवले.

दोन घडयाळें एकदम घेणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गव्हर्नरांच्या २४ शिंग्या घेणाऱ्यास रा. लिव्हर घडयाळ बक्षीस साखळी सुद्धां मिळेल ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे बसवि रु. ४। आठ दिवसाच्या किल्लीचे खिशा-तील घडयाळ रु. १४ सोलजर वाच, मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु.५। पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.

नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्या वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. व हेर गांवच्या लोकांकडून रेलवेभाडे व जे वण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरुस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इ. ७ आकोला (शहर)

## देशी दवाखाना

(वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेली असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे गरजू लोकांनी अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रीस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी बाळंतरोग; पडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता:—वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोले येथें शहरांत मुलींचे शाळेजवळ

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३० आकोला

न. छ. १

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन नमाशी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची औषधें बरक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सार्टीफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तोंच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधूमेह जुनाट परमा, मुष्ठीमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जहाज्र प लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सार्टीफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः–एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्राजनः–यानें पडल, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, च इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खर रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडिक मुत्राची लाली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पूडः–दंतस बंधी सर्व विकार उत्तम बरे !

५ विंचूनें विषः–औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः–औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अमर्दी नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्मे धाक, गुटिका, आसव, तेलें, सूगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामळें एका जा सुरू ला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करुन पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो र्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्य कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास ले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यासआमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---

## OR!ENTAL GOVERNMENTLIFEASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMBAV**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid ,to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested— if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hrough decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others,* by mploying a portion of their annual income or profits in effecting life po once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he di seearly, before he has had time to save much, his wife and pmily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes bupyismind to assura his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained n application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

No. 2

---

### अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं बर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरुं असून प्रत्येक

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२ ] आकोला:—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १४ माहे सप्टेंबर सन १९०८ इसवी [ अंक ३५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचना:—— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर सालदर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं ७३ } G. A Phillips एजंट

### जाहिरात

नागपूर येथें निघणारें ‘ हितवाद ’ वर्तमान पत्र केव्हांही सुरु करतां येतें. पत्रांत निरनिराळ्या विद्वान लोकांकडून विविध विषयांवर लेख न्यायाचे निवाडे, करमणूकीच्या गोष्टी वगैरे येत असतात.

टपाल हंशीलासुद्धां २ रु०. नागपूरचे वर्गणीदारास १। रु०.

म्यानेजर ‘ हितवाद ’

## वर्तमानसार

सांजवर्तमान पत्राचा लिमडीचा बातमीदार कळवितो:—

“ काठेवाडांतील लिमडी शहरांतील व्यापाऱ्यांनीं रा. टिळक यांचे फोटो आपापल्या दुकानांत लाविले होते, परंतु तसें करण्याची लिमडी संस्थानानें गेल्या सोमवारीं मनाई केल्यावरून ते प्रत्येक दुकानांतून पोलिसांनीं काढून टाकिले. अमृतलाल दलपत नांवाचा एक विद्यार्थी रा० टिळक आदि करून देशभक्तांचे फोटो विकीत असे, त्याचे घराचा झाडा फौजदारांनीं घेतला व सर्व फोटो जप्त करून नेले! असले फोटो पुनः न विकण्याची त्या विद्यार्थ्यास ताकीद देण्यांत आली असून हे फोटो संस्थानच्या हद्दींत ठेवूं नयेत, असेंही फर्माविण्यांत आलें आहे.

ता० ९ रोजीं मि० सुब्रह्मण्य अय्यर यांच्या वरील राजद्रोहाच्या खटला चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि० वर्ड यांच्यापुढें सुनावणी करितां आला. तेव्हां मि० सुब्रह्मण्य अय्यर यांच्यावरील राजद्रोहाचा खटला सरकारानें काढून घेतला व १०८ कलमाखालीं त्यांच्या जवळून जामीन मागितला. राजद्रोह अगर जातिद्वेष पसरण्याचा आपला केव्हांच उद्देश नव्हता व ही गोष्ट आणखी स्पष्टपणें प्रत्ययास आणण्याकरितां आपण जामीन देण्यास तयार आहों असें मि० सुब्रह्मण्य अय्यर यांनीं आपल्या जबानींत सांगितलें. जामीन तावडतोब देण्यांत येऊन मि० सुब्रह्मण्य अय्यर यांना मुक्त करण्यांत आलें. मि० सुब्रह्मण्य अय्यर याच्या प्रकृतीकडे लक्ष्य देऊन सरकारनें त्यांच्या वरील राजद्रोहाचा खटला काढून घेतला.

झंगसियाल नांवाच्या उर्दू साप्ताहिकाचे संपादक मुनसी बंकीदयाळ यांच्या वर वेकफील्ड नांवाच्या युरोपियन कान्ट्रक्टरनें अब्रुनुकसानीची फिर्याद केली होती. तिचा निकाल होऊन आरोपीस दोन वर्षाची शिक्षा देण्यांत आली. या खटल्या बद्दल कांहीं स्थानिक अधिकाऱ्यांत बरीच कळकळ दिसून येत होती. बंकीदयाळ यांचा खटला घेतल्याबद्दल वकिलांचीहि खरडपटी काढण्यांत आली असल्याचें समजतें.

हिंदीस्वराज्य पत्राच्या राजद्रोहाच्या खटल्याचा निकाल खालील प्रमाणें ता. ६ रोजीं झाला ज्या ज्यूरीमध्यें तुमच्या देशबांधवांची संख्या जास्त आहे व ज्यास तुमची भाषा समजत आहे, अशा ज्यूरीनें तुह्मांस दोषी ठरविलें. तुह्मी आपल्या अंतःकरणास वाटतें तें लिहिलें ही गोष्ट खरी, परंतु तुमच्या विचारसरणीला भलतें वळण लागलें आहे. तुमचें स्वतःचें मन राजद्रोहानें कलुषित झालें आहे; व त्या विषाचें बीं तुह्मी दुसऱ्यांच्या हृदयांत पेरीत आहां. असल्या विषाची बाधा झालेल्या खुदीराम बोससारख्या व्यक्ती फांशी गेल्या आहेत आरोपीसारख्या बहकलेल्या व्यक्तीस मोकळे सोडणें ठीक नाहीं. कारागृहांतील दीर्घकालिन वास्तव्यांत तुह्मी आपल्या कृतीचा नीट विचार कराल व तुरुंगांतून सुटून आल्यावर आपल्या देशबांधवांना फांसावर पाठविण्यासारखें भलतें शिक्षण न देतां आपल्या बुद्धिमत्तेचा यथायोग्य उपयोग कराल अशी मला आशा आहे. मी तुह्मांस इं. पि. कोडाच्या १२४ कलमाखालील गुन्ह्याबद्दल तीन वर्षांची सक्तमजुरी व २००० रु० दंड व दंड न दिल्यास आणखी एक वर्षाची सक्त मजुरी व १५३ अ कलमाखालील गुन्ह्याबद्दल सहा महिन्यांची सक्तमजुरी येणेंप्रमाणें शिक्षा फर्मावितों.

ता० ७ रोजीं पुणें येथें रा० लक्ष्मण रघुनाथ गोखले वकील . व रा० नागोपंत पटवर्धन वकील, यांचेकडे दोन फराळाचीं पार्सलें बोरीबंदर स्टेशनवरून आलीं. त्यांत टिनच्या डब्यांत बॉम्ब भरून पाठविण्यांत आले होते. हे प्रत्यक्ष बॉम्ब होते कीं बॉम्बच्या आकाराच्या कांहीं नकली वस्तू होत्या हें अजून निश्चयात्मक समजत नाहीं. रा० गोखले यांचे घरीं आलेल्या पार्सलांतील बॉम्ब वलफळें पोखरून आंत दारू भरून बाहेर तांब्याचे खिळे केस वगैरे बसवून तयार केलेलें होते असें साधारण वर्णनावरून समजतें. पार्सलांत एक टाईपरायटर केलेलें पत्र ठेवलें होतें त्यांत ‘ पूर्वी ठरल्याप्रमाणें आपणांकडे ही मिठाई पाठविली आहे. उपयोग करून पहावा, चव बरी वाटल्यास आणखी पाठवूं. ता० १०,११, १२ रोजीं यांचा उपयोग करावा ’ असें त्यांत लिहिलें आहे. सदर तारखेस पार्शी व युरोपियन यांच्यांत जिमखानाग्रौंडवर मॅच व्हावयाची आहे. ह्याच संबंधाचा बहुधा उल्लेख असावा. पोलिसलाही आगाऊ पत्र पार्सलबद्दल आलें. मुंबईहून आलेल्या पार्सलच्या रसिदावर दामोदर रघुनाथ देशपांडे हें पाठविणाराचें नांव ह्मणून दिलेलें आहे.

बॉंबप्रकरणांतील दुसऱ्या तुकडीवरील खटला अलीपूर येथील डिस्टिक्ट मॅजिस्ट्रेटपुढें शनिवार ता. ५ रोजीं सुनावणीकरितां निघाला. सुपरिंटेंडट मुकरजी यांची साक्ष झाली. ते आपल्या साक्षींत ह्मणाले:— ” डाका येथें निकेश्वर राय यांच्या घरांची ही झडती घेतली. झडतींत पत्रव्यवहारांत एक पुडकें सांपडलें. त्यामधील एका पत्रांत ” मि. आलन यांच्या खुनाचा प्रयत्न चालू असल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्यांत आला होता. मि. किंग्जफर्ड यांनीं सुशीलकुमारास २० फटक्यांची शिक्षा दिली होती. प्रत्येक फटक्यास १५०० गोळ्या अशा प्रमाणांत गोळ्या तयार करण्याचा संकल्प झाला आहे. असा एका पत्रांत खुलासा करण्यांत आला होता. ” यानंतर आणखी एकदोघांच्या साक्षी घेण्यात येऊन खटला तहकूब ठेवण्यांत आला.

नरेंद्रनाथ गोस्वामी याच्या खुनाच्या खटल्याचा निकाल ता. १० रोजी सायंकाळीं झाला. पुरावा घेणें झाल्यांनतर ” तुझें ह्मणणें काय आहे ? ” असें सेशन्सजज्जांनीं कनय्यालाल यास विचारलें असतां तो ह्मणाला:–” खुनाची जबाबदारी माझ्यावर आहे, सत्येंद्रावर नाहीं.” कनय्यालालच्या जबाबानंतर सरकारतर्फेच्या व आरोपीच्या वकिलाचीं भाषणें झालीं व जज्जांनीं ज्युरीस खटला समजावून सांगितला. ४० मिनिटें विचार केल्यावर ” कनय्यालाल याजवर खुन, खुनास प्रोत्साहन, जबर दुखापत हे अपराध शाबीत आहेत ” असें ज्युरींनें एकमतानें सांगितलें. जज्जांनीं ज्युरीचा अभिप्राय मान्य करून कनय्यालाल यास फाशीची शिक्षा सांगितली. सत्येंद्रनाथ निरापराधी आहे असें पांचांपैकी तीन ज्यूरर्सनीं सांगितलें. सत्येंद्रनाथाविषयींचा ज्युरीचा अभिप्राय जज्जास न पटल्यामुळें त्यानीं तो अभिप्राय निकालासाठीं हायकोर्टाकडे पाठविला.

( ता. ८ ) रोजीं चा. ज. यांनीं रा. टिळक यांना प्रिव्ही कौन्सिलकडे अपिल करण्यास परवानगी द्यावयाची कीं नाहीं, या प्रश्नाचा निकाल सांगितला. निकालाचा आशय पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

नेहमीच्या न्यायाच्या तत्त्वापासून प्रस्तुतच्या खटल्यांत च्युति झाली आहे असें नाहीं. आरोपीवर अन्याय झाला आहे असें शाबीत करण्यांत आलेलें नाहीं. आक्षेपार्ह लेख हे विशिष्ट वादासंबंधाच्या लेखमालेचा भाग आहेत, ही गोष्ट आरोपीनेंच स्वतः प्रतिपादिली असल्यामुळें आरोपही एकाच व्यवहाराबद्दल ठेवण्यांत आले होत. हें सिद्ध झालें. आरोप एकत्र करण्यांत कायद्याचें उल्लंघन झालेलें नाहीं. आरोपीला बचावाचे कामी हरकत झाली असेंही ह्मणतां येत नाहीं; सबब खरोखरी अन्याय झालेला नाहीं. खटल्यांतील गुन्हांना जास्तीत जास्त ज्या शिक्षा सांगितलेल्या आहेत, त्यापेक्षां खालच्या कोर्टानें आरोपीस दिलेल्या शिक्षा कमीच आहेत. सबब ७१ कलमाचें उल्लंघन झालें असेंही ह्मणतां येत नाहीं; या कारणासाठीं आह्मी प्रीव्ही कौन्सिलकडे अपील करण्याची परवानगी देण्याचें नाकारतों.

# वऱ्हाडसमाचार

भाद्रपद वद्य ४ शके १८३०


## सरकार शेतकऱ्या करितां काय करीत आहे- नंबर २

या खात्याचें पहिलें वर्ष व्यवस्था आणि जुळवाजुळव करण्यांतच गेल्यामुळें त्यावर्षीं प्रत्यक्ष काम असें फारच थोडें झालें गुदस्त आणि तिगस्त सालीं या खात्यानें जें काम केलें. त्याचा अहवाल इन्स्पेक्टर जनरल ऑफ ॲग्रिकलचर इन इंडिया, मि. मॉलिसन यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्यावरून पाहतां असें दिसतें कीं बादशाही खात्यांत १८ व प्रांतिक खात्यांत ३० अशा एकंदर ४८ इंग्रजांची वरणी या खात्यांत लागली आहे. यांच्या पगाराखातर दरसाल सुमारें ५ लक्ष रुपये खर्चीं पडत आहेत. या शिवाय या इंग्रज तज्ज्ञांच्या हातांखालीं कांहीं 'नेटिवें' आहेत परंतु नेटिवांना खर्चाला कमी पुरत असल्याकारणानें त्यांच्या पगाराची रकम फारशी महत्वाची नाहीं. या ४८ इंग्रजां-शिवाय आणखी पुष्कळ इंग्रज या खात्याला अजून पाहिजे आहेत.

बादशाही शेतकी खात्याचें मुख्य काम पुसा एथील संशोधन संस्थेंत चाललेलें आहे. या संस्थेच्या पांच शाखा आहेत त्या अशा:— १ साधारण कृषिकर्म, २ कृषिरसायन, ३ सूक्ष्म वनस्पतिशास्त्र, ४ कीटकशास्त्र व ५ वनस्पतिशास्त्र. या पैकीं 'साधारण कृषि' शाखेचे मुख्य मि. शीयरर हे आहेत. यांचा आतां पर्यंतचा बहुतेक वेळ पुसा एथील १३०० एकरांच्या प्रयोग क्षेत्रांतील झाडी तोडून प्रयोगांच्या सोईचीं शेतें तयार करण्यामध्यें गेला. या शिवाय त्यांनीं सर्व जातीचे कापुस आणि २५ जातीचे उंस लावून पाहिले. कापसाचे प्रयोग सर्व व्यर्थ जाऊन बहार प्रांतांत कापूस करण्यापासून फायदा नाहीं, असें ठरलें. आस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका येथून कुरणाच्या उपयोगी अशा गवताच्या दोन जाती आणून त्यांची लागवड करण्यांत आली . कृषि रसायन शाखेचे मुख्य डा. लीदर यांचा बहुतेक वेळ जमिनी, पाणी, खतें, गाळ, चारा, पेंड, उंस इ० च्या रासायनिक पृथःकरणांत गेला. त्यामुळें त्यांना नवीन शोध करण्यास फारसें फावलें नाहीं. सूक्ष्म वनस्पतिशाखेचे मुख्य डॉ. बटलर हे सध्यां हिंदुस्थानांतील पिकांना होणारे सूक्ष्म वनस्पतींचे रोग यांचे नमुने गोळा करीत आहेत. जगांतलि कोणत्याहि देशांतल्यापेक्षां येथें सूक्ष्म वनस्पतिजन्य रोग फार असल्या कारणानें डाक्टर मजकुरांची फार तारांबळ उडाली आहे. भुईमुगावरील 'टीका' रोग व गव्हांवरील तांबोरा या रोगासंबंधीं शोध सध्यां चाललेले आहेत. नत्रवायु झाडांना पुरविणाऱ्या सूक्ष्म वनस्पतींनीं जमीन 'टोंचण्या' संबंधाचा शोध अमेरिकेंत लागून तिकडे त्याचा फायदा दिसून आला. ह्मणून हा 'टोंचण्या'चा प्रयोग डेराडून व पुसा या दोन ठिकाणीं करण्यांत आला. परंतु त्यापासून कांहीं विशेष फायदा दिसला नाहीं. याचें कारण सदर अहवालांत असें दिलें आहे कीं सध्यांच्या पिकांच्या फेरबदल पद्धतींत डाळींच्या जातीचीं पिकें नेहमीं असतात यामुळें या झाडांच्या मुळांवर गांठी उत्पन्न करणाऱ्या आणि सेंद्रिय स्वरूपांत नत्रवायुचा सांठा जमीनीमध्यें करणाऱ्या सूक्ष्म वनस्पति सर्व शेतांत भरपूर असतात, यामुळें या 'टोंचण्या' पासून हिंदुस्थानांतील शेतांना फारसा फायदा होईलसें दिसत नाहीं ! परंतु आह्मी येथें सरकारच्या या तज्ज्ञ डाक्टर साहेबांना हळूंच असें विचारतों कीं डेराडून आणि पुसा येथील एक वर्षाच्या प्रयोगावरून आपण जो हा तर्क सर्व हिंदुस्थानसंबंधानें केला आहे तो कशाच्या आधारावर ? हिंदुस्थानांतील सर्व जमीनींची स्थिति डेराडून आणि पुसा येथील स्थितिसारखीच आहे काय ? या ठिकाणच्या जमीनींचा एक विशेष येथें लक्षांत ठेवण्यासारखा आहे. डेराडून हें ठिकाण उंच डोंगरांत आहे व तेथील हवा समशीतोष्ण असून तेथें पाऊस साधारणतः पुष्कळ पडतो. अशी हवा, पाण्याची सोय हिंदुस्थानांत फारच थोड्या ठिकाणीं आहे. पुसा येथील जमीन कित्येक वर्षांची पडीत जंगला खालची—आणि ह्मणूनच अतिशय सुपीक आहे. अशा ठिकाणीं या पद्धतीपासून फायदा दिसला नाहीं ह्मणून सर्व हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठें फायदा होणार नाहीं व ह्मणून या बाबतींत ज्यास्त प्रयोग करण्याची अवश्यकता डाक्टर मजकुरांना वाटत नाहीं ! कीटक शास्त्राच्या शाखेचे मुख्य मि. लेफ्रॉय यांचें काम बरेंच झपाट्यानें चाललें आहे असें दिसतें 'हिंदुस्थानांतील पिकांचे कीटक शत्रू' या नांवानें जें एक पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे त्यावरून खऱ्या शास्त्रज्ञाला जी दृष्टी असावी लागते त्या दृष्टीनें त्यांचें काम चाललें आहे असें दिसतें. लेफ्रॉय साहेब हे फार अनुभवी असून पुष्कळ हिंडलेले आहेत. त्यामुळें हिंदुस्थानांतील शेतकीच्या व्यावहारिक भागाला जरी फारसा नसला तरी शास्त्रीय भागाला त्यांच्या ज्ञानाचा फार उपयोग होईल असा भरवंसा आहे. या कीटक शत्रू संबंधाची पुष्कळ माहिती त्यांनीं गेल्या ३।४ वर्षांत प्रसिद्ध केली आहे.

वनस्पति शाखेचे मुख्य मि. हावर्ड यांचे मुख्यतः गव्हांसंबंधाचे प्रयोग चालले आहेत. या संबंधाचें एक पुस्तक ते सध्यां तयार करीत असून तें लवकरच प्रसिद्ध होणार आहे. या शिवाय या शाखेमार्फत कापसा-संबंधाचे शोध बरेच चाललेले आहेत. हिंदुस्थानांतील कापसाच्या सर्व जातींची पहाणी करून या जातींचें वर्गीकरण करण्याचें बरेंच जिकीरीचें आणि बिकट काम या खात्यांतील मि. गॅमी यांनीं नुकतेंच संपविलें आहे. बियाची निवड करून कापसाच्या जाती सुधारण्याचेंहि काम चाललेलें आहे. या कामासाठीं मुख्य मुख्य ठिकाणीं प्रयोग क्षेत्रें उघडण्यांत आलीं असून तेथें हें काम चाललेलें आहे. मुंबई इलाख्यांत सुरत, वऱ्हाडांत अकोलें, व मद्रास इलाख्यांत एक अशा तीन ठिकाणीं हें कापसाच्या निवडीचें काम चालूं आहे. या शिवाय मिश्र जाती आणि परदेशी जाती यांचेहि प्रयोग होत आहेत. हिंदुस्थानांतील कापसाची लागवड वाढविण्याकरितां म्यांचेस्टर येथील 'ब्रिटिश कॉटन ग्रोईंग असोसिएशननें १५०००० रु. हिंदुस्थान सरकारच्या स्वाधीन केले आहेत. यांपैकीं १०००० रु. कलकत्त्याच्या शॉ वालेस नांवाच्या एका युरोपियन कंपनीला देण्यांत आले असून एतद्देशीय शेतकऱ्यांना मदती दाखल सर्व हिंदुस्थानांत मिळून ४००० रु. ची रकम सरकारनें उदार बुद्धीनें दिली आहे ! बाकीचे पैसे तूर्तच खर्चण्याची सरकारला अवश्यकता वाटली नाहीं. या शिवाय जे धंदे मुख्यतः युरोपियन मळेवाल्यांच्या हातांत आहेत अशा ह्मणजे, चहा, नीळ, जूट इ. पिकांसंबंधाचे प्रयोग या खात्यामार्फत पुष्कळ चालले आहेत. बंगालमध्यें रेशमाच्या उत्पत्तींत निष्णात बाबू एन्. जी. मुकरजी यांचे रेशमासंबंधाचे प्रयोग चालूं आहेत. विहिरी, तलाव, इत्यादि मधून पाणी वर काढण्याच्या साधनांसंबंधाचे प्रयोग मद्रास इलाख्यांत मि. चॅटर्टन हे करीत आहेत.

गतवर्षी बादशाही शेतकी खात्याकरितां एकंदर ४ लक्ष रुपये तज्ज्ञ मंडळींच्या पगाराकरितां वगैरे खर्च झाले. या शिवाय पुसा येथील इमारती वगैरे करिता कित्येक लक्ष रु. खर्च झाले आहेत. इतका खर्च करून ही तज्ज्ञ मंडळी काय करीत आहे याची हकीकत वर दिलीच आहे. या रकमे शिवाय सुमारें एक लक्ष रुपये इन्स्पेक्टर जनरल ऑफ ॲग्रीकलचर यांना सरकारनीं दिले होते. वते इन्स्पेक्टर साहेबांना शेतकीच्या बाबतींत ज्या सुधारणा कराव्याशा वाटतलि त्या अमलांत आणण्याचे कमीं खर्च करण्याचें ठरलें होतें. त्या बहहुकूम पुढील प्रमाणें पैसे खर्चण्यांत आले:—

रु.

१ कलकत्त्याच्या शॉ वॉलेस कंपनीला ४०,०००

२ मुंबईच्या सरकारी शेतकी खात्याला १२०००

बेळगांव येथील मि. टेलर यांचे कापसाचे प्रयोग ५०००

मांजरी येथील सरकारी शेतावर उंसाचा चरक आणला त्या करितां ५००० रु.

सिंध मधील उंसाचे प्रयोग व अहमदाबाद येथील गुळाचे प्रयोग १२००

नडीयाद येथील सरकारी शेताला ८००

१२०००

३ बंगालच्या शेतकी खात्याला 'औस' भाताची लागवड छोटा नागपूर मध्यें करण्याकरितां दिले ३५०

४ मध्य प्रांतांतील शेतकी खात्याला एक इंजन व पंप विकत घेण्याकरितां दिले ८२००

५ कुर्ग प्रांतांच्या कमिशनरला कारव्होनिका कापसाच्या प्रयोगाकरितां ३०००

६ इंडियन टी असोसिएशन नांवाच्या चहाचे मळेवाल्यांच्या इंग्रजी मंडळीला ३००००

७ प्रयोगाकरितां बेणें वगैरे खरेदी केले त्या बदल २६८०

पुसा येथील बाग मोठा करण्या करितां ४०००

एकून रु. १,००,२३०

या हिशोबावरून हें खातें हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या किती उपयोगी पडत आहे याची चांगली कल्पना होईल !

अहवालाच्या शेवटीं गेल्या दोन वर्षांत शेतकीच्या विषयांवर इंग्रजींत जे 'ग्रंथ' झाले त्यांची यादी दिली आहे. ही यादी १६३ ग्रंथां' ची आहे. या यादींतील पुस्तकांचें थोडें वर्गीकारण केल्यास फार मौजेची माहिती मिळते. या १६३ ग्रंथांपैकीं १२५ ग्रंथ सरकारनें प्रसिद्ध केलें आहेत, ५ देशी संस्थानांतून निघाले व ३३ खाजगी आहेत. सरकारची ग्रंथ संख्या १२५ ही सकृद्दर्शनीं मोठी वाटते खरी, परंतु ३९ सरकारी अहवाल आणि २० चिटोरीं Leaflets यां 'ग्रंथां' च्या संख्येंत आहेत. ह्मणजे खरे ग्रंथ असे ६६ राहतात ! या ६६ 'ग्रंथां' पैकीं निम्मे देखील पन्नास पानांच्या वर नाहींत ! हिंदुस्थान सरकारचें हें बादशाही शेतकी खातें शेतकऱ्यांच्या हिताकारितां ह्मणून उघडण्यांत आलें आहे. अर्थात्च हें खातें जे प्रयोग करील किंवा जे शोध लावलि ते शेतकऱ्याकरितां आहेत. परंतु हे शोध शेतकऱ्याला कळावयाचे कसे ?

या खात्यानें हे शोध शेतकऱ्यांना समजाऊन देण्याची सोय कोठेंहि केलेली दिसत नाहीं. यांचे हे सर्व शोध इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध झाले आहेत. मग या बादशाही तज्ज्ञांनीं लावलेले हे शोध समजावून घेण्याकरितां शेतकऱ्यांनीं इंग्रजी शिकलें पाहिजे अशी या साहेब बहादुरांची मनीषा असल्यास न कळे ! बरें एखाद्या इंग्रजी जाणणाऱ्या मनुष्यानें हे यांचे इंग्रजी शोध वाचून ते शेतकऱ्याला समजावून देण्याची खटपट करावी तर त्याचाहि बंदोबस्त या साहेब बहादुरांनीं पुरा करून टाकिला आहे ! या खात्याच्या मार्फत 'आग्रिकल्चरल जर्नल ऑफ इंडिया' या नांवाचें एक त्रैमासिक निघत असतें. परंतु एखादा नेटीव हें वाचून यांतील माहिती शेतकऱ्याला सांगेल या भीतीनेंच कीं काय याची किंमत दर अंकाला दोन रुपये ठेविली आहे. शेतकीच्या शोधावर लहान लहान पुस्तकें काढून तीं फुकट वाटण्याचा प्रघात बहुतेक सर्व देशांत आहे. परंतु आमच्या सरकारचा याच्या अगदीं उलट प्रकार आहे. या सरकारनें जे ६६ ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत त्यांतील बहुतेकांच्या किंमती इतक्या जबर ठेविल्या आहेत कीं हीं पुस्तकें विकत घेण्याचें धाडस कोणाहि नेटिवाला होऊं नये ! याचें एक प्रत्यक्ष उदहरण ह्मणजे प्रो. गॅमी यांनीं लिहिलेलें Indian Cottons हें पुस्तक होय या पुस्तकांत २३ पृष्ठें व १४ चित्रें असून याची किंमत ७॥ रुपये ठेवण्यांत आली आहे —७॥ रुपये खर्चून हें पुस्तक विकत घेण्याची ऐपत किती हिंदी लोकांना आहे याची कल्पना सहज होण्यासारखी आहे.

अशा प्रकारें शेतकीची सुधारणा करण्याकरितां ह्मणून काढलेल्या या बादशाही शेतकी खात्याचा हा दोन वर्षांचा अहवाल आहे !

## सार्वभौमसत्तेची इभ्रत.

ब्रिटीश साम्राज्यांत आशिआटिक प्रजेची कदर कितीकशी रहाते हें कायमचें ठरवून घेण्याचा ट्रान्सव्हालमधील हिंदी लोकांचा कृतसंकल्प आहे. ट्रान्सव्हाल सरकारनें आपल्या प्रधानांच्या मार्फत हिंदी पुढाऱ्यास दिलेलीं आश्वासनें सर्वथैव खोटीं होतीं आणि त्या आश्वासनाप्रमाणें वागण्याचा त्या सरकारचा मुळींच कधीं हेतु नव्हता असें अनेक प्रकारांवरून दिसून येत आहे. सामोपचारानें सांगितलें असतां नोंदणी करून घेण्यास तयार झालेल्या लोकांनीं ट्रान्सव्हाल सरकारचें असलें बेइमानपणाचें वर्तन पहातांच नोंदणीचीं सर्टिफिकेटें आपल्या हातांनीं फाडून टाकून त्या पायीं येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्याचा क्रम आरंभिला आहे. ट्रान्सव्हाल सरकार नोंदणी न करून घेणाऱ्यांना हद्दपार करीत आहे आणि नोंदणीशिवाय आपल्या हद्दींत रहाणाऱ्यांवर सरसहा खटले करीत आहे. पण हिंदी लोकांना सरहद्दीपार करून शिपायी पाठफिरवितात न फिरवितात तोंच ते लोक पुनः ट्रान्सव्हालचे हद्दींत शिरून ब्रिटिश साम्राज्यांतील कोणत्याही प्रामाणिक नागरिकाला जो हक्क असावयाचा तो बजावूं पहात आहेत. ट्रान्सव्हालसरकार आपण साम्राज्यांतील एक भाग आहों हें विसरून वागत असल्यामुळें स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास तें राष्ट्र अपात्र आहे अशी तक्रार हिंदी प्रजेचे कैवारी लॉर्ड ॲम्थिल यांनीं केली आहे. ट्रान्सव्हालांतील हिंदी प्रजेसंबंधाचा प्रश्न मोठमोठ्या ब्रिटिश मुत्सद्यांना इतका घोटाळ्यांत घालून बसला आहे यांत कांहीं आश्चर्य नाहीं. जरा सूक्ष्म नजरेनें पाहिलें तर ट्रान्सव्हाल प्रकर्णांत रा. खाडिलकरांच्या कीचकवध नाटकाची छाया दिसून येते. ट्रान्सव्हालांतील हिंदी लोक सार्वभौमसरकारच्या न्यायीपणावर व समदृष्टीवर विश्वासूनच ट्रान्सव्हालांत गेलेले आहेत. आपण साम्राज्याची प्रजा असल्यामुळें कोणाहि सुधारलेल्या राष्ट्रांत अगदीं परकी मनुष्यांवर सुद्धां येणार नाहीं असा अपमानास्पद प्रसंग येउं नये अशी त्यांची अपेक्षा असणें सहाजिक आहे. ही अपेक्षा पूर्ण होणें ब्रिटिश साम्राज्यसत्तेला विशेष भूषणावह नाहीं तथापि ती पूर्ण न होणें मात्र निःसंशय दूषणावह आहे. तेव्हां साम्राज्याच्या अब्रूचा प्रश्न येथें असतां मांडलिकानें आपला हेका कोठवर चालवयाचा ही विचाराची बाब आहे. ट्रान्सव्हालांत गेलेल्या हिंदी लोकांनीं ही जी निकराची जोराजोरी चालविली आहे तींत त्यांचा स्वतःचा असा फायदा फारच थोडा आहे. हिंदुस्थानाला हजार पांचशे लोक ह्मणजे जड आहेत अशांतील भाग नाहीं. खुद्द येथील रहिवासी तीस कोटि लोक येथें कसेबसे नांदत आहेतच. शिवाय लाखो परकी लोकांचीं पोटें हिंदुस्थान भरीत आहे. अशा देशांतील हजार दोन हजार लोकांना ट्रान्सव्हालांत किंवा ब्रिटिश साम्राज्याच्या दुसऱ्या एखाद्या भागांत रहाणें अपमानाचें झालें तर त्यांना परत येण्यांत कांहीं अडचण वाटावयाची नाहीं. पण हिंदी प्रजा आपल्या स्वतःच्या अडचणीवरून इतकी निकरावर आलेली नाहीं हें वर सांगितलेंच आहे. साम्राज्याचे नागरिक ह्मणून हक्कानें वसाहतींत रहातां येणें आशियाटिक प्रजेला शक्य नसावें हा वादाचा मुख्य मुद्दा आहे आणि या मुद्याच्या निकालावर साम्राज्याची इभ्रत अवलंबून आहे या गोष्टीचा विचार झाला पाहिजे. सार्वभौम सरकारनें ट्रान्सव्हालला स्वराज्याचे हक्क दिले ते काय साम्राज्यांतील प्रजेवरच शस्त्र धरण्या करितां? असा प्रश्न निघाल्याशिवाय रहात नाहीं. साम्राज्यांतील स्वराज्य उपभोगणारीं संस्थानें साम्राज्यसत्तेला बळकटी आणणारीं व्हावींत किंवा त्यांनीं त्या सत्तेच्या उघड धिःकाराला बिनदिक्कत उद्युक्त व्हावें, याचा जबाब ट्रान्सव्हालासारख्या साम्राज्यसत्तेशीं बेइमानपणें आणि शिरजोरपणानें वागणाऱ्या संस्थानांकडून मागणारे धीराचे मुत्सद्दी आज इंग्लंडांत नाहींत कीं काय? किंवा असा जबाब मागण्या इतका साम्राज्य सत्तेचा मांडलिक संस्थानांवर दाबच उरलेला नाहीं.

## जातीचा प्रश्न.

ट्रान्सवाल प्रकरण इतक्या थरावर येण्याला जातीचा प्रश्न मुख्यत्वें करून कारण झाला आहे हें प्रसिद्धच आहे. हिंदी प्रजेची तरफदारी न करणें ज्यांना शक्य नाहीं अशा कांहीं आपलपोट्या इंग्रजांनीं एका बाजूनें हिंदी प्रजेचें ह्मणणें रास्त ठरविण्याचा आणि दुसऱ्या बाजूनें या जातीच्या प्रश्नाला विपरीत स्वरूप देण्याचा उद्योग चालविला आहे. असें करण्यांत त्यांना काय साधावयाचें आहे हें कोणीही सहज सांगूं शकेल. ट्रान्सव्हालांतील सत्ताधिश वर्ग सध्यांचें भांडण या जातीच्या प्रश्नाच्या आधारावर चालवीत असल्यामुळें या प्रश्नाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें आपल्या दृष्टीनें अनुकूल असें स्वरूप देण्यानें ट्रान्सव्हाल सरकारची बाजूं जास्त सावरली जाईल हें हे लोक जाणून असले पाहिजेत. अशा वर्गांतील लंडनचें टाइम्स पत्र पुढारी आहे. सर्व आशियाटिक राष्ट्रांत सध्यां जी जागृति झालेली आहे तीमुळें भय पावून या पत्रानें आपल्या देशांतील एककल्ली आणि स्वार्थैकदृष्टि लोकांना चिथावून या जागृतीविषयीं प्रतिकूल ग्रह त्यांचे मनांत उत्पन्न करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. नुकतेंच या पत्रानें एका लेखांत या आपल्या उद्योगाचें स्वरूप प्रकट केलें आहे. जपान, चीन, वगैरे राष्ट्रांतील जागृति पाश्चात्य संस्कृती अधिकची चावल्यामुळें उत्पन्न झालेली असून तिचा सर्व कटाक्ष पाश्चात्यांच्या सत्तेवर आहे असें ध्वनित करून वर सांगितलेल्या आशियाटिक राष्ट्रांच्या आत्मोन्नतीच्या पवित्र कार्यासंबंधानें विचारी लोकांच्याहि मनांत विकल्प उत्पन्न करण्याची खटपट टाइम्सनें केली आहे. पण या लेखाचा मुख्य रोख चीन जपान सारख्या स्वतंत्र राष्ट्रांवर नसून हिंदुस्थानासारख्या परतंत्र देशांतील लोकांवर आहे. हिंदुस्थानांतील लोकांनीं आत्मोन्नतीचा प्रयत्न चालविलेला पाहून याच्या पोटांत दुखावें हें सहाजिक आहे. पण ही सर्व आत्मोन्नतीची तयारी हिंदी लोकांनीं केवळ पाश्चात्यांच्या कल्पना गिरवून केलेली आहे. अशी टवाळी करतांना या विलायती कलम बहादरानें एक कबुली जबाब दिला आहे. त्याबद्दल मात्र त्याची कींव करावी तितकी थोडीच होईल. त्यानें असें ह्मटलें आहे कीं, 'जेथें आपली [illegible] नाहीं तेथें नाक खुपसण्याचा आणि आपली पथारी पसरण्याचा पाश्चात्यांचा गुण हिंदी लोकांनींहि उचलला आहे.' या वाक्यावरून परदेशांत उद्योगधंद्यांसाठीं जाणाऱ्या हिंदी लोकांचा उपहास करण्याचा टाइम्सचा हेतु उघडच होत आहे, पण परनिंदेच्या भरांत त्यानें आपल्याच जात भाईची संभावना केलेली आहे ती मात्र सर्व इंग्रजांस रुचण्यासारखी नाहीं हें सांगावयास नको. ट्रान्सव्हालांत व्यापार उदीमासाठीं जाणाऱ्या हिंदी लोकांना उद्देशून टाइम्स कांहींही ह्मणो आह्माला त्याच्याच शब्दांत त्याच्या जातभाईचा समाचार घ्यावयाचा नाहीं. तसें आमच्या मनांत असतें तर लंडन टाइम्स सारख्या वजनदार पत्राच्या आधाराच्या साह्यानें आह्मी असें ह्मटलें असतें कीं पाश्चात्य राष्ट्रांनीं जेथें जेथें आपलें ठाणें दिलेलें आहे तेथें तेथें त्याची मुळींच जरूर नव्हती. त्या ठिकाणचे लोक या पांढऱ्या पाहुण्यावांचून अडून बसलेले नव्हते. त्यांच्या घरांत गोऱ्यांनीं प्रवेश केला तो त्यांच्या आमंत्रणावांचून अर्थात् अन्यायानें केलेला आहे. पण या अन्यायाची दुरुस्ती कायद्याच्या जोरावर करण्याची शक्ति ज्यांच्या अंगांत नाहीं त्यांनीं त्याचा कोरडा उच्चार करण्यांत कांहीं हंशील नाहीं. आज जातीचा प्रश्न सर्व गोऱ्या राष्ट्रांना मोठ्या अडचणीचा वाटूं लागला आहे. कांहीं काळापूर्वीं तो दुसऱ्या एखाद्या जातीला तसाच जाचक झाला असला पाहिजे. पण ईश्वरी संकेतानुरूप तो मनु पालटून आतांचा मनु आला आहे. येथें कोणी शोक करण्याचें कारण नाहीं. करावें तसें भरावें, नुसतें रडण्यानें कांहीं हंशील होणार नाहीं.

## अशा सोंगानें कोण फसेल

हिंदुस्थानांतून विद्याभ्यासासाठीं इंग्लंडास गेलेल्या विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवण्यासाठीं एक युरोपियन ग्रहस्थ नेमण्याचें घाटत असून याविषयींची नक्की योजना पार्लमेंटाच्या सध्यांच्या सुटीनंतर ह्मणजे आणखी सुमारें एक महिन्यांत करण्याचा लार्ड मोर्ले यांचा विचार आहे. अशी बातमी आली आहे. ही बाह्यतः इष्ट अशी तजवीज आतांच करण्याचें योजल्यामुळें तिच्यामुळाशीं असणाऱ्या हेतुविषयीं संशय मात्र आल्यावांचून रहावयाचा नाहीं. हिंदी विद्यार्थी शिक्षणासाठीं इंग्लडांत जाण्याचा परिपाठ गेलीं पन्नास वर्षे आहे. इतक्या अवधींत त्यांच्या वर्तनावर दाब ठेवण्याला कांहीं तजवीज करण्याची आवश्यकता स्टेट सेक्रेटरींस कशी वाटली नाहीं हा प्रश्न उपस्थित झाल्यावांचून रहात नाहीं. आतांच्या बातमीवर ॲंग्लोइंडियन पत्रकर्त्यांनीं जें भाष्य केलें आहे त्यावरून या तजविजीचा रोख कशावर आहे हें सहज कळून येत आहे. एका राजकीय बाबतींत ब्रिटिश अधिकाऱ्यांना नापसंत असलेल्या विचारांपासून हिंदुस्थानांतून इंग्लंडांत गेलेल्या विद्यार्थ्यांना अलिप्त राखूं गेल्यानें सर्व जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडल्यासारखें कसें होईल? तरुण विद्यार्थ्यांचीं मनें फक्त अनिष्ट अशा राजकीय विचारांनीं बिघडतात आणि त्या खेरीज त्यांचीं मनें बिघडण्यास इंग्लंडांत कोणतींच साधनें नव्हतीं असा स्टेट सेक्रेटरींचा समज आहे कीं काय तें कळत नाहीं. हिंदुस्थानांपेक्षां इंग्लंडांतील परिस्थिति तरुणांचीं मनें बहकण्यास जास्त अनुकूल आहे, असा दोन्ही देशांतील स्थितीची चांगली माहिती असणाऱ्या पुष्कळ विचारी गृहस्थांचा पक्का समज आहे. दहावीस वर्षांपूर्वीं इंग्लंडांत नीतीचें साम्राज्य होतें आणि आज एकदम तेथें कली मातला असा प्रकार नसतांना इतके दिवस स्टेट सेक्रेटरींनीं हिंदुस्थानांतून तिकडे गेलल्या तरुणांच्या संबंधानें आपलें कर्तव्य केलें नाहीं, तें का? याचा जबाब प्रथम मिळाला पाहिजे. या प्रश्नाचा जबाब समाधानकारक देतां येणें त्यांना शक्य नाहीं. आणि ह्मणूनच सध्यांच्या योजनेंत हिंदी तरुणांच्या एकंदर वर्तनाला नीतीच्या ताब्यांत ठेवण्याचा हेतु कितपत आहे याची शंका आल्यावांचून रहात नाहीं. हिंदी तरुणांना इंग्लंडांत कोणीतरी ब्रिटिशसत्ते-विरुद्ध फिसाद करण्यास चिथावतें अशा संशयावरून, केवळ आपलें घर सुरक्षित राखण्याच्याच हेतूनें मोठा उदारपणाचा किंवा नीतीच्याचाडीचा डौल मिरविणें सध्यांच्या स्टेट सेक्रेटरींना मुळींच शोभावयाचें नाहीं. मोलाकारितां--स्वार्थाकरितां--रडणाऱ्यांचा मारवाडी कावा हिंदुस्थानांतले लोक उत्तम रीतीनें ओळखूं शकतात हें अतां तरी लिबरल स्टेट सेक्रेटरींनीं शिकावें आणि जें काय करावयाचें तें खरोखर निरपेक्ष बुद्धीनें केवळ हिंदुस्थानाच्या हिताकरितां ह्मणूनच करावें तसें करावयाचें नसेल, किंवा तसे करतां येत नसेल तर व्यर्थ ढोंगधतुऱ्याच्या भानगडींत न पडतां स्वस्थ बसून रहावें हा उत्तम मार्ग.

## मुंबई सरकारचा धुर्तपणा

कोणत्याहि कारणावरून कां असेना, पण मुंबई सरकारची धूर्ततेबद्दल थोडीशी प्रसिद्धि होती. सध्यांच्या गव्हर्नर साहेबांच्या स्वतःच्या अंगच्या कांहीं गुणामुळें ती थोडी जास्तही झालेली होती. पण केव्हां केव्हां अगदीं खुळचट किंवा भेंकड मनुष्यावरही धूर्तपणाचा आरोप येतो हें मुंबई सरकारानें प्रत्यक्षच जगाच्या अनुभवास आणून देण्याचें योजिलें आहे कीं काय तें कळत नाहीं. या खुळचटपणांत मुंबई सरकारनें पुण्याच्या दोन वकिलांचा उपदेश घेतलेला दिसतो. मुझफरपूर येथें मि. किंग्जफर्ड यांच्या खुनाचा जो प्रयत्न झाला त्यांत एका युरोपियन कायदेपंडिताची कौटुंबिक हानी झाली ह्मणून व्यवसायबंधु या नात्यानें या वकील द्वयानें मि. केनडी यांचेवरील दुःखजनक प्रसंगीं त्याजविषयीं आपली सहानुभूति प्रकट केली. पण हे धंदेवाले लोक इतक्यावरच कसचे थांबतात? त्यांनीं एकंदर अराजक प्रकाराविषयीं आपली बिलकूल सहानुभूति नाहीं असें भर कोर्टांत जाहिर केलें. मुंबई सरकारानें या अव्यापारेषु व्यापाराचा फायदा घेऊन असा जाहिरनामा काढला आहे कीं, ज्यांना अराजक प्रकाराविषयीं सहानुभूति

नसेल त्यांनीं त्याप्रमाणें उघड रीतीनें ह्मणावें. आज अराजक बंडाळी कारितां लोकांनीं निषेधाच्या सभा भरवाव्या आणि उद्यां पोलिसाच्या नाकी नऊ आणणाऱ्या दरवडेखोरांची एखादी टोळी निघाली ह्मणजे त्या लोकांविषयीं आपल्या मनांत सहानुभूति नाहीं हें जाहिर करावयास पुनः सभेची जुळवाजुळव करावी. ही दुसरी सभा होते आहे तोंच आणखी एखादें प्रकरण उपस्थित होऊन लोकांना पुनः सव्यापसव्य करणें भाग पडावें! हा प्रकार अव्याहत चालणार! इतक्या लोकांनीं सभा वगैरे भरविण्याचा आणि प्रत्येक खेपेस भाषणें करण्याचा त्रास देण्यापेक्षां मुंबई सरकारला दुसरा एक मार्ग मोकळा होता. आज ज्या पुढाऱ्यांकडून आणि प्रतिष्ठित लोकांकडून अराजक प्रकारांविषयीं निषेधाची अपेक्षा मुंबई सरकार करीत आहे त्यांनाच एकदां बोलावून, अराजक चळवळी पासून तों अगदीं सौम्य प्रकारच्या चळवळीपर्यंत कोणत्याही खटपटीला आपल्या राज्यपद्धतीनें कारणच कसें उरत नाहीं, याची खात्री करून द्यावी ह्मणजे झालें. सरकार लोकांचें ह्मणणें मुळींच ऐकत नाहीं ह्मणून आपण साहसाला प्रवृत्त झालों असें त्या प्रकारच्या कृत्यांचे पुरस्कर्ते ह्मणतात आणि सरकारला तर यत्किंचित् देखील तक्रार सहन होत नाहीं. अशा दोन परस्पर विरुद्ध मनःस्थितींचा मेळ बसण्याला वर सांगितलेलाच एक उपाय आहे. लोकांच्या पुढाऱ्यांची खात्री करून देणें सरकारला अडचणीचें वाटूं नये. असा सरळ मार्ग सोडून देऊन वाम मार्गाचें अवलंबन करणाऱ्यानें भ्याडपणाचा शिक्का आणि त्याच्या मागोमाग तनुषांगिक सर्व प्रकारचा आहेर स्वीकारण्यास निमुटपणें तयार व्हावें. याशिवाय अन्य गति नाहीं.

---

## दादाभाई नवरोजी यांचा उपदेश

### "घातपाताच्या मार्गास लागूं नका"

आपल्या वाढदिवसानिमित्त दादाभाईंना जीं पत्रें व तारा आल्या, त्यांस उद्देशून दादाभाईंनीं खालील संदेश जाहीर केला आहे:—

" गेल्या वर्षभर इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही ठिकारच्या माझ्या मित्रांनीं माझ्याबद्दल जें प्रेम व जो आदर व्यक्त केला, त्याबद्दल या संधीचा फायदा घेऊन मी त्यांचे फार फार आभार मानतों.

" याच प्रसंगाचा फायदा घेऊन मी माझ्या देशबंधूंस असें विनवून सांगतों कीं, दांडगाईच्या अथवा 'शाक्तपंथाच्या' नादीं लागूं नका. आपलीं गाऱ्हाणीं अनेक आहेत व तीं वाजवी आहेत. खऱ्या सुधारणासाठीं स्वार्थत्यागपूर्वक अहर्निश झटा, धीरानें व नेटानें उद्योग करा, ब्रिटिश राष्ट्राच्या न्याय बुद्धीस व सदसद्विवेकबुद्धीस आपल्याकडे वळविण्यांत कसूर करूं नका."

दादाभाई नोरोजी

वर दिलेलें पत्र 'परम पूज्य' दादाभाईंच्या स्वदस्तूरचें आहे. खऱ्या कॉन्स्टिटयूशनल चळवळीचें आद्यप्रवर्तकत्व जर कोणा हिंदी माणसास द्यावयाचें असेल. तर तें एक दादाभाईंसच देतां येईल, असें 'ज्ञान प्रकाश' कर्ते मोठ्या कळकळीनें कळवीत आहेत.

बंगाल्यांतील बाँब प्रकरणासंबधानें सर्व गुप्त माहिती पोलिसांस देणाऱ्या नरेंद्रनाथ गोस्वामीला त्याच प्रकरणांतील दोन आरोपींनीं अलीपूरच्या तुरुंगांत ठार केल्यामुळें कलकत्त्यास मोठीच गडबड उडाली आहे. सत्येंद्रनाथ आणि कन्हय्यालाल यांनीं नरेंद्रास या पूर्वीच असा प्रकार होणार असल्याचें आश्वासन दिलें होतें आणि सत्येंद्रानें कोर्टांत एकदां त्यास लाथ मारून व त्याच्या अंगावर थुंकून आपला मनोभावहि व्यक्त केला होता. नरेंद्रा जवळ आत्मरक्षेसाठीं नेहमीं पिस्तुल सज्ज असें असें ह्मणतात. नरेंद्र सशस्त्र आहे, झटापटींत कादाचित् त्याच्या पूर्वीं आपणच प्राणास मुकूं हें माहित असूनहि कन्हैयानें त्याच्यावर चाल केली यावरून ते माथेफिरू किंवा म्याड असावेत असें कोणीही ह्मणणार नाहीं. नरेंद्राखेरीज इतर पुष्कळ लोकांनीं बाँबच्या प्रकरणांत पोलिसास मदत केली असली पाहिजे. पण अद्याप नरेंद्राखेरीज दुसऱ्या कोणाच्या जिवाला अपाय झालेला दिसत नाहीं. आपल्या विरुद्ध पोलिसास मदत केल्याच्या कारणावरूनच सत्येंद्रानें नरेंद्रास ठार केलें असें ह्मणतां येत नाहीं. त्या पेक्षांहि सबळ असें कारण या प्रकारांत असलें पाहिजे आणि तें विश्वासघात हेंच असावें. बाँबवाल्यांच्या कटांत नरेंद्र अगदीं विश्वासु मनुष्याप्रमाणें वागून शेवटीं त्यानें दगा दिला याची जास्त जास्त चीड आलेली दिसते. नरेंद्राच्या मृत्युमुळें बाँब प्रकरणांतील फिर्यादपक्षाची बाजू जशी लंगडी पडलेली आहे त्याचप्रमाणें या प्रकरणांतील आणखी एका गोष्टीचा खुलासा होण्याचा एक मार्ग नाहींसा झाला आहे. बाँब प्रकरण प्रथम उपस्थित झालें तेव्हां, एक पोलिसचा मनुष्य बाँबवाल्याच्या कटांत प्रथमपासून सामील होऊन अगदीं विश्वासू मनुष्याप्रमाणें तेथें वर्तन करीत होता, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष बाँब भरण्यांतहि तो मदत करीत होता आणि त्याच्या मार्फत सर्व हकीकत पोलिसास वरचेवर कळत होती, अशी बातमी अँग्लोइंडियन पत्रांनीं प्रसिद्ध केली असल्याचें आह्मांस आठवतें. ही बातमी एकअर्धा दिवस तारांतून फडकली नाहीं तोंच ती पुनः लुप्त झाली. आणि त्यानंतर तिचा पुनः केव्हांहि उल्लेख झाला नाहीं. नरेंद्र हायकोर्टांत साक्ष देण्यास जिवंत राहाता तर कदाचित् मागें पुढें या बातमीचा कांहीं खुलासा त्याचेकडून होण्याचा संभव होता. परंतु आतां तो मार्ग अजीबात खुटला!

---

## महोत्सव

यंदा श्रीगणपतीचे महोत्सव दोन तीन झाले पण ते चांगल्या सार्वजनिक स्वरूपाचे होते. अलिकडे या महोत्सवा मधून धर्मोन्नतीच्या बाबीपेक्षां करमणूकीला अधिक आश्रय मिळत चालला असे. पण अगदीं अलिकडे या महोत्सवाच्या प्रसंगीं सार्वजनिक कल्याणाच्या गोष्टींचा वादविवाद करण्याचा प्रघात हळूं हळूं अधिक पडत चालला आहे. आणि या रीतीनें करमणूकींत शिक्षणाचीही भर बरीच पडते. पुण्या मुंबईकडे तर श्री गजाननाच्या महोत्सवामध्यें दिल्लीकडील सुप्रसिद्ध वक्ते सय्यद हैदर रेझा यांचीं व्याख्यानें या सालीं झालीं आणि हिंदूंच्या महोत्सवांत मुसलमानांनींही अपेसरत्व घेण्याला माघार घेऊं नये आणि तद्वत् मुसलमानांच्या महोत्सवामध्यें हिंदूंनींही पुढाकार घेण्यास शिकावें असें नवीन धोरण तरुण पिढीला लागत चाललें ही विशेष अभिनंदनाची गोष्ट होय. आकोल्याच्या महोत्सवांमधून राजश्री देसाई, मराठे, दाते इत्यादिकांचीं व्याख्यानें श्रवणीय अशीं झालीं. व्याख्यानांचे विषय प्रचलित स्थितीसंबंधानेंच असून उन्नतीचे मार्ग शोधण्याकडे लोकाची दृष्टीचें लावण्या साठींच होते. बहुतेक भाषणांचा ओघराजनिष्ठेच्या दृष्टीनेंच लोकसमुहाला स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य इत्यादि मोहक व प्रस्तुत कालाला आवश्यक अशा उपायांची माहिती करून देण्याकडे होता. स्वार्थत्याग आणि सद्भाव ह्या दोन्ही गोष्टी डोळ्यापुढें जागृत ठेवण्या संबंधानें लोकांना व्याख्याते आग्रहानें उपदेशीत असत. पुष्कळदां असें अनुभवास येतें कीं जहालपक्ष लोकांस चटकन आवडतो पण त्याचें तें विशिष्ट असिधाराव्रत पाळण्याची बहुतकामध्यें ताकद नसते; इतकेंच नव्हे तर सामान्य नेमस्तांच्या दृष्टीनें उखलपणा, अमर्यादपणा इत्यादि दोषप्रवर्तक दुर्गुण मात्र पुष्काळ जहाल ह्मणविणाऱ्या लोकांच्या बोलण्यांत व वर्तनांत संचारले दृष्टीस पडतात. आणि जेव्हां जेव्हां या दुर्गुणांचे साम्राज्य प्रबल होतें तेव्हां तेव्हां देशावर किती आपदा येतात हें पाहण्यासाठीं जुन्या इतिहासाकडे वळण्याची जरूरच नाहीं. प्रस्तुच्या कालचा हा इतिहास आपली गोष्ट अनुभवाच्या उज्वल प्रकाशांत अगदीं स्पष्ट स्पष्ट करून सांगत आहे. तुह्मी सरकारला प्रजाद्रोही ह्मणा किंवा प्रजेला राजद्रोहीह्मणा तात्पर्य जवळ जवळ असें दिसतें कीं सरकार व प्रजा या दोहोंची एकवटलेली देवमूर्ती न बनतां सरकार व प्रजा हीं व्यक्तिशः भिन्न व पृथक् होत चाललीं आहेत. आणि प्रजा जहाल जर सरकारही जहाल या न्यायाचें धोरण सध्यां मुख्य दिसतें. भूतदयेचा व उदारपणाचा कितीही प्रस्ताव राज्यकर्त्यांनीं केला तरी प्रत्यक्ष वर्तनामध्यें पृथक् भावाच्या कृति दिसून येतात. आह्मी असें इच्छितों कीं हा पृथक् भाव जितका लवकर नष्ट होईल तितकें बरें. उभय पक्षांनीं आपापल्या वर्तनाचा जमाखर्च ताडून पहावा आणि तडजोडीच्याच दृष्टीनें दोघांच्या हिशेबांचा एक वेळ अखेर निकाल होऊन प्रजेची बाकी सरकारकडे किती आणि सरकारची बाकी प्रजेकडे किती याचा निकाल होणें अगदीं जरूरीचें आहे. सरकारच्या पक्षाचे फडणीस ह्मणजे व्हाईसराय साहेब व प्रजापक्षाचे फडणीस ह्मणजे राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होत. लार्ड कर्झन यांनीं जरी हा पडताळ्याचा मेळ होऊं दिलां नाहीं आणि सर कॉटन यांची मुलाखत घेतली नाहीं तरी आतां तरी यापुढें एखादी बैठक या पद्धतीची होणें आवश्यक आहे. आह्मी श्री गजाननापाशीं अशी प्रार्थना करितों कीं त्याच्याच सुप्रेरणेने सरकार व प्रजा हीं एकनिष्ठ व भक्तीमान होवो आणि सांप्रत देशावर आलेले हे संकटाचे ढग नाहींतसे होऊन या देशाला पुन्हा सोन्याचा दिवस चांगला लाभो!

---

## पटांगण

आकोल्याचे नवीन 'श्रीराम' थिएटर हें सार्वजनिक व्याख्यानांना देखील अत्यंत उपयोगी असें आहे पण तेथें होणाऱ्या व्याख्यानांची अभिवृद्धी होऊं नये असे या जिल्ह्याच्या सरकारच्या नजरेस आलें आणि कांहीं विवक्षित मार्गानें या थिएटरचे मालक रा० रा० बच्चुलाल गेंदुलाल यांस व्याख्यानें न होऊं देण्या संबंधानें सूचना पोहचली. रीतीप्रमाणें रा० बच्चुलाल यांनीं आपल्या नाटकगृहांत व्याख्यानें न होऊं देण्याची व्यवस्था अमलांत आणली. ही कुलुपी गोळी लोकांस रुचली नाहीं ह्मणून निरुपायास्तव हल्लीं कांहीं जाहिर सभा येथील श्रीमारुतीच्या पटांगणांत भरवाव्या लागल्या आहेत आणि गेल्या गुरुवारपासून काल पर्यंत तेथें चार व्याख्यानें झालीं. व्याख्याते उमरावतीचे रा. वामनराव जोशी व यवतमाळचे रा. शामराव देशपांडे हे असून त्याशिवाय अध्यक्षाच्या नात्यानें राजश्री देसाई व त्यांच्या आज्ञेनें रा. माधवराव मराठे यांच्या व्याख्यानांचा लोकसमुहास सहाजिक लाभ होत आहे. श्रोतृसमूह चांगला जमत असतो ह्मणजे निदान दोन तीन हजार लोक जमत असले पाहिजेत. श्री रामदास यांना आपला शिष्यवृंद पुष्कळ वाढला ह्मणून काळजी करण्याचें जसें प्रयोजन पडलें नाहीं तसेंच हल्लीं वाढत असलेल्या जहाल शिष्यवृंदापासून त्यांच्या गुरूंनांही भिती नसलीच पाहिजे. कार्याच्या कसोटीच्या वेळेला कल्याण शिष्यच गोमांतकी आंबा खाण्यास शिल्लक राहिला तद्वत् निर्वाणीच्या प्रसंगीं स्वदेशी, बहिष्कार इत्यादि कडकडीत पाळणारे राजश्री टिळकासारखे किंबहुना तेवढेच ते सांपडतील. ही गोष्ट सांगण्याचें विशेषतः प्रयोजन असें कीं उपदेशक फार झाले आहेत व आडनावी शिष्यही फार झाले आहेत. आणि बहुजन समाजाला जो उपदेश आपल्या कृतीमध्यें आणतां येणार नाहीं असला उपदेश रेलचेलीनें सांगण्यांत येतो. सांप्रत इतर शिक्षणांच्या बाबींना बाजूला सारून एकाच राजकीय शिक्षणाचा एकाच अंगानें तोच तोच उपदेश पुनः पुनः होत आहे आणि हा प्रस्तुत चळवळींतला दोष लवकर दूर झाला पाहिजे.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामान—सध्यांची उघाडी मोठी बहार करून देत आहे. रोगराईही ह्मणण्यासारखी विशेष नाहीं पण उमरावतीस मात्र प्लेगाचें मान कमी होत नाहीं.

हिंदीकेसरीचें संपादक राजश्री माधवराव सप्रे यांस गेल्या गुरुवारीं सेशन कमीट करण्यांत आलें आणि देशसेवक कर्ते राजश्री अच्युतराव कोल्हटकर यांच्यावर अरविंद बाबूंचीं व्याख्यानें प्रसिद्ध केल्याबद्दलची जबाबदारी सिद्ध करण्यासाठीं आज रोजीं पुनः साक्षीदार होणार आहेत.

रा. रा. हनुमानसिंग सरकल इन्स्पेक्टर बुलडाना यास तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत येऊन त्यांच्या जागीं रामकृष्ण गोपाळ सब इन्स्पेक्टर यांस सरकल इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें आहे.

बुल्डाण्यास रा. पन्नालाल व्यास यांच्यावर राजद्रोहाच्या भाषणा संबंधानें जो जामीन मागण्याचा खटला चालू आहे त्या प्रकरणांत मेजर कोलब साहेब यांच्या पुढें साक्षी साठीं सरकार तर्फे बोलावलेल्या वकील गृहस्थांची विनाकारण कुचंबणी होत आहे अद्याप निकाल बाहेर आला नाहीं.

## नोटीस

वंडू वल्लद दुलाजी धोबी
त तालुके आकोले
यांसः—

ी करणार ईजकडून नोटीस ...कीं मी तुझी लग्नाची बायको ...होण्यास १०।१२ वर्षे झालीं. तुमचे घरीं सरासरी १॥ वर्षे ... सरासरी पाच सहा वर्षे झालीं ... झाले. त्यानंतर मला १ वर्ष ... वागविले. नंतर तुमचे आईची ...ईशीं भांडण झाल्याबद्दल तुह्मी मला टाकू... दिले. तेव्हांपासून मी आपले आई बापाचे घरीं राहात असे. तुह्मी मला अन्नवस्त्र दे... नसल्यामुळें मी लोकांचें कर्ज काढून उदर निर्वाह करीत आहे. तरी तुह्मांस ह्या नो...शीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत तुह्मी मला आपले घरीं घेऊन जावें ह्या प्रमाणें न केल्यास तुमचे वर अन्नवस्त्राबद्दल फिर्याद करून कोर्ट खर्चासह रकम भरून घेतली जाईल तुह्मी मला वागविण्यास घेऊन न जाल तर ही नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझेवर कोणतेच प्रकारें हक राहणार नाहीं. हे तुह्मास कळविले आहे. कळावें. ता० ७-९-०८ इ०

सही

बायजी मर्द वंडू धोबीण रहाणार
अकोलखेडे हल्लीं रहाणार
अडगांव खुर्द. नि० खुद.
लालु वल्लद जानकीराम धोबी.

नं. घ. ३३

## नोटीस

मुजाई मर्द गंगाराम राहणार माणकी ता. व पो. बाळापूर

ईसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं. आमचा चुलता गंगाराम यास मयत झाल्यास अंदाजा २५-२६ दिवस झाले. गंगाराम याचे तुझ्या मागे आह्मीच वारस आहों. त्याला मुलबाळ कांहीं नाहीं. आह्माला असें समजतें कीं तूं सर्व इस्टेट विकून टाकून दुसरा घरठाव करणार आहेस. तर या नोटिशीनें तुला असें कळविण्यांत येतें कीं त्याची इस्टेट शेतें ३ शेत सर्वे नंबर एकर गुंठे आकार रु.

| | | |
|---|---|---|
| (१) २६ | १६८३९ | २७ |
| (२) ८६ | १९८२७ | १९ |
| (३) ७१ | ११८११ | १७ |

मौजे माणकी येथील व घर २० खांबाचें वगैरे इस्टेट तूं कोणास विकूं नयेस. तूं आमच्या कुळांत ...आहेस तोपर्यंत वाहून ...येस. तुला त्या इस्टेटीवर कर्ज वगैरे को...ाचा गहाण, खरेदी अगर बक्षिस देण्याचा अधिकार नाहीं. इतक्या उपर जर कोणास कोणत्याहि प्रकारे इस्टेट लिहून देशील तर त्याबद्दल इस्टेट जबाबदार न राहतां त्याची सर्व जबाबदारी तुझ्या जातीवरच राहिल. कोणी फसूं नये ह्मणन नोटिशीनें कळविलें आहे. कळावें ता. १०-९-१९०८ इ.

सह्या

(१) राजाराम वल्लद बाळाजी माळी पेठकार रा. माणकी हल्ली वस्ती वाडेगांव निशाणी खुद
(२) उदेभान रामजी माळी पेठकार राहणार माणकी निं. खुद
(३) शिवराम वल्लद जानूजी माळी पेठकार राहणार माणकी नि. खुद

नं. घ. ३४

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें असें कळविण्यांत येतें कीं गंगाराम पेठकार हा मयत होऊन २५-२६ दिवस झाले. याला वारस फक्त बायको आहे. व तिच्या मागे आह्मी त्या सर्व जिनगीचे वारसदार आहो. आतां अह्मास असें समजतें कीं गंगाराम याची बायको सजाई ही त्याची सर्व इस्टेट शेतें ३

| शेत वर्से नंबर | एकर गुंठे | आकार रु. |
|---|---|---|
| २६ | १६८३९ | २७ |
| ८६ | १९ २७ | १९ |
| ७१ | ११८११ | १७ |

व घर २० खांबाचें वगैरे इस्टेट विकून ती दुसरा नवरा करून जाणार आहे ह्मणून सर्वत्रास या जाहिरातीनें असें कळवितों कीं कोणी सजाई जवळून वरील इस्टेट गहाण, खरेदी, बक्षीस घेऊं नये व तिला कर्जही देऊं नये या उपर जर कोणी तिच्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करील तर त्या बद्दल इस्टेट जबाबदार न राहतां त्याची जबाबदारी व्यवहार करणारांच्यास शिरावर राहील. कोणी फसून नये ह्मणून सुद्राम सुचना केली आहे. कळावें आज ता. १०-९-०८

सह्या

(१) राजाराम वा॥ बाळाजी माळी पेठकार राहणार मणकी हल्ली वस्ती वाडेगांव नि. खु.
(२) उदेभान रामजी माळी पेठकार राहणार माणकी नि. खु.
(३) शिवराम वा॥ जाणूजी माळी पेठकार राहणार माणकी नि. खु.

नं घ. ३५

## नोटीस

नोटीस बेशमी— शामलाल विसनदास दुकान उंबरे ता० अकोट यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी आह्मास वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांतून दिलेली नोटीस पावली. त्या नोटिशीचें उत्तर तुह्मांस मी देतो. तुह्मी त्या नोटिशींत जो मजकूर लिहिला आहे तो सर्व खोटा आहे. अशा खोट्या नोटीशीपासून आह्मांस कोणतेच प्रकारें भिण्याचें कारण नाहीं. तुमच्यासारख्या भल्या मनुष्यानें अशी खोटी नोटीस देणेंच चांगलें नाहीं. असो. तुमची मर्जी कळावें. तारीख २ माहे सप्टेंबर सन १९०८ इ०

सही

रामसूक कन्हैयालाल मारवाडी

नं. घ. ३६ दस्तुर रामसूक.

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस—

सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०८१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप रायी ( ग्वालेर ) | श्रीमंत नानासाहेब फाळके दप्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.
स्थापना सन १९०७
भांडवल एक लक्ष रुपये.
प्रत्येक भाग २५ रुपयाचा
याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरँडम् व अर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्राॅस्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून
**पी. सी. जोगळेकर आणि कंपनी**
**म्या. एजंटस्**

नं. १३

नाहि सत्यात् परोधर्म

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवीं पाठवित असतो माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व बक्षशिर पाठवीला जाईल. आह्मांस शेंकडों पत्र आलीं आहेत.


पत्ताः—

श्रीनिवास बाळकृष्ण हो.. जनरल मर्चंट व कामिशन एजंट.

नं ७२ येवले.

दोन घड्याळें एकदम बोलावणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिश्या बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घड्याळ बक्षीस साखळी मुद्धां शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घड्याळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.

नं. ४७. मुंबइ पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.
सायकल टीचर.

पत्ताः----
अहमद अली कासमजी बोहरा
नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

## देशी दवाखाना

( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवखाना पुन्हा चालूं केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेली असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे गरजूं लोकांनी अनुभव घेऊन पाहावा भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रीस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी बाळंतरोग, पडू इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ताः—वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोले येथें शहरांत मुलीचे शाळेजवळ

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३० आकोला

नं. ख. १

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें बारकाईनें पाहून आमचीं औषधें त्या त्या रोगांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हांस दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत.

आमच्या या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें व गरजूंस तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्त शोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसात एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनाने नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट पारा, मुष्ठमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती, व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचविण्याची शक्ति येते त्यांना उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटे मिळाली आहेत आणि मिळत आहेत. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्त्यावर मिळतील.

दर:-एकदम ३९ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६९ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, व इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:-कोणताही नवा जुना परमा व उष्णजन्य दाह तिडीक मुताची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसात जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १। भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पुडः-दंतांचे सर्व विकार उत्तम बरे.

५ विंचूचें विषः-औषध लावताच उतरतें पुडी ३ तो. ८ आणे

६ कर्णः-सद्रूप, गाटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः-औषध घेतांच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठींस मलम, बाहेर पडू नये म्हणून सावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. मो.

९ आमच्या औषधांचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण गुणकारकांची खासडयाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. यांशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म पाक, गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोगीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान, सकळवृत्तास रोगाची निदान चिकित्सा करूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका जणानें केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो शीवस्येंत येऊन आणखीही जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं कारखाना आज सतत १९।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधांनें लोक डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें केव्हांवधी ग्राहक झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचीं औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकुण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—BOMBAY

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to givensum, but it is essential to know how such Funds are invested— if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hrough decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, otessional men, Tradesmen and others*, by employing a portion of their annual income or profits in effecting life po once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he di searly, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes bupqismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a mouth or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained n application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

No. 2

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२ ] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १४ माहे सप्टेंबर सन १९०८ इसवी [ अंक ३६



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.

नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल्दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज मार्हा नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं ७३ } G. A Phillips एजंट

## बंगला विकाऊ

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर डिस्ट्रिक्ट जज्ज चांदा, मध्यप्रांत यांचा आकोला येथील बंगला विकावयाचा आहे. जनरल पोस्ट आफिसा समोरील विस्तीर्ण मैदानावर उभा आहे. ग्राहकांनीं विशेष विचारपूस खालीं सही करणाऱ्याकडे करावी. ता० १८–९–०८ इ०

नारायण खंडेराव फडके
वऱ्हाडसमाचार आकोला.

जपानचा इतिहासः— रा. महादेव कृष्ण पाध्ये. बि. ए. बि. एल. कृत पृष्टें ४२१ किं. साधिबांधणी १। रु०. विशेष बांधणी २ रु०. केसरीकारांचा अभिप्रायः—

रा. रा. महादेव कृष्ण पाध्ये बी. ए. एल. एल. बी. नागपूर, यांनीं हा सुमारें ४। शें पानाचा ग्रंथ जपान देशासंबंधानें पाश्चात्य व जपानी लेखकांनीं केलेल्या पुस्तकाच्या आधारानें मराठींत लिहिला आहे. यांत पौराणिक काळापासून तो तहत परवांचें रुसो–जपानी युद्ध संपेपर्यंतचा जपानचा संगतवार इतिहास दिला आहे. देशाची नैसर्गिक स्थिति, धर्म व सामाजिक स्थिति, शिक्षणपद्धति, व्यापार व उद्योगधंदे इ. प्रकरणांतही रा. पाध्ये यांनीं उपयुक्त व मनोरंजक माहिती दिली आहे.

* * * * * * * * * * *

एकंदरींत ग्रंथांतील विवेचन स्पष्ट मुद्देसुद व वाचनीय झालें आहे यांत संशय नाहीं. जपान देशाचे इतिहासाच्या कांहीं विशिष्ट शाखावर रा. देव यांची जपानची मर्दुमकी वगैरे सारखीं पुस्तकें झालीं आहेत. पण जपान देशाचा सांगोपांग व संगतवार इतिहास मराठींत झाला नव्हता; ती उणीव रा. पाध्ये यांच्या या इतिहासानें भरून येईल अशी आमची खात्री आहे. पुस्तकाचें बाह्यांगही उत्तम झालें असून त्यास महाराष्ट्रीय वाचकांकडून चांगला आश्रय मिळेल अशी आह्मांस उमेद आहे केसरी ता. १३ जा. १९०७

म्यानेजर ' हितवाद


## वर्तमानसार

ता. १४ रोजीं एक निनांवीं हस्तपत्रक हायकोर्टाच्या लायब्ररींत सांपडलें. त्याचप्रमाणें दुसरें एक हस्तपत्रक शहरच्या उत्तर भागांत वाटण्यांत आलें. पोलीस तपास चालू आहे. परंतु या प्रकाराच्या सूत्रचालकाचा अद्याप तपास लागला नाहीं. युगांतरकंपूचेंच हें कृत्य असावें असा तर्क आहे. खुदीराम बोस व प्रफुल्लचंद चक्री यांची स्वर्ग लोकांतील न्यायसनापुढें चौकशी चालली आहे असा प्रसंग कल्पून त्यांत एक स्वरूप केलेलें आहे. कै. वा. सर रोमेशचंद मित्र हें न्यायाधीश असून कै. मि. मनोमोहन घोस हे आरोपीतर्फे वकील आहेत. फिर्यादीतर्फे साक्षीदार फक्त नरेन्द्र गोस्वामीच कल्पिलेला आहे. कलकत्ता येथील बातमीखात्यांतील कांहीं अधिकाऱ्यांच्या नांवानें धरपकडीचीं वॉरंटें सोडण्यांत आलीं असल्याचेंही त्यांत ध्वनित केलें आहे.

अलाहाबाद येथील म्यूर सेंट्रल कॉलेजमधील बी. ए. च्या वर्गांतील केदारनाथ नांवाच्या बोर्डिंगांतील विद्यार्थ्यांच्या खोलींत खुदीराम याचा फोटो होता तो त्यानें आपल्या जवळ कां बाळगिला याविषयीं कॉलेजचे प्रिन्सिपाल मि. जेनिंग्स यांनीं त्यांस खुलासा विचारला; परंतु त्यानें दिलेलें उत्तर साहेबबहादूरास समाधान कारक न वाटून त्यांनीं केदारनाथ यास कॉलेजमधून तावडतोब घालवून दिलें.

बॉम्बच्या खटल्यांतील आरोपींच्या दुसऱ्या तुकडीची चौकशी अलीपूर येथील मॅजिस्ट्रेट पुढें ता० १४ रोजीं पुरी झाली. आठ आरोपींपैकीं ज्योतीन्द्रनाथ बानर्जी (सन्याशी वेषधारी) यांस, त्यांचा संबंध कटाशीं १९०६ नंतर असल्याचा पुरावा पोलिसकडून भरपूर पुढें आला नाहीं ह्मणून सोडून देण्यांत आलें. बाकीच्या सात आरोपींस इ. पि. कोडच्या १२१, १२१ अ, १२३ या कलमांखालीं सेशन्स कमिट केलें. या आरोपीपैकीं एकानें आपण फ्रेंच सरकारच्या प्रजाजनापैकी असल्यामुळें आपली चौकशी ब्रिटिश कोर्टाकडून होऊं नये अशी तक्रर केली. याबद्दल मॅजिस्ट्रेट ह्मणालें कीं, मी न्यायाधिकारी असल्यामुळें मला १८७६ च्या दोन्ही सरकारांमधील तहाच विचार करण्याचें कारण नाहीं. हा प्रश्न त्या उभयतां राष्ट्रांच्या सरकारांमधील आहे.

सोलापूर येथें पूर्वी प्रसिद्ध होत असलेल्या 'स्वराज्य' पत्राचे संपादक रा० बळवंत शंकर लिमये व मुद्रक रा. सायन्ना यांजवर इ. पि. कोडच्या १२४ अ व १५३ अ कलमाखालीं खटला चालला होता. या खटल्याचा ता० १४ रोजीं दुपारीं सोलापूरचे सेशन्स जज्ज यांनीं निकाल सांगितला. संपादक रा० लिमय यांस १२४ अ च्या आरोपाबद्दल तीन वर्षे सक्तमजुरी व १५३ अबद्दल ६ महिने सक्तमजुरी व रा० सायन्ना यांस पहिल्या आरोपाबद्दल ९ महिने व दुसऱ्याबद्दल तीन महिनें अशा शिक्षा देण्यांत आल्या. रा. सायन्ना यांची कैद साधी असून दोन्ही शिक्षा एकदम भोगावयाच्या आहेत. निकाल एकल्यावर रा. लिमये यांनीं आपलें जानवें काढून आपल्या बंधूंच्या स्वाधीन केलें. उभतांस जेल्कडे नेतांना लोकांचा समूह त्यांच्या मागोमाग 'वंन्देमातरं' ह्मणून ओरडत जात होता. फोटो घेण्याची बंदी करण्यांत आली. असेसरांनीं आरोपी निर्दोषी आहेत असें मत दिलें होतें.

करूर येथील राजद्रोहाच्या खटल्यांतील आरोपी कृष्णस्वामी शर्मा याच्यावर इं. पि. कोडाच्या १२४ अ १५३ अ आणि ५०५ कलमाखालील गुन्हे केल्याचे आरोप शाबीत धरून सेशन्स जजांनीं त्यास पांच वर्षाच्या काळ्यापाण्याची शिक्षा १२४ अ कलमाखालील गुन्ह्याबद्दल दिली. दुसऱ्या दोन कलमाखालच्या आरोपाबद्दल त्यास शिक्षा देण्यांत आली नाहीं.

युगांतर पत्राचा अंक पुन्हां निघाला असून आणखी अर्धा डझन खुदाराम कलकत्ता शहरांत संचार करणार असल्यामुळें बंगाली लोकांनीं आपलीं बायकापोरें बाहेर पाठवून द्यावीं, असा त्या पत्रानें इशारा दिल्याची वंदता आहे.

नेगंवकमच्या सरोवरामवरून जाणाऱ्या दोन युरोपियन बायांवर हल्ला केल्याबद्दल वारस्वामी नांवाच्या इसमास सैदापेठ येथील मॅजि० नीं तीन महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा दिली. आरोपीला सोडून द्यावें, असें एका बाईचें ह्मणणें होतें व आरोपीचा हा पहिलाच गुन्हा असल्यामुळें सौम्य शिक्षा दिली आहे. असें मॅजि० यांनीं निकालांत सांगितलें. या खटल्याचें कागद डि० मॅजि० यांजकडे गेले, तेव्हां "जाती जातींत द्वेष उत्पन्न करण्याचा प्रयत्न चळवळेंखोर लोक असतां असल्या आरोपीला इतकी थोडी शिक्षा दिल्यास युरोपियन स्त्रियांना घराबाहेर पडणेंही कठीण होईल" असा शेरा मारून त्यांनीं खटल्याचे कागद हायकोर्टाकडे पाठविले; आणि हायकोर्टांतील न्यायमूर्तींनी— ज. पिन्हे यांनीं— तीन महिन्यांची शिक्षा होती ती एक वर्षाची केली.

"मराठा" व 'ज्ञानप्रकाश' या पत्रांत रा० टिळक यांच्या खटल्यासंबंधाच्या लेखांत न्या. दावर यांच्या वर्तनावर जी टीका करण्यांत आली त्याबद्दल सदर पत्रांवर कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल खटला का करण्यांत येऊं नये अशाबद्दल कारण दाखविण्यासाठीं रा. न. चिं. केळकर, रा. न. अं. द्रवीड व रा. . ना. गोखले यांना नोटीस काढण्यांत यावी" असा ॲक्टिंग ॲडव्होकेट जनरल बॅ. जार्डिन यांनीं अर्ज दिल्यावरून न्या. स्कॉट व बॅचरल यांनीं तशी नोटीस काढण्याची मजुरी दिली.

ईस्टर्न बंगाल स्टेट रल्वेवरील सिमुराली नांवच्या स्टेशनवर एका पॅसेंजर गाडीखालीं बॉंब उडाला. त्याबरोबर स्टेशनवरील लोकांची तारंबळ उडून गेली. उतारूही भयभीत होऊन गेले. दुखापत मात्र कोणासही झाली नाहीं. त्याचप्रमाणें गाडीचीही कांहीं मोडतोड झाली नाहीं. हा प्रकार सोमवार ता० १४ रोजीं रात्रीं घडला. ही बातमी सिल्डा येथें तावडतोब तारेनें कळविण्यांत आली. गव्हर्मेंट रेल्वे पोलीसचे इन्स्पेक्टर मि. गांगोली हे त्याच रात्रीं सिमुराली येथें चौकशी करण्याकरितां जावयास निघाले. या गाडी. बरोबर युरोपियन सार्जंट स्पेशल ड्यूटीवर होता.

थायतमियो येथें इसेक्स रेजिमेंटमधील एक सोजीर शिकारीहून परत येऊन श्रमल्यामुळें एका दुकानांत पेय घेण्याकरितां गेला. त्या दुकानांत एक जपानी स्त्री नोकरीस होती. तिनें सदरहू सोजिरास आपली बंदुक कशी काय आहे हें दाखविण्यास सांगितलें. सोजीर तिला बंदुकीचे निरनिराळे भाग दाखवित असतां अकस्मात् गोळी उडाली व ती तिच्या डोक्यांत घुसून ती मरण पावली. सोजिर तावडतोब अधिकाऱ्यांच्या स्वाधीन झाला व रात्रभर त्याला अटकेंत ठेविलें होतें.

## सुविचारसमागम

### विविधज्ञानविस्तार

या मासिकाचा आगष्ट व सप्टेंबरचा जोड अंक नुकताच निघून हें चालूं तारखेपर्यंत येऊन पोहोंचलें आहे. गेल्या मे महिन्यांत पुणें येथें भरलेल्या मराठी लेखकांच्या संमेलनांत अध्यक्ष या नात्यानें रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनीं वाचलेल्या निबंधाला आगष्टच्या भागांत अग्रस्थान दिलेलें आहे. या निबंधाचें स्वरुप आम्ही आमच्या वांचकांस या पूर्वी सादर केलेलेंच आहे. ' व्यायाम ' या विषयावर रा. गुणाजी यांचा एक लेख भागशः प्रसिद्ध होत आहे. त्यांत व्यायामाची महति व आवश्यकता प्रत्येक व्यक्तीला आपआपल्या पुरती कशी आहे तें दाखवून, शिवाय असें सिद्ध केलें आहे कीं, ' कोणत्याहि मोठ्या राष्ट्रकार्यास आवश्यक असे स्वार्थत्याग, जुटीनें–एकीनें काम करण्याची संवय, शिस्तीप्रमाणें वागणें, एकाच कार्याकरितां सर्वांनीं सतत उद्योग करणें, सत्याची आवड, आपल्या बंधूंना जय प्राप्त झाला असतां आनंदित होणें, स्वतः जय मिळविला असतां विशेष बभ्रा न करतां विनय पूर्ण असणें, पराजय प्राप्त झाला असतांही शांतपणें तो सहन करणें, व त्या मुळें हताश न होतां पुनः जय मिळविण्यास झटणें इ. इ. गुण अनेक मर्दानी खेळ खेळून पूर्व वयांतच मिळविले पाहिजेत.'

आगष्टच्या मासिक समालोचनांत बाँब स्फोटाचे मुळाशीं असलेली विचारसरणी कशी विपरीत आहे तें दाखविलें आहे. ' साध्य निर्दोष असलें म्हणजे झालें, मग साधनें कितीही सदोष असलीं तरी चालतील,' असें या विचारसरणीचें स्वरुप आहे. हीच विचारसरणी शेक्सपीअरच्या जुलियस सीझर नाटकांत अखेरीस निंद्य ठरलेली आहे हें या प्रसंगीं सहज ध्यानांत येतें. याप्रकरणाचा पूर्वसंदर्भ पहातां गेल्या दोन तीन वर्षांत हिंदुस्थानच्या राजकीय व्यवहारांत सडजोडीचा अस्त या सर्वांचे मुळाशीं आहे आणि तत्संबंधीं पापाचा बहुतेक बोजा बेफाम अंग्लोइंडियन पत्र व फाजील कार्यदक्ष अधिकारी यांच्या डोक्यावर बेलाशक लादण्यास हरकत नाहीं, असें संपादकांनीं आपलें मत दिलें आहे.

सप्टेंबरच्या भागांत पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचें विद्वान प्रिन्सिपल रा. परांजपे यांच्या हातचा एक लेख प्रथमस्थानीं आहे. आमच्या आठवणीप्रमाणें मराठींत लिहिलेला असा हा यांचा दुसराच लेख आहे. लॉर्ड मोर्ले यांच्या फुटकळ लेखांचा एक भाग नुकतांच प्रसिद्ध झाला असून त्याचा रा. परांजपे यांनीं मराठी वाचकांस परिचय करुन दिलेला आहे. लॉर्ड मोर्ले यांनीं आपल्या ग्रंथांत लिहून ठेवलेल्या तत्वाप्रमाणें ते अद्याप कसें वागत आहेत हें ही दाखविण्याचा या लेखांत प्रयत्न केलेला आहे. हा प्रयत्न सफळ झाला असो किंवा नसो, मोर्लेकृत ग्रंथांतील विचार जर ग्राह्य असतील तर त्यांचा संग्रह अवश्य करावयास पाहिजे. प्रसिद्ध फ्लॉरेंटाइन राजनीतिवेत्तां मॅकिआव्हेली याजविषयीं लोकांचा विनाकारण गैरसमज झालेला आहे असें मोर्ले यांचें मत असून त्याबद्दल त्यांनीं कारणेंही दिलेलीं आहेत. मॅकिआव्हेलीस जग कसें असावें या प्रश्नाशीं कांहीं कर्तव्य नव्हतें; परंतु जग कसें आहे येवढाच त्यानें प्रश्न घेतला होता व आहे. या जगांत कसें वागलें पाहिजे याचेंच त्यानें विवेचन केलेलें आहे.' या वरुन हें सहजच ध्यानांत येतें कीं, त्याचे हे विचार ' सर्व कालांकरितां व सर्व देशांकरितां नव्हत. मॅकिआव्हेलीला अनुभवानें असें कळून आलें होतें कीं, ' सृष्टि कांहीं नीतीच्या नियमांनीं वागत नाहीं. कारण, तसें नसतें तर युद्धें होतींना. ' अशा मनावृत्तीनें परिस्थित्यनुरुप केलेल्या प्रतिपादनाचा भलताच अर्थ होत होता. त्याचें मोर्ले यांनीं निवारण केलें आहे. हें खंडन नव्हे आणि मंडनहि नव्हे. मॅकिआव्हलीनें येथून तेथपर्यंत सर्वच कुटिलनीति सांगितलेली नाहीं. त्याच्या विचारांत सर्व कालाला व सर्व स्थळीं लागूं अशीं अनेक स्थलें आहेत आणि मोर्ले साहेबांनीं त्या त्या ठिकाणीं त्यांसंबंधानें आपली स्पष्ट अनुमती दर्शविली आहे. यांपैकीं एकदोनच येथें दिलीं तरी पुरेत.

'आपल्या सत्तेखालीं असणाऱ्या लोकांच्या दुर्गुणांविषयीं कोणत्याही राजानें कुरकुर करूं नये. कारण ते दुर्गुण आपल्याच निष्काळजीपणामुळें किंवा आपल्याच उदाहरणानें आलेले असतील, असा मॅकिआव्हेलीचा राजास उपदेश आहे.'

' प्रजेनें आपला द्वेष न करणें हें हजारों किल्यांपेक्षां किती पट तरी चांगलें, '

' हल्लींच्या पूर्ण लोकसत्तात्मक राज्यांतहि चांगल्या नांवाखालीं, मॅकिआव्हेलीच्या उपदेशाप्रमाणें, नांव राखून मर्म हिरावून नेणें अशा गोष्टी पुष्कल होत असतात ' हें लॉर्ड मोर्ले यांस हिंदुस्थानचा राज्यकारभार हातीं घेण्यापूर्वींच दहावर्षें कळलेलें होतें.

गिब्बार्दिनी या इतालियन इतिहासकारासंबंधानें लॉर्ड मोर्ले यांस मोठा आदर आहे. या ग्रंथकाराचे सार्वजनिक व्यवहारासंबंधाचे विचार असे आहेत.

लोकमान्यतेची किंमत अब्रूपेक्षां जास्त मानूं नको, कारण अब्रू गेली म्हणजे लोकमान्यताहि जाते. परंतु ज्याची अब्रू कायम आहे त्याला मित्र, आदर व लोकमान्यता हीं कधीं कमीं पडावयाचीं नाहींत.

'साध्या भाषणांतहि दुसऱ्याला कळल्या तर झोंबतील अशा गोष्टी थट्टेनेंहि बोलूं नये. कारण अकल्पिक वेळीं व रीतीनें याच गोष्टींनीं तुम्हांस त्रास पोहचेल.

या दुसऱ्या उपदेशाचें ज्ञान रा. परांजपे यांस अनुभवानें अलिकडे झालेंच आहे. त्याच प्रमाणें ' भली नव्हे थट्टा, भल्याभल्यासि लाविला बट्टा ' हें संतवचनहि त्यांनीं सतत ध्यानांत वागवावें, अशी त्यांस आमची नम्रपणाची सूचना आहे.

फ्रेंच तत्ववेत्ता कॉंट यानें स्थापिलेल्या मानवीधर्म साम्राज्यांत होऊन गेलेल्या वीरांचीं चरित्रें हा एका निबंधाचा विषय आहे. ज्यांनीं जगांत सुव्यवस्था नांदवी म्हणून परिश्रम केले असतील त्यांना, प्रगति करणारांपेक्षां जास्त महत्व देणें हें लॉर्ड मोर्ले यांस रास्त दिसत नाहीं.

जॉन स्टुअर्ट मिल्ल हे मोर्ले याचे गुरु होते, हें प्रसिद्धच आहे. आपल्या गुरुच्या राजकीय धोरणासंबंधानें मोर्ले यांना मोठा आदर आहे. ' लोकांच्या विचारांना वळण लावून मग त्या मुळें जगांतील उलाढाली घडवून आणाव्या अशी मिल्लची महत्वाकांक्षा होती व ती फार उच्च होती असें म्हटलें पाहिजे' असें लॉर्ड मोर्ले यांनीं म्हटलें आहे. गुरुपरंपरेचा आदर अभिमानाच्या पदापर्यंत गेलेला आहे किंवा कसें या विषयीं निदान आम्हांस तरी शंका आहे.

'मध्यम व उच्च शिक्षण इंग्रजीच्या द्वारें दिल्यापासून होणारे तोटे' सर्वांस स्वनुभावें चांगले कळतच आहेत. आणि ' ते न व्हावे या साठीं कांहीं उपाय 'योजण्याची आवश्यकता सर्वांस भासूं लागली आहे. पण या बाबतींत कोणी अद्याप उद्योगाला सुरवात करीत नाहीं हें खरोखरच शोचनीय आहे. हें शैथिल्य झाडून टाकण्यास रा. गोखले यांच्याच लेख कांहीं प्रमाणानें तरी उपयुक्त होईल अशी उमेद आहे. स्वतंत्र रीतीनें शिक्षण देणारी महाराष्ट्रांतील एक शाळा या मार्गानें प्रयत्न करीत आहेच पण सरकारी शिक्षणपद्धतीशीं संलग्न असलेल्या खाजगी विद्यालयांनींही हा प्रयोग सिद्धीस नेण्यास पुढें सरसावलें पाहिजे.

'भारतीययुद्ध ' या पुस्तकाचें परीक्षण करतांना परीक्षकानें महाभारत कालीन समाज स्थितींतील दोनचार अंगांचें नमुनेवजा समालोचन करुन, " भारतीय काळच्या समाज स्थितीचें चित्र लोकांपुढें उभें करुन त्यांना अंधेरांतून उजेडांत आणल्यास केवढी बहार होईल असे उद्गार काढले आहेत. ही अपेक्षा रा. ब. वैद्य यांनीं इंग्रजींत एक ग्रंथ लिहून अंशतः पुरी केलेली आहे. आणि चिपळूणकर मंडळीच्या हस्ते प्रकाशित होणाऱ्या भारताचे समग्र भाषांतराचे शेवटीं उपसंहाररुपानें रा. हरी नारायण आपटे हेहि त्या कामांत बरीच भर घालणार आहेत अशी कल्पना आहे.

इंदूरचे सरदार माधवराव किबेसाहेब यांनीं 'आर्यधर्माची उत्क्रांती' कसकशी होत गेली हें एका निबंधांत दाखविलें आहे. येवढ्या विशाल विषयाचा समावेश दहा पानांत झालेला असल्यामुळें सदर निबंध अगदीं सूक्ष्म होऊन बसला आहे. पण त्यांत श्री. किबेसाहेबांची या विषयावर लिहिण्याची पात्रता चांगली प्रत्ययास येते. त्यांची विषय प्रतिपादनाची शैली आटोपसर असून इतकी विशद आहे कीं साधारण जनांसहि त्यांचा लेख वाचून सहज समजण्याजोगा आहे. त्यांतील आशय असा आहे, कीं प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु इ. वचन आर्यधर्माचें सततचें लक्षण नव्हे. तत्वज्ञान व मानसिक उन्नति होण्या करितां तत्सदृश ठेवलेला आचार तो धर्म होय. ही कल्पना वेदांत दिसून येते. आर्यधर्माचें जातिभेद हें विशिष्ट स्वरुप वैदिक काळापासूनचें आहे. अक्षर या नामभिधानानें ब्रह्माचें स्वरुप सिद्ध करण्याची पद्धति उपनिषद् काळापासून भगवद्गीतेच्या कालापर्यंत कायम होती. ब्रह्मक्षत्रियादिक वर्णांचीं कर्में प्रकृतिनुरुप ठरलीं व तीं तशींच दीर्घकालपर्यंत चालूं राहिलीं पण ब्राह्मण व क्षत्रिय यांनीं एकमेकांचीं कर्में करुन दोन्हींचा प्रचार सर्वत्र करण्याइतकें लोकसंग्राहकत्व त्यांत नसल्यामुळें अनार्यांच्या विश्वानिरीक्षक आचारविचारांचा जनतेवर पगडा बसला व त्यांतून तंत्रमार्गाची उत्पत्ति झाली. ' हें सर्व ब्रह्म आहे ' या उच्चतम कल्पनेमुळें अहिंसेकडे लोकांची प्रवृत्ति झाली. यज्ञाकडची प्रवृत्ति कमी होऊन जन मतानें तपाकडे लोकांच्या मनाचा ओघ वळविला. त्यानेंही असंतुष्ट राहिल्यामुळें बुद्धानें मननावर सर्व भार ठेवला. म्हणने हीं शेवटचीं दोन्हीं मतें वैदिक धर्माविरुद्ध बंडें नसून केवळ उत्क्रांती आहे. बौद्धमतांतलि विचार दौर्बल्य झाडून टाकण्यास सांख्यमताची स्थापना झाली असावी. आतांपर्यंत सांगितलेल्या सर्व मतांचा व्यवस्थित संग्रह भगवद्गीतेंत झाला आहे. पण भक्तीचें बीज गीतेंत नव्यानें उद्भवलें नसून तें वैदिक ग्रंथांतलेंच आहे. भारतीयुद्धानंतर आलेल्या ग्लानीमुळें हलक्या प्रतीच्या चैनीच्या मार्गाचें प्राबल्य झालें. पण गुप्त साम्राज्यांत ही बिघडलेली घडी पुनः बसली. या कालांत प्रसारास सुलभ अशा श्रौत, स्मार्त, धर्मादि सूत्रांची रचना झाली. या कालाचे पूर्वी परकीय जातींच्या आगमनामुळें घोंटाळा उत्पन्न होऊन क्षत्रिय जात नष्ट झाली, असा समज झाला. इ. स. च्या बाराव्या शतकापावेतों आर्य संस्कृतीचा उत्कर्ष राहिला. परंतु उत्कर्षाबरोबरच येणाऱ्या सुस्थितीचा परिणाम अवनतींत झाला. ही अवनति दूर करण्यास शंकराचार्य, रामानुज मध्वाचार्य हे पुढें झाले. त्यांच्या प्रयत्नांचा पूर्ण विकास पंचायतन पूजेंत दिसून येतो. पुनः कालंतरानें आणि ज्ञान व आस्था यांच्या अभावामुळें धर्माचें तत्व अज्ञात राहून ' महाजनो येन गतस्य पंथाः ' अशी समाजाची स्थिति झाली. या स्थितींतून समाजला पुनः वर काढण्यासाठीं सायनाचार्यादिकांनीं मूळ ग्रंथाची ओळख समाजाला करुन देण्याचा प्रयत्न केला. याचवेळीं हिंदुस्थानावर आलेल्या मुसलमानी अंमलाच्या लोटसारशी कांहीं थोडासा फायदा खेरीज करून, आर्यसंस्कृति स्तंभित झाली. राज्यक्रांतीमुळें तो मनु पुनः पालटला आहे. आणि या पुढील प्रगति ' असक्त् कुरुकर्माणि संगं त्यक्त्वा सुखी भव ॥ ये यथा मां प्रपद्यंते तांस्तैव भजाम्यहम् ॥ अनन्याश्चितयंतो माम् ये जनाः पर्युपासते। तेषां भक्त्याभियुक्तानाम् योगक्षेमम् वहाम्यहम् ॥ या गीतावचनांच्या धोरणानें होईल असें श्री० किबे साहेबांचे अनुमान आहे.

वऱ्हाडसमाचार

· भाद्रपद वद्य ११ शके १८३०

## समाजाला सामर्थ्यवान् कसें करावें ?

सामाजिक सुधारणा हे शद्ब कानीं पडतांच कित्येकांच्या कपाळाला आठ्या पडतात. उलटपक्षीं सामाजिक सुधारणा ह्मणजे सर्व परंपरेला सोडून स्वैर वर्तन करण्याचा राजमार्ग अशी कित्येकांची समजूत झालेली दिसते. पण या दोन्ही वर्गांतील लोकांना सुधारणा या शद्बाचा अर्थच कळला नाहीं असें ह्मणावयास हरकत नाहीं. सध्यां समाज ज्या रीतीनें वागतवर्तत आहे ती सर्व काळांत आणि सर्व परिस्थितींत योग्यच आहे, तींत घडामोड करणें आपल्या हातचें नाहीं, आपल्याला तो अधिकार नाहीं व तसें करण्याची अवश्यकताहि नाहीं. अशा मताचा पहिला वर्ग आहे. आणि सुधारणा ह्मणजे ज्या कोणास जसें वाटेल तसें करण्याला मुभा—स्वातंत्र्य—असें मानणारे लोक दुसऱ्या वर्गांत येतात. पण दोहोंच्या मध्यें एक असा वर्ग आहे कीं जो आपल्या आचारानें आणि विचारांनीं परद्रोही वर्गास रास्त मार्गापासून फारसें दूर भटकूं देत नाहीं. संसारयात्रा यशस्वी करण्याला समाजाला समर्थ करणें हा या मध्यस्थ वर्गाचा मुख्य हेतु असतो आणि या हेतूच्या परिपुरणार्थ यांचे प्रयत्न अव्याहत चाल्लेले असतात. गेल्या दहावीस वर्षांत समाजांतील निदान सुशिक्षितांची तरी दृष्टी इतकी विकास पावलेली आहे कीं जों जों विचार करावा तों तों आपल्या राष्ट्राच्या स्थितींतील भिन्नभिन्न अंगें आपआपल्या परीनें समाजांतलि त्यांच्या कर्तव्यावर आपला हक्क शाबीत करूं पहात आहेतसें दिसतें. या पैकीं कोणत्याही अंगाच्या हक्काला योग्य तो मान दिल्याखेरीज गत्यंतर नाहीं. राष्ट्रपुरुषाचा देह कोणत्याही भागांत कमकुवत असतां उपयोगी नाहीं हा सामाजिक सुधारणेचा मुख्य हेतु आहे आणि त्या हेतूला सर्वस्वीं अनुसरून होईल तीच सुधारणा परिणामीं फलदायी होईल हें निश्चित आहे. हे विचार लिहिण्यास लाला लजपतराय यांचा मॉडर्न रिव्ह्यूमधील एक लेख कारण झाला आहे. समाजाला राष्ट्र रूपानें नांदण्यास समर्थ कसें करावें हा या लेखांतील विषय असून त्याचें विवेचन त्यांनीं कोणाचेंहि मन न दुखावेल आणि परंपरा सुटावयाची नाहीं, अशा रीतीनें केलें आहे. 'शरीरमाद्यं खलु सर्व साधनम्' हें वचन आमच्या देशांत सर्वांना माहीतच आहे आणि पाश्चात्य राष्ट्रांतील सामाजिक उत्क्रांति याच तत्वावर होत आहे. वृद्ध तरुणांना शुद्ध आणि पथ्यकर अन्न मिळणें, आरोग्यरक्षक वसतिस्थानें त्यांना उपलब्ध होणें, रोग प्रतिरोधक व नाशक तत्वांवर आरोग्याची वृद्धि होणें, लहान मुलांचें त्यांच्याच दुवृत्त मातापितरांच्या किंवा त्या वर्गांतील इतर लोकांच्या संसर्गापासून रक्षण होणें, स्त्रियांची समाजांतील पदवी श्रेष्ठ व स्थिर होणें, लग्नसंबंधी नियम सुधारणें, बुद्धिमांद्यामुळें ज्यांना स्वतःच्या हिताची जपणूक करतां येत नाहीं अशांच्या साठीं मजुरीसंबंधाच्या नियमांत दुरुस्ती होणें, वयोवृद्धांच्या पोषणासंबंधाचें समाजाचें कर्तव्य चोख रीतीनें बजाविलें जाणें, आणि संपत्तीचा संचय समाजांतलि निरनिराळ्या वर्गांत जास्त न्याय्य पद्धतीनें होणें हे भाग सामाजिक सुधारणेच्या कार्यक्रमांत प्रमुखत्वें करून दाखल झाले पाहिजेत. वरील यादीवरून हें ध्यानांत येईल कीं सर्व समाजाला मिळून जीवितयात्रा यशस्वी रीतीनें पार पाडण्याचें सामर्थ्य अंगीं असावें ह्या तत्वांवर ही सुधारणा रचलेली आहे. पाश्चिमात्य देशांत या सामाजिक सुधारणांतर्गत भागांचा समावेश राजव्यवहारांत होऊन भिन्नभिन्न पक्ष वर सांगितलेल्या तत्वाला मूर्त स्वरूप देण्याच्या कामीं सारखीं चढाओढ करीत आहेत. स्वराज्य उपभोगणाऱ्या त्या राष्ट्रांत त्या सर्व भागांची पूर्वता झालेली नाहीं तथापि अधिकार, बुद्धि, संपत्ति व इच्छा या सर्व साधनांच्या अनुकूलतेमुळें त्या देशांत होईल तितकें थोडेंच अशी स्थिति आहे. त्या देशांत सामाजिक आणि राजकीय अंगांचा संबंध अगदीं निकट झालेला आहे. पण परकीय सत्तेखालील देशांत तशी स्थिति नसणार हें साहजिक आहे. या हतभागी देशांत शास्ते आणि शासित दोघेही सामाजिक बाबींना भीतभीतच हात लावणार! राजकीय धोरण आणि पैशाचा प्रश्न हें एका बाजूस नडणार; तर दुसरीकडे आपली समाज आपली परंपरा या विषयीं अज्ञात असलेल्यांना आपल्या सामाजिक स्थितींत ढवळाढवळ कशी करूं द्यावी हा संशयात्मक विचार सुरवातीच्या आड येणार! अशी स्थितींत सामाजिक संबंधाचें नियमन कायद्यानें होणें अवघड किंबहुना अशक्य असणारच. प्रसंगीं कायद्यामुळें हित होण्याचें बाजूलाच राहून नसतीं संकटें उपस्थित होण्याला मात्र चांगलें फावतें. हिंदुस्थानांत तर या पेक्षांहि अवघड अशी स्थिति आहे. आमचा सामाजिक व्यवहार धार्मिक आचाराशीं पक्का जखडलेला आहे. कायदा करण्याचें केवळ सत्ताधीशांच्या स्वाधीन असल्यामुळें या स्थितींतील अडचणींत मोठीच भर पडली आहे. ह्मणून लालाजी ह्मणतात, ही कोंडी फोडण्याला उत्तम उपाय शिक्षणाचा प्रसार सर्वत्र करणें हें मुख्य साधन आहे. शिक्षणाच्या आधारावर वृद्धिंगत झालेल्या ब्रिटिश साम्राज्यांत शंभरावर वर्षें राहिल्यावर सुद्धां आजच्या घटकेस अक्षरशत्रू लोकांची संख्या आमच्या देशांत दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षां जास्त आहे. याचें कारण लालजी असें दाखवितात कीं, येथें सत्ता आणि समाज यांचा एकभाव नाहीं. समाजाच्या हातीं कसलीच सत्ता नाहीं. ती त्यांच्या आटोक्याच्या पुष्कळच बाहेर आहे. यामुळें सत्ताधीशांतलि मुत्सद्यांच्या कल्पने प्रमाणें त्यांच्या स्वतःच्या हिताच्या संरक्षणापुढें समाजाच्या हिताची मातबरी मानली जात नाहीं.' या कारणामुळें सामाजिक सुधारणेची राजकीय व्यवहारापासून फारखत झालेली आहे. आणि त्या मुळेंच सार्वजनिक हिताच्या बाबतींत जो उत्साह प्रकट व्हावयास पाहिजे तो सामाजिक सुधारणेच्या बाबतींत होऊं शकत नाहीं. पण एक चमत्कार असा आहे कीं, धार्मिक आचाराचें सामाजिक व्यवहाराला पक्कें बंधन असल्यामुळें तो आचार सामाजिक सुधारणेला आडकाठी सारखा भासतो तरी वास्तविक आजपर्यंत झालेली सामाजिक सुधारणा धार्मिक सुधारकांच्या प्रयत्नामुळें झालेली आहे. आर्य समाज व सनातन धर्म यांचीं उदाहरणें लालाजींनी या संबंधांत दिलीं आहेत. मुसलमानी समजांतहि सुधारणा करतांना कुराणाच्या अनुकूल आणि दुराग्रह विरहित अशा भाष्यावरच ना. सर सय्यद अहमद यांना भिस्त ठेवावी लागली. समाजाचें शील प्रतापवंत करण्याची जरूरी दिवसें दिवस जास्त जास्त तीव्रतेनें भासूं लागली आहे आणि या इच्छेच्या प्राबल्यासरसें तिचें पूर्वील क्षेत्रहि खुलें होऊं लागलें आहे. राष्ट्रीय शिक्षणाच्या विद्यालयांचें द्वारें या इच्छेला दृश्य स्वरूप येऊं लागलें आहे ही संतोषाची गोष्ट आहे. शिक्षण हा पाया आहे आणि पायावरच राष्ट्राच्या प्रतापवंत शीलाची इमारत उभारावयाची असल्यामुळें तो जितका भक्कम आणि विस्तीर्ण होईल त्यावर वरील इमारतीची उंचि व तिची स्थिरता अवलंबून राहील.

## सुधारणांचें काय झालें ?

हिंदुस्थानच्या राजकीय व्यवहारांतील सुधारणा निश्चित होऊन त्या प्रकट होण्याचे दिवस जवळ येत चालले तरी सत्ताधीशांच्या मकानांत त्या संबंधानें बहुतेक शांतताच दिसून येत आहे. पुढील महिन्यांत पार्लमेंटपुढें ज्या सुधारणा अखेर मंजुरीकरितां येणार त्या संबंधानें लोकांना कांहींच ठाम असें कळलेलें नाहीं. व अजूनहि त्या विषयींची कांहीं माहिती बाहेर येत नाहीं. राज्यव्यवस्थायंत्रांतील सुधारणेसंबंधानें सत्ताविभागणी कमिशनचा रिपोर्ट अद्याप सादर व्हावयाचा आहे. कौन्सिलांच्या पुनर्रचनेसंबंधाच्या योजनेविषयीं निदान येवढें अनुमान करतां येत आहे कीं हिंदुस्थान सरकारनें प्रारंभीं प्रकट केलेल्या योजनांचें स्वरुप अगदीं बदलून जाऊन कांहीं निराळ्याच स्वरुपाच्या योजना पार्लमेंटापुढें मांडल्या जाणार आहेत. वरील दोन्ही सुधारणा एकत्र करून त्यांना पार्लमेंटाची मंजुरी एकदमच मिळविण्याचा निदान सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचा हेतु दिसतो. पण या सर्व व्यवहारांत लोकांच्या दृष्टीनें मोठीच नुकसानीची अशी एक गोष्ट घडत आहे. स्टेट सेक्रेटरी यांचा कांहीं एक निश्चय होऊन तो जशाचा तसाच पार्लमेंटासमोर गेल्यास त्यांत कांहीं किरकोळ फेरफारांखेरीज विशेष उलथापालथ पार्लमेंटांत होणें शक्य नाहीं. आणि तसें झालें ह्मणजे हिंदुस्थानांतील लोकमताचा त्यावर मागाहून कांहीं परिणाम व्हावयाची आशा नकोच. असें होऊं नये येवढ्यासाठीं स्टेट सेक्रेटरी यांनीं जो कांहीं विचार साधारणपणें केला असेल त्यावर लोकमत काय पडतें हें पाहून आणि तदनुरोधानें त्या विचारांत दुरुस्ती होऊन मग पार्लमेंटपुढें पक्का विचार मांडणें लोकांच्या हिताला जास्त संरक्षक होईल. पण तसें होण्याचीं चिन्हें तूर्त दिसत नाहींत. याच संबंधांत पायोनिअर सारख्या अँग्लो इंडियन पत्रकारांनीं जो अव्यापारेषु व्यापार चालविला आहे त्यामुळें लोकांच्या मनावर भुरळ पडूं न देण्याचें कर्तव्य आमचें आहे. राज्यव्यवस्थेच्या यंत्रांतील सुधारणा व कौन्सिलांची सुधारणा या दोन्ही एकत्र केल्यानें नुकसान होईल असें सिद्ध करण्याचा आव आणून या पत्रांनीं असा बहाणा चालविला आहे कीं, सत्ताविभाणी ह्मणजे केवळ स्थानिक अधिकाऱ्यांवरील वरिष्ठ अंमलदारांचा दाब कमी करणें होय. या संबंधांत लोकांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं वरिष्ठांचा दाब कमी करणें हा या बाबींतला केवळ एक भाग आहे. कामाच्या निकालांत दिरंगाई न व्हावी ह्मणून आणि रयतेशीं स्थानिक अंमलदारांचा जास्त निकट संबंध रहावा ह्मणून सत्ताविभाणी आवश्यक आहे. विभागणी कमिशनपुढें साक्ष देणाऱ्या अंमलदारांना वरिष्ठांच्या दाबांतून आपली मुक्तता व्हावी अशी इच्छा असणें साहजिक आहे. पण लॉर्ड मोर्ले यांनीं हें कमिशन नेमण्यांत त्या अधिकाऱ्यावर लोकांचा जास्त दाब रहावा हा आहे हें विसरतां कामा नये. लॉर्ड कर्झन यांनीं उपस्थित केलेल्या वादांत लॉर्ड मोर्ले यांनीं आपला हा हेतु स्पष्टपणें नमूद करून ठेवलेला आहे. त्याच प्रमाणें त्यांचे नायब मि. बुकानन यांनीं बजेटावरील वादविवादांत असें सांगितलें आहे कीं, सध्यां ज्या योजना तयार होत आहेत त्यांच्या मुळाशीं राज्यकारभारांत हिंदी लोकांचा जास्त समावेश करून घेणें हें तत्व आहे. सध्याच्या अमदानीपेक्षां मागच्या पिढींतले अंधिकारी चांगले असत असा सर्व लोकांचा समज आहे. आणि तो सकारण आहे. तें कसेंहि असलें तरी आपल्या देशाच्या कारभारामध्यें आपला अधिक हात असावा, शक्य तितका आपला कारभार आपणच चालवावा अशी सर्व लोकांची इच्छा कमिशनपुढें सादर झालेल्या पुराव्यांत स्पष्टपणें कळून आलेली आहे. आमच्या मतें दोन्हीं सुधारणा एकत्र न करण्यासंबंधानें पायोनिअर प्रभृति अंग्लोइंडियनांची ओरड लोकांच्या या इच्छेमुळेंच उद्भवली आहे. लोकमततंत्री राजकीय संस्थाची वाढ आणि राज्यकारभारांत देशी अधिकाऱ्यांचा जास्त मानानें प्रवेश या राष्ट्रीय सभेच्या मागण्या परस्परांशीं विसंगत आहेत असला बाष्कळ आक्षेप काढण्यालाहि पायोनिअर सारखे पत्रकर्ते उद्युक्त झाले आहेत, हें पाहून तर त्यांची कोणालाहि कींवच येईल. जणूं काय इंग्लंडमध्यें लोकमतसत्ताक राज्यपद्धति असतांना तेथें सरकारी पगारी अंमलदारांची जरूरच पडत नाहीं! 'कर्तुमकर्तुम्' सत्ताधीश वर्ग आणि पगारी सरकारी नौकर यां दोहोंत फार मोठें अंतर आहे. राज्यपद्धति कोणत्याहि स्वरुपाची असो, पगारी अंमलदार सर्व ठिकाणीं पाहिजेतच. पण सर्वसत्ताधीश असा अधिकारीवर्ग मात्र ज्या देशांत लोकमताचा राज्यकारभारावर मुळींच ताबा नाहीं अशा देशांत पुष्टी पावतो. लोकमताचा राज्यकारभारावर ताबा असावा ह्या इच्छेंतच सरकारी अंमलदार परदेशायांच्या पेक्षां देशी असावे या इच्छेचा समावेश होतो.

## दुःखावर डागण्या.

मद्रासचे गव्हर्नर सर आर्थर लॉले यांनीं उटकमंड येथील औद्योगिक परिषदेपुढें केलेलें भाषण बरेंच महत्वाचें आहे. स्वदेशांतील उद्योग धंद्यांचे पुनरुज्जीवनासाठीं लोकांनीं झीन सोसण्यास व स्वार्थत्याग करण्यास तयार झाले पाहिजे असा उपदेश सर लॉले यांनीं केला. हा उपदेश टय़ुटिकोरिन प्रकरणानंतर झालेला असल्यामुळें त्याला विशेष महत्व आलेलें आहे. त्याचप्रमाणें परदेशी साखरेवरील जकात उठून स्वदेशी साखरेच्या मार्गांत जास्त अडचणी उत्पन्न झाल्याला फार दिवस झाले नाहींत, अशा वेळीं मद्रासच्या गव्हर्नर साहेबांचें वरील आशयाच्या भाषणांतील महत्व लोकांना चांगलेंच कळून येणार आहे. स्वदेशी चळवळ कोणत्याहि देशांत सुरू झाली तरी तिला स्वार्थत्यागाचा पाठिंबा असल्याखेरीज ती फलद्रूप व्हावयाची नाहीं हें ठरलेलें तत्व आहे. पण सरकारी अंमलदारांच्या भाषेंत हा शद्बप्रयोग नवीनच असल्यामुळें त्याची योग्य ती संभावना होणें रास्त आहे. या पूर्वीचा शद्ब प्रयोग ‘प्रामाणिक स्वदेशी’ हा होता. त्याचा अर्थ काय आहे याचा उलगडा अद्याप पर्यंत नीट झालेला नव्हता असें नाहीं. तथापि मद्रासच्या गव्हर्नर साहेबांच्या भाषणांतील वर सांगितलेल्या शद्ब प्रयोगाचा अर्थ कळण्याला आवश्यक ती मनाची स्थिति मद्रास इलाख्यांतील लोकांची व अशतः सर्व हिंदुस्थानाची आज मितीस खात्रीनें नाहीं. स्वार्थत्यागाच्या आधारावरील स्वदेशी चळवळ नव्यानें सुरू करून देण्यास मद्रास इलाख्याचे अधिकारी जसें प्राजलपणें पुढें आलें आहेत तसेंच इतर सर्व प्रांतांतील अधिकारी येतील तर त्या सर्वांच्या भाषणामुळें कदाचित् या शद्बप्रयोगाचा उलगडा सुलभ होण्याचा संभव आहे. नाहींपेक्षां मद्रासच्या गव्हर्नरांच्या तोंडून बाहेर पडलेले हे शद्ब उपदेशाचे नसून त्या केवळ दुःखावर डागण्या आहेत अशी लोकांची समजूत होणें अपरिहार्य आहे.

## ट्रान्सव्हाल प्रकरण.

ट्रान्सव्हालांतील हिंदी लोकांच्या वागवणुकीसंबंधाच्या प्रकरणाला आतां अगदीं तीव्र स्वरूप आलेलें आहे. ट्रान्सव्हाल सरकारनें एकदां फसविल्यामुळें आतां कायद्याचीहि भीक घालावयाची नाहीं अशी तयारी हिंदी लोकांनीं केली आहे. हद्दपार झालेल्या लोकांनीं पुनः पुनः ट्रान्सव्हालचे हद्दींत शिरून हद्दपारीच्या हुकमाला सपशेल धाब्यावर बसविण्याचे प्रकार वारंवार घडूं लागले आहेत. आणि त्यांचें हें करणें कायद्याचा उपमर्द करण्याचे हेतूनें नसून आपल्यावर अन्यायाचा अंमल होऊं नये येवढ्याच साठीं आहे अशी इंग्लंडमधील व हिंदुस्थानांतील विचारी लोकांची खात्री झालेली आहे. लार्ड अम्प्थिल व सर मंचरजी भावनगरी यांनीं ब्रिटिश राष्ट्रानें लक्ष ट्रान्सव्हालांतील शोचनिय प्रकाराकडे वेधावें म्हणून निकरानें खटपट चालविली आहे. आपल्यावर होत असलेल्या जुलमाचा प्रतिकार करविण्यासाठीं हिंदुस्थानांतील लोकमत जागृत करावें म्हणून ट्रान्सव्हालांतील हिंदी पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांना निरोप पाठविला आहे. या निरोपाअन्वयें मुंबईच्या प्रेसिडन्सी असोसिएशननें व अंजुमनइस्लामनें स्टेट सेक्रेटारी व मुख्य प्रधान यांना तारेनें लोकमत कळविलें आहे. मुंबईच्या रहिवाशांचे कायदेशीर पुढारी मुंबईचे शेरीफ यांना हाच निरोप आलेला आहे. पूर्वी शेरिफांचे विनंतीवरून मुंबईस याच संबंधांत लोकमत जाहिर झालेलें आहे. पण तेवढ्यानें न भागल्यामुळें पुनः तसें करण्याची आवश्यकता आहे. मुंबईचे शेरीफ ही आवश्यकता जाणून कर्तव्यास जागतील अशी आशा आहे. पण हें एकट्या मुंबईचें काम नाहीं सर्व हिंदुस्थानांतून असेंच लोकमत जाहिर व्हावयास पाहिजे.

## सुकर्णधार

आमच्या जिल्ह्यांत राजद्रोहाचें बंड फारसें नाहीं आणि ही स्वस्थता व स्तब्धता असण्याला कारण आकोला जिल्ह्याचें सच्छील पोलिसखातें होय. जोपर्यंत भाषणांत अतिक्रम होत नाहींत किंवा क्वचित् प्रसंगीं अतिक्रम झाल्यास त्याला सूज्ञ व शिष्ट अशा लोकाग्रणींची समंति मिळत नाहीं तोपर्यंत आमचे पोलिस अधिकारी लोकांच्या तोंडास लागत नाहींत आणि आपली दृष्टि सार्वजानिक शांततेकडे विशेष ठेवतात. या बद्दल आह्मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. राजश्री कोल्स साहेब व त्यांच्या मागून राजश्री कॉन्व्हेंद्री साहेब पोलिस सुपरिन्टेंडेंट यांच्या बाणेदार व चतुराईच्या कारभाराचा अनुभव आह्मास अनेक वेळां पुर्वींच आलेला आहे. आणि सार्वजानिक चळवळीमध्यें त्यांच्या परीनें लोकांस योग्य मदतही मिळत आलेली आहे.

नुकतेंच एक ताजें उदाहरण थोडें विचार करण्यासारखें घडलें. श्रीराम नाटक गृहाच्या असमंतांत गेल्या ९ तारखेस रात्री नाटकाला सुरुवात होण्याच्या सुमाराला थोडीशीं गडबड उडाली आणि त्यांत पोलिसचा एक शिपाई कामावर उभा असतांना त्याच्या अंगावर एक दगड मारण्यांत आला. व त्या संबंधांत एक तुकाराम जानकीराम नांवाचा मनुष्य पकडण्यांत आला. तुकारामानें राजश्री कॉन्व्हेन्द्री यांच्याद्वारा सर्व पोलिसांची माफी मागितली. ही माफी स्वीकारण्यांत येऊन त्याच्यावरील मोकदमा काढून घेण्यांत आला.

वरील गोष्ट सामान्य आहे खरी पण त्यामध्यें लोकांशीं सरकारचें वर्तन किति सामोपचाराचें व तडजोडीचें आहे हें सहजी ध्यानांत येईल सुकर्णधार जेव्हां एखाद्या सरकारी खात्याच्या नौकेला मिळतो तेव्हां अशाच गोष्टी अनुभवास येत असतात.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—उत्तरा नक्षत्राचा पाऊस मोठ्या वेगाचा व स्वल्प कालीन असा मधून मधून पडत असतो. एकंदर पाऊस ३२ इंचावर झाला आहे. मध्यंतरीं चांगली उघाडी पडली. आणि त्यामुळें कपाशी व जवारी हीं पिकें मंद स्थितींत न रहातां चांगलीं जोरानें फोंफावत आहेत. सार्वजनिक आरोग्य साधारण बरें आहे पण खामगांवापेक्षां उमरावतीला प्लेगाचे मृत्यु उत्तरोत्तर वाढत चालले आहेत.

बेंच म्याजिस्ट्रेट—पातुरशेखबाबु येथें एक अनररी म्याजिस्ट्रेटांचें बेंच स्थापित करण्यात येणार आहे. आणि त्या निमित्त होतकरू उमेदवारांच्या योग्यायोग्यतेचा विचार चालूं आहे. गरजूं लोकांनीं योग्य मार्गानें धांव घ्यावी.

जामीन—राजश्री मोरोपंत पुरोहित नांवचे एक गृहस्थ गेल्या सात आठ महिन्यांपासून आमच्या जिल्ह्यांत राजकीय विषयावर व्याख्यानें देत फिरत असतात यांचा राहण्याचा बाणा सन्यास वृत्तीचा आहे आणि हे हळू स्वरानें फार चांगले बोलतात. हे नुकतेच मंगरूळपीरच्या बाजूनें आपल्या इष्ट कामानिमित्त फिरत होते. त्यांच्या भाषणांत राजद्रोहाचे विचार प्रचलित असतात अशी गोष्ट राजश्री क्राफर्ड साहेब डेप्युटी कमिशनर यांच्या कानापर्यंत गेली. तेव्हां १००० रुपयाचा जातमुचलका व दोन प्रत्येकी १००० रुपयाचे जामीन एक वर्ष मुदतपर्यंत राजद्रोहाचीं भाषणें न करण्याबद्दल राजश्री पुरोहित यांच्या कडून मागण्यात आले. सध्यां त्यांचा मोकदमा २८ तारखेपर्यंत तहकूब आहे. आणि राजश्री पुरोहित तुर्ततुर्त हजर जामीन न मिळाल्यामुळें कच्या कैद्याप्रमाणें तुरुंगांत आहेत. हे इकडे अनोळखी असल्यामुळें कोणी जामीन होण्यास सिद्ध नाहीं. आणि ही वस्तुस्थिति पाहूनच तेहि जामीन होण्याबद्दल कोणावर ओझें घालूं इच्छित नाहींत. राजश्री पुरोहित यांचें ह्मणणें असें आहे कीं ज्या अर्थी यापुढें मी वऱ्हाडांत राहूं इच्छित नाहीं त्या अर्थी जातमुचलक्यावर सुखानें मला अन्यत्र जाऊं द्यावे. या तडजोडीच्या सुचनेच्या युक्ता युक्ततेचा विचार करण्यांत हा सद्वर्तनाचा खटला लांबणीवर पडला आहे. कामीची रीत दिर्घसूत्र दिसतें.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बि. ए. सब. डिव्हिजनला ऑफिसर आकोला यांची बदली यवतमाळास झाली.

व त्यांच्या जागीं यवतमाळहून रा. रा. दात्तात्रय विठ्ठल सरंनामे बि. ए. ए. आसि. क. यास येथें नेमण्यांत आलें आहे. ही दुसरी नेमणुक कांहीं विशिष्ट कारणाकरितां करण्यांत आली असा विषयीं लोकांचे तर्क चालू आहे.

रा. रा. रतनशा अर्देसर चिनाय बि. ए. तहशिल्दार मुर्तिजापूर यास पांच आठवड्यांची हक्काची रजा दिली असून त्या रजेंत रा. रा. रुकमाजी माणकोजी धत्रक नायब तहशिल्दार यांस मुर्तिजापुरासच आफि० तहशिल्दार नेमलें आहे.

रा० रा० ए लक्ष्मणराव बी. ए. आसि० तहशिल्दार केळापूर यांस मेहेकरास नायब तहशिल्दार नेमून त्यांच्या जागीं रा. रा. अब्दुल रहिम हे० क्लार्क आफ कोर्ट यांस तहशिल्दार नेमण्यांत आलें.

रा० रा० शिवरामपंत कोरडे क्लार्क आफ कोर्ट. स्माल काज कोर्ट अकोला यांची बदली उमरावतीस करून रा० रा० मीर आलम यांस अकोल्यास बदलण्यांत आलें.

पुरवणी— बाळकृष्ण नारायण इंगळे पंढरपूर यांच्या बुकडेपोची जाहिरात वाटली जात आहे तिकडे वाचकांनीं लक्ष पुरवावे अशी त्यास आग्रहाची सूचना आहे.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००१. |
| सोनें | २४।= |
| चांदी | ७० |
| जवस | १३४ |
| जवारी | ९०॥ |
| गहूं काठे | ११२॥ |
| बनशी | १४९ |
| तेल | ६ |
| सरकी | ११ |
| तुप | १.०। |
| कापूस | ४७ |

## नोटीस

स० स० मुकद्दमा नंबर ९ सन १९०८. विद्यमान सुभेदार साहेब बहादूर सब जज्न कोर्ट अकोला यांचे कोर्टीतून.

या नोटिशीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येत आहे कीं अर्जदार जानी बापाचे नांव भागीरथ अज्ञान पालन करणार सदर्हू जानीच्या बापाची आई पार्वती मर्द मंगणीराम मारवाडी रहाणार अकोला. ईनें अकोला येथील जगन्नाथ भागीरथ या दुकानची मालक जमनी मर्द भागीरथ ही मिती चैत्र शुद्ध ७ संमत १९६२ (मारवाडी) तारीख ८ माहे एप्रिल सन १९०८ रोजीं मरण पावल्यामुळें सदर्हू मयताचें प्रेमराज हरभगत राहणार रत्तनपूर तालुका दर्यापूर जिल्हा उमरावती या दुकानाकडे खात्यावरून रकम रुपये २८७४ ८७ दोन हजार आठशे चव्र्याहत्तर रुपये सात आणे ची रकम वसूल येणें आहे तें कर्ज वसूल करण्याकरितां मयताचे वारस या नात्यानें सक्सेशन सरटिफीकीट आक्ट नंबर ७ सन १८८९ अन्वयें सरटिफीकीट मिळण्याकरितां आमचेकडे दिलेल्या अर्जाचे चौकशीची तारीख १७ माहे आक्टोबर सन १९०८ इसवीची नेमली आहे तरी सदर्हू बदल ज्या कोणास कांहीं तक्रार वगैरे करणें असल्यास आमचे कोर्टांत वरील तारखेस दिवसां १० वाजतां हजर व्हावें. हजर न झाल्यास पुढें कोणतीही सबब ऐकिली जाणार नाहीं.

आमच्या सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली असे आज ता० १६ माहे सप्टेंबर सन १९०८ इ०

N' G. Subhedar
सब जज्न
नं. व. ३८ अकोला

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख २८ माहे सप्टेंबर सन १९०८ इसवी [अंक ३७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खाली दिलेल्या शर्टीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल्दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०५ } G. A Phillips एजंट

नं ७३

## बंगला विकाऊ

रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर डिस्ट्रक्ट जज्ज चांदा, मध्यप्रांत यांचा आकोला येथील बंगला विकावयाचा आहे. जनरल पोस्ट आफिसा समोरील विस्तीर्ण मैदानावर उभा आहे. ग्राहकांनीं विशेष विचारपूस खालीं सही करणाऱ्याकडे करावी. ता० १८–९–०८ इ०

नारायण खंडेराव फडके

नं. घ. ३९ वऱ्हाडसमाचार आकोला.

### नोटीस

भाई माहानंदराम दुरगदत्त जिनींग फॅक्टरी तल्हारे ता. आकोट यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते ती खालीं लिहिलेल्या प्रमाणें:—

आमचे दुकानचें खातेंबाकीचे रुपये आजपावेतों जे हिशेबानें निघतील ते जिनींगचे हिशेबाबद्दल पुष्कळवेळ सांगितलें तरी तुह्मी आह्मास हिशेब समजावून दिला नाहीं. तर ही नोटीस पावले पासून आठ दिवसांत खातेबाकीचे रुपये व जिनींगचा हिशेब समजून देणें. या प्रमाणें न केल्यास योग्य रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावे. ता. २२-९-०८

सही

मेघराज गंगाराम दस्तुर पुनमचंद

नं. घ. ४४ नरसींगदास दतुर खुःद

### नोटीस

सा० किसनंदास मिठालाल मालक नथमल रामप्रताप तापडीया दु० तेल्हारा ता० आकोट यांसः–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे दुकानचें खाते. बाकी रुपये घेणें आहे त्याजबद्दल आह्मी आपणास पुष्कळ पत्रें लिहीलीं व आमचे गुमास्ते तिनचार येळ तुमचेकडे पाठविले असतां आपण करार केला परंतु आजपावेतों वसूल कांहीं दिला नाहीं. तर आता ही नोटीस पावले दिवसापासून आठ दिवसांचे आंत हिशेब चुकता करून रुपये देणें या प्रमाणें न केल्यास योग्य रिती प्रमाणें तजवीज केली जाईल कळावें.

सही

मेगराज गंगाराम दु० मुंबई

दस्तुर पुनमचंद नरसींगदास

द. खु. ता. २२-९-०८

नं. घ. ४५

### नोटीस

नोटीस बेशमी— लक्ष्मण मल्हारी हिंगे वस्ती मलकापूर ता० मजकूर जि० बुलडाणा यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मांस नुकतेच माझे इस्टेटी संबंधानें दावे वगैरे करण्यास कुलमुखत्यापत्र दिलें आहे. परंतु तुह्मी मुखत्यारपत्र होताच माझे इस्टेटीची अफरातफर करण्याचा तुमचा इरादा दिसतो. करितां माझा तुमच्या वरील भरंवसा उडाला. कारण तुह्मी शिक्षा भोगलेले आहां. तुमची चालचलणूक ठीक नाहीं हें मला हल्लीं समजलें. यावरून तुमचे कडून मी कोणतेंच काम इच्छित नाहीं. करितां तुह्मांस दिलेलें मुखत्यारपत्र आज तारखेपासून मी रद्द केलें आहे. तुह्मास माझे तर्फे आतां कोणत्याही तऱ्हेचें काम करण्याचा अधिकार नाहीं. याउपर तुह्मी कांहीं भानगडी कराल तर तुमच्यावर फौजदारींत काम चालविलें जाईल. अस्सल मुखत्यारपत्र तुमचे जवळ आहे ते नोटीस पावतांच मला वापस आणून द्यावें. कळावें. तारीख २३ माहे सप्टेंबर सन १९०८ इसवी.

सही

गिरजी मर्द मारुती तेली

रहाणार मलकापूर

निशाणी खुद.

नं. घ. ४६

### नोटीस

नोटीस बेशमी— कृष्णा वल्द नागयण लोड कुणबी राहणार तोरणवाडे तालुके चिखली पोष्ट अमडापूर यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यात येते कीं तूं माझा लग्नाचा नवर असून मजला वयांत येण्यास तीन ३ वर्षे झालीं आहेत. वयांत आल्यावर तुझ्या घरीं दीड वर्ष जात येत असून तूं माझ्याशीं चेष्टा रीतीप्रमाणें बोलत चालत नमून तूं कधींच मी असतां घरीं राहात नाहींस. मी तुजला घरीं रहाण्याचे छाटल्यावरून तूं त्या दिवशीं रात्रीं दुसरा मनुष्य आणला. तो मी वळखून काढून देऊन लागलीच दुसरें दिवशीं मी उंद्री येथें माझे भावाचे घरीं आले. व दीड वर्ष झाले माझे भावाचे घरीं राहाते. दोन महिने झाले तुझे भाऊ व तूं मजला नेण्यास आला त्यावेळीं वरील हकीकत तुजला पंचासमक्ष सांगून तूं माणसांत नाहींस असें तुझ्या तोंडावर सांगितलें. तूं कांहीं जबाब दिला नमून तूं उठून जाण्यास लागला. त्यावेळीं तुजला फारकती मागितली त्यावेळीं तुझ्या भावानें तुजला उभारी देऊन फारकती दिली नाहीं. तरी आतां तुझे येथील पंच व उंद्री येथील पंच जमा करून तूं संसारात लायक आहेस खरें करून मजला तूं नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत नेऊन जावें असें तूं न केल्यास तुझा माझेवर नवरपणाचा हक्क राहाणार नाहीं व मी दुसरा नवरा करीन मग तुझी तक्रार ऐकणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली सही. ता० ९-९-०९ इ०

सही

तुळशी मर्द कृष्णा लोड रहाणार

नं. घ. ४७ उंद्री निशाणी बांगडी.

## वर्तमानसार

ता० २८ रोजीं कलकत्ता येथें वरतोळ ठाण्याजवळ व ग्रेस्ट्रीटवर राजा विनयकृष्ण यांच्या हवेलीजवळ असा दोनदां ट्रॅमगाडी खालीं स्फोट झाला. नारळाच्या कवटींत शिशाचे तुकडे भरून ते कोणी ट्रॅमच्या रस्त्यावर ठेवले होते असें चौकशी अंतीं समजलें. " फर्स्ट क्लार्क गाड्यांतून जाऊं नका " असा इशारा लिहून ठेवलेले कागदाचे कांहीं तुकडे वरील प्रकार घडल्या जागेजवळच सांपडले.

अलीपूर जेलमध्यें कैद्यांची फार खेंच झाल्यामुळें वीस कैद्यांना ता० २० रोजीं बक्सार सेंट्रल जलमध्यें रवाना करण्यांत आलें. कैद्यांची गाडी राणीगंज स्टेशनजवळ येऊन पोहोचतें तोंच दुसऱ्या रूळावरून जाणाऱ्या गाडींतून कोणी बॉम्ब फेंकला तो कैद्यांच्या गाडीस लागून फुटला. ह्याची बरीच नुकसानी झाली परंतु कोणास इजा झाली नाहीं. त्यांच्याबरोबर असलेला रामप्रसादसिंह नांवाचा रखवालदार यास मात्र एक कपरा लागून किंचित इजा झाली.

अत्याचार करणाऱ्या लोकांना गौहट्टी येथील कांहीं गृहस्थांकडन पिस्तुलांचा, काडतुसांचा व डायनामेटसचा पुरवठा होतो अशी कलकत्ता पोलिसाला वर्दी लागल्यावरून गौहट्टी पोलिसांनीं बुधवार ता. २३ रोजीं आसाम व्हॅली ट्रेडिंग कंपनीचें दुकान, बाबा श्रीगोविंद लहरी व डॉ. दुर्गामोहोन लहरी यांच्या घरांची झडती घेतली; परंतु मुद्देमाल कांहींच सांपडला नाहीं.

तारीख २४ रोजीं नारायणगंज येथील फौजदारी कोर्टाच्या जवळील तळ्यांत गोळ्यांच्या चार पिशव्या सांपडल्या प्रत्येक पिशवीचें वजन दहा शेर होतें. सर्व तळें धुंडून पाहिलें परंतु आणखी कांहींही सांपडलें नाहीं.

नडियाच्या मॅजिस्ट्रेटसाहेबांकडे पोष्टानें बॉंब गोळा पाठविणाऱ्या रणघाट येथील बंगाली तरुणास पांच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली आहे.

लंकाशायरमध्यें आतां एकंदर पांचशें तीस गिरण्या बंद झाल्या आहेत. कामकरी लोकांचे अभिप्राय काय आहेत हें समजून घेण्याकरितां अधिकाऱ्यानीं मतपत्रकांची दुसऱ्यादा योजना करण्याची कांहीं व्यवस्था केली नाहीं. लौकर तडजोड होण्याचा संभव दिसत नाहीं व लौकरच तडजोड झाली नाहीं तर चारपासून ते बारा लाख कामकऱ्यांना उद्योगधंदा गमावून घरीं बसावें लागेल. भांडवलवाले व उभय पक्षांचें बळही समसमान आहे. कामकऱ्यांचा फंड पुष्कळ जमला आहे.

तिनेव्हेल्ली तुतिकोरिन येथील जादा पोलिस उठवून त्याचे ऐवजीं सरकारच्या प्रांतिक उत्पन्नांतून विशेष पोलिस ठेवण्यांत आले आहे.

ता० १८ रोजीं पहाटे तीन वाजतां ॲडिशनल सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस, डेपुटी सुपरिंटेंडेंट व इतर पोलिस अधिकारि बरोबर कित्येक पोलिस घेऊन बाबू रामकनय्या दत्त यांचे घराकडे गेले. त्यांच्या ओरडण्यानें सुमारें पांच वाजतां घरांतील माणसें जागीं झालीं. संतान पत्राचे व्यवस्थापक जितेंद्रलाल हे डोळे चोळीत बाहेर येत आहेत तोंच त्यांना वारंट दाखविण्यांत येऊन तेथच्या तेथें पकडण्यांत आले. थोड्याच वेळानें जितेन्द्राचे वडील व संतान पत्राचे संपादक यांनाही पकडण्यांत आलें. कांहींवेळ गेल्यानंतर दोघांनाही जामिनावर सोडण्यांत आलें. हा सर्व विधि आटोपल्यानंतर त्यांना झडतीचें वॉरंट दाखविण्यांत आलें. संतान छापखाण्याची व ऑफिसची झडती घेण्यांत आली. झडती सुमारें १९ तासपर्यंत चालू होती. पोलिसांनीं कागदांचे एकंदर नऊ मोठाले पेटारे जप्त करून नेले. संतान पत्राचें एक प्रुफशीटही जप्त करून नेण्यांत आलें.

ता. २१ रोजीं दोनप्रहरीं रा. टिळक रंगुनच्या किनाऱ्यावर उतरले. त्यांना स्पेशल ट्रेननें मंडालेकडे नेण्यांत आलें. रा. टिळक रंगूनच्या किनाऱ्यावर उतरले तेव्हां त्यांना पाहण्या करितां लोकांची गर्दी लोटली होती. तीन हजारांवर लोकसमुदाय जमला होता. रस्त्यावर, किनाऱ्यावर, खिडक्यांतून व घरांच्या छपरावर लोक उभे होते. पोलिसचा कडेकोड बंदोबस्त होता तरी ' वंदेमातरम्, टिळक माहारज की जय वगैरे जयशद्बांचे घोष होत होते. लाल पगडी लोकांच्या दृष्टीस पडली तेव्हां हेच रा. टिळक असावेत असें लोकांस वाटलें. रा. टिळक यांना पाहण्याकरितां लोक फार उत्सुक झाले होते. रा. टिळक यांची मुद्रा शांत व गंभीर दिसत होती. अतिशय गर्दी झाल्यामुळें हजारों लोकांना रा. टिळक यांचें दर्शन झालें नाहीं. ह्यामुळें लोकांना वाईट वाटलें. रा. टिळक यांना स्पेशलगाडीनें मंडालेच्या तुरुंगांत ठेवण्यां करितां रवाना केले.

अमेरिकेंतील फॉरेस्टांत भयंकर वणवा पेटून दोन शहरें जळून खाक झालीं, हजारो लोक घरादाविणें उघडे पडले आहेत.

युगान्तर पत्राच्या इंग्लिश प्रती लंडनहून रवाना करण्यांत आल्या असून त्या कलकत्ता येथील कित्येक बंगाली रहिवाशांस व वर्तमानपत्रांस मिळाल्या आहेत. " युरोपिन लोकांविरुद्ध हत्यारांचा उपयोग करा. बंदुका किंवा पिस्तुलें नसतील तर चाकू, सुऱ्या इत्यादि हत्यारांचा उपयोग करा पण रक्तपात केल्याशिवाय राहूं नका. " असा हिंदी लोकांस अनुलक्षून सदर पत्रांत उपदेश करण्यांत आला असून " खुदीराम बोस हा ख्राईस्टचा दुसरा अवतार होय " असेंही त्यांत म्हटलें आहे.

मि० गार्थ हे विलायतेहून ता० ३० आक्टोबर रोजीं कलकत्यास येऊन दाखल होतील. तेथें आल्या नंतर नरजोलचे राजे व निकुंज विहारी मैती यांच्या तर्फे खटला चालविण्याचें काम त्यांना देण्यांत येणार आहे.

श्रीरामपूर येथून सहा मैलांवर भद्रेश्वर येथें बाबू कृष्णमोहन राय यांचे येथें झडती घेण्याची बतावणी करून कांहीं इसमांनीं ता० १७ रोजीं दरवडा घातला. त्यासंबंधांत पांच असामींना पकडण्यांत आलें आहे. त्यांपैकीं पहिलें कार्तिकचंद्र दत्त हे शांतिपूर येथील रहिवासी असून यांनीं शांतपूर येथील युरोपियन मिशनरीवर हल्ला केल्यावरून एकदां शिक्षाही झाली होती. याशिवाय २४ परगणा जिल्ह्यांतील पन्नालाल चक्रवर्ती, रंगपुरचे रहाणार परेशचंद्र बक्षी, बरद्वान येथील सुरेशचंद्र मुजुमदार व कलकत्त्याचे दिनन्द्रनाथ घोष अशा एकंदर पांच इसमांना पकडण्यांत आलें आहे.

मुंबईच्या स्मॉल कॉज कोर्टांत वकिलीचा धंदा करीत असलेले मि. कुवरजी रतनजी बिलिमोरिया यांस ' टाऊट्स ' मार्फत कामें मिळविल्याबद्दल शिक्षा कां करूं नये याचें कारण दाखविण्यासाठीं नोटीस काढण्यांत आली होती. त्याबद्दलची सुनावणी हायकोर्टांत जस्टिसिस स्कॉट व बॅचेलर यांजपुढें झाली. मि. बिलिमोरिया यांच्यातर्फे बॅ. रॉबर्टसन व ना. खरे व सरकारतर्फे सरकारी वकील हे हजर होते. दोन्ही पक्षांच्या वकिलांचें ह्मणणें ऐकून न्यायमूर्तींनीं मि. बिलीमोरिया यांस सहा महिनेपर्यंत वकिलीचा धंदा चालविण्याचा मनाई केली आहे.

---

## टिळक डिफेन्स फंड.

केसरीवरील दुसऱ्या खटल्याचें आजपर्यंतचें काम लोकमान्य टिळक यांनीं स्वतःचालविल्यामुळें लोकांकडून आश्रय मागण्याची जरूरी पडली नव्हती. आतां यापुढें प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करण्याचा शेवटचा उपाय करून पाहावा, असें कायदे जाणणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या हितचिंतकांचें ह्मणणें पडल्यावरून प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करण्याचें ठरविलें आहे. याकामीं सुमारें २०-२५ वीस पंचवीस हजार रुपये खर्च येइल असा अदमास आहे. एवढें ओझें केसरीवर टाकून मागणार नाहीं. ह्या फंडासंबंधानें खाजगी रीतीनें कांहीं रक्कम गोळा करण्यांत आली आहे.; पण कोणावरही विशेष ओझें पडूं नये, या हेतुनें हें विनंतीपत्र काढिलें आहे.

केसरीवरिल वर्गणीदारांनीं प्रत्येकीं १ रुपया जास्त देण्याचें मनांत आणलें तरी ही रक्कम सहज जमा हाण्यासारखी आहे. तरी केसरीचे वर्गणीदारांनीं व लो. टिळक यांजविषयीं ज्यांना सहानुभूती असेल त्यांनीं आपापल्या सोईप्रमाणें तावडतोब रक्कम पाठविण्याची मेहेरवानी करावी.

वर्गणी पाठविणें ती केसरी म्यानेजर पुणें किंवा राष्ट्रमत म्यानेजर मुंबई यांजकडे जमा करावी. जमलेल्या रकमेचा खर्च लो. टिळक यांचे स्नेही व सल्लागार मार्फत होईल; व पुरेशीं रक्कम जमतांच वर्गणी घेण्याचें बंद केलें जाईल.

नरसिंह चिंतामण केळकर.
कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर.

---

# वऱ्हाडसमाचार

आश्विन शुद्ध ३ शके १८०३

## तुर्कस्थानांतील रक्तपातहीन क्रांति.

तुर्कस्थानानें सर्व जगाला, विशेषतः युरोपियन राजकरणी पुरुषांना खरोखर आश्चर्यानें चकित केलें आहे. ' आसन्नमरण ' हें विशेषण तुर्कस्थानाला लावलेलें ऐकण्याचा प्रसंग अगदीं कालपरवापर्यंत येत असे. आणि मृत्युनंतर अवशेष राहिलेल्या प्रेताच्या तुकड्यांची वाटणी गिधाडांच्या समजांत कशा रीतीनें व्हावी याचाहि खल अगदीं थोड्या दिवसांपूर्वीपर्यंत राजरोसपणें चालत असे. पण गेल्या महिन्या दीड महिन्यांत तुर्कस्थानांत ज्या कल्पनातीत उलाढाली झाल्या त्यामुळें वरील प्रकारचे खल अजीबांत बंद पडले आहेत. या उलाढालींचा संबंध किंवा परिणाम एकट्या तुर्कस्थान पुरताच नसून सरसकट सर्व आशियाखंडांत जी कांहीं जागृति दिसून येत आहे तिचा एक भाग आहे असा जाणत्या गृहस्थांचा अभिप्राय आहे. आशियांतलि सर्व देशांना सारख्याच रीतीनें लागूं अशीं जीं कांहीं कारणें आहेत त्याचा परिणाम कोणत्याहि देशांत थोडाबहुत तरी झाल्यावांचून रहाणार नाहीं हें उघड आहे. पण तुर्कस्थानांतील उत्क्रांतीकडे पाहतां ' कर्त्यांवर ' हें बऱ्याच अंशानें अवलंबून राहील असें वाटतें. इराणांतील धडामोडीला अद्याप यश कां येऊं नये आणि तुर्कस्थानांत नेमका डाव पडावा, हें कां? याचें उत्तर तुर्कस्थानच्या उलाढालीच्या इतिहासाकडूनच मिळूं शकेल. दंग्याधोप्यावांचून ही क्रांति झाली कशी याचें सर्व जगाला आश्चर्य वाटत असलें आणि त्यामुळें ' तरुण तुर्क ' मंडळीचें सर्वांकडून कौतुक होत असलें तर त्यांत यत्किंचित्‌हि नवल नाहीं; कारण तुर्कस्थानांत घडून आलेला प्रकार खरोखरच अद्वितीय आहे. आपल्या पाठीशीं केवढी मोठी सत्ता आहे, केवढी पराक्रमी सेना आपल्या हेतूला साधक होण्याचा संभव आहे, हें माहित असूनहि विनाकारण रक्तपाताचा किंवा राष्ट्रांत घोटाळा माजविण्याचा मोह त्यांना आवरून धरतां आला! आणि यांत त्यांना यश आलें याचें कारण येवढेंच कीं आपला हेतु न्याय्य आहे, याचा त्याना पक्का भरवंसा होता. या भरवंशाच्या आधारावर ' तरुण तुर्क ' मंडळीनें आपल्या राष्ट्राला अवनतीच्या खोल दरींतून कीर्तीच्या उज्वल शिरावर कसें नेऊन ठेवलें याचें निरीक्षण करणें फारच बोधप्रद होणार आहे. ज्या तुर्कतरुणांच्या प्रभावामुळें आज सर्व जग चकित झालें आहे त्यांच्या उद्योगाविषयीं या पूर्वी फारच थोड्या लोकांना कल्पना होती आणि तीहि बरीचशी अस्पष्ट होती. फार तर काय, तुर्कस्थानच्या दरबारी गुप्त पोलिस खात्यांतील अत्यंत धूर्त लोकांनीं आपली शिकस्त केली तथापि या मंडळीचा बेत पुरता तयार होऊन शेवटाचा वार टळण्या जय्यत होईपर्यंत येवढासा देखील मागमूस सांपडला नाहीं. शेवटीं शेवटीं कांहीं थोडासा सुगावा गुप्त पोलिसास लागला, पण तेव्हां मंडळीच्या हेतूंत कांहीं बिघाड होणें अशक्य झालेलें होतें आणि कटाची बातमी फुटल्यामुळें तुर्कीतरुणांचें मंडळ दोन दिवस अगोदर राजरोस झाळें इतकेंच. या ' तरुणतुर्क ' मंडळीच्या उद्योगाला प्रथम पारिस येथें सुरवात झाली. तुर्की सरकारच्या रोषामुळें फ्रान्समध्यें अज्ञातवासांत राहिलेल्या कांहीं तुर्की गृहस्थांनीं आपल्या देशाची वास्तविक स्थिति कशी आहे हें स्वदेशबांधवांच्या मनांत बिंबविण्यापासून सुरवात केली. पण या कामाला पॅरिस हें ठिकाण प्रतिकूल ठरलें. तेव्हां सालोनिका येथें एक मुख्य मंडळ स्थापन होऊन वर सांगितलेल्या अज्ञातवासी गृहस्थाच्या कल्पनेच्या अनुरोधानेंच काम चालूं झालें. सैन्यांतील लोकांची या हेतुसंबंधानें कशी बुद्धि आहे याची चांचणी पहाण्यांत आली. पण हें कार्य इतक्या गुप्तपणें आणि दक्षतेनें झालें कीं तें करणारे जन्मतः राजकारणपटु आहेत अशी आतां खात्री होते. सर्व सैन्याचा अभिप्राय मिळवून ते आपल्या बाजूला वळतील असें करावयाचें हें काम किती जोखमीचें आहे व त्यांत क्षणोक्षणीं किती अक्कल लढवावी लागत असेल याची कल्पनाच करावी. त्यांतहि येवढ्या मोठ्या उद्योगांत इतकीं मनुष्यें असून अखेरपर्यंत ब्रहि बाहेर फुटूं नये याचें पाश्चात्यांना तर फारच आश्चर्य वाटलें आहे आणि ' हें फक्त आशियाटिकच करूं जाणत ' असे उद्गार त्यांनीं काढले आहेत. युरोपियनांच्या जिभांना वळवळल्यावांचून बिलकूल चैन पडावयाचें नाहीं, पण मितभाषणी तुर्कांना शेवटीं त्याच मुकस्तंभपणामुळें जय मिळाला. सैन्याचा पूर्ण आधार मिळावा अशी जय्यत तयारी करण्यांत आली होती, विशेषतः मॅसिडोनिया प्रांतांत असलेल्या सैन्यावर मंडळाची विशेष भिस्त होती. सैन्यांतल्या अंमलदारांना आपल्या हेतूची दीक्षा देऊन त्यांच्या करवीं आपलीं तत्वें सैन्यांत पसरविण्याचा धडाका चालू होता. अत्यंत गुप्त पद्धतीनें आपला व्यवहार चालूं ठेवणाऱ्या गुप्त मंडळ्या स्थापण्यांत आल्या. सैन्यांत मंडळाच्या हेतूचा प्रवेश कशा रीतीनें करण्यांत आला याविषयीं एकच उदाहरण पुरें आहे. नाझीमबे नांवाचा एक वैद्य राजकीय कारणावरूनच सालोनिका येथें अज्ञातवासांत होता. त्यानें धर्मोपदेशकाचें रूप घेऊन आशिया मायनर मध्यें प्रवेश केला. तेथें त्यानें कधीं चांभाराच्या तर कधीं दुसऱ्याच एखाद्या वेषांत राहून आपलीं मतें तेथील लष्करांत पसरविलीं. राजवाड्यांतील गुप्त पोलिसांना कांहीं तरी चाललें आहे असा संशय आला होता असें वाटतें; कारण कोणाहि संशयित मनुष्याला अटक करण्याविषयीं व त्याची झडती घेण्याविषयीं त्यांनीं परवाने मिळवून ठेवलेले होते. झाडेझडत्यांचा हेतु संशयित लोकांविरुद्ध पुरावा गोळा करणें हा होता हें उघडच आहे, पण तोपर्यंत तरुण तुर्क मंडळाच्या मतांचा प्रसार इतका झाला होता कीं कोठेंहि आणि कसाहि शोध केला तरी तो निष्फळ व्हावा. या प्रमाणें मिक्रडेतिकडे

तयारी झाल्यावर शेवटचा वार उडविण्याचा दिवस निश्चित करण्याचें मंडळीच्या मनांत आलें. सुलतान साहेबांचा येता वाढ दिवस ह्मणजे पुढील वर्षाची सप्टेंबरची पहिली तारीख हा दिवस प्रथम ठरलेला होता. मॅसिडानेयी प्रांतांतील ख्रिस्ती लोकांच्या संरक्षणासाठीं युरोपियन राष्ट्रांनीं आपल्या फौजा त्या प्रांतांत ठेवल्या होता. आपल्या राष्ट्राचा हा मोठा अपमान आहे असें वाटून तरुण तुर्क मंडळाला मॅसिडोनियाचा प्रश्न फार घोंटाळ्यांत घालून बसला होता. इतक्यांत तुर्कस्थानचा पॅरिस येथील वकील मुनीर पाशा हा अथेन्स व बेलग्रेड येथें येऊन गेला. या दोन्ही शहरीं अशी गप्प पसरली होती कीं मॅसिडोनियाचा कांहीं भाग तुर्कस्थान तोडून देत आहे. या वातमीमुळें आतां आपल्या कटाची शेवटची उठावणी दूरवर टाकणें बरें नव्हे असें मंडळास दिसून येताच त्यांनीं प्रारंभ केला. सालोनिकाच्या सेनापतीचा वध ही क्रांतीची खूण झाली. मध्यंतरीच्या हकीगती विशेष महत्वाच्या नाहींत. सैन्यांतील कोण कोण लोक फितुर आहेत याचा तपास करण्यावर एका कमिशनची योजना झाली. पण तें निरुपयोगीं ठरलें. रेसना येथें नियाझीबे यांनीं बंडाचें निशाण उभारलें होतें. तेथें तुर्कीसमाज, ऐक्य व प्रगति यांच्या नांवानें नव्या राज्यव्यवस्थेची द्वाही फिरविण्यांत आली. तरुणतुर्कांना इतक्या थोड्या अवधींत आणि इतक्या अनायासें यश आलें कीं हा सगळा भ्रांतिकृत चमत्कार आहे, ही भूल नाहींशी होण्यासहि थोडाच वेळ लागेल असें प्रथम लोक ह्मणूं लागले. पण तसें ह्मणणारे आपली वाणी खरी होण्याची वाट पहात आणखी कितीही काळपर्यंत बसले तरी त्यांना आतां यश यावयाचें नाहीं. तरुण तुर्कमंडळाचा हेतु सफळ झाला. या सर्व व्यवहारांत त्यांनीं स्वार्थ किती साधला ह्मणाल तर फुटक्या कवडीचाही नाहीं. नवीन राजघटींत कोणत्याहि अधिकाराची जागा तरुण तुर्क मंडळांतील सभासदांनीं पतकरली नाहीं पण सर्व राज्यव्यवस्थेचे खरे आधारस्तंभ 'तरुणतुर्क' आहेत यांत शंकाच नाहीं.

## अयाचकाला भिक्षा.

(अव्यवस्थित चित्तानां प्रसादोऽपि भयंकरः)

पहिला मनोविकार हा कीं मुंबई सरकारचे धन्यवाद गावेत तितके थोडे! राजश्री टिळक यांच्या जर्जर देहाला कांहीं सुख लागेल हें खरें. बंदिवासांतून राजश्री टिळक परत येण्याची आशा साध्या कैदेनें दृढतर झाली आहे. दुःखाच्या अंधकारांत सुखाचें किरण ही फारच फार आनंदकारक वाटतें आणि ह्मणूनच या सरकारी कृपेच्या वृष्टीबद्दल गांवोगांव लोक ईश्वराची प्रार्थना करीत आहेत. आशा ही गोड बोली आहे आणि आशेनेंच वाटतें कीं मुंबई सरकार कृपाघन बनून राजश्री टिळकांस बंधमुक्त करण्या इतकें दयाळू लवकरच होतील.

महात्मे टिळक यांची काळेपाण्याची शिक्षा बदलून तितक्याच मुदतीपुरती साधी कैद करून मुंबई सरकारनें जनतेचा आदर संपादण्याचा प्रयत्न केला आहे. प्रयत्न स्तुत्य आहे. राज्यकर्त्यांसंबंधानें प्रजेच्या मनांत जितका जास्त प्रेमभाव असेल तितका तो राज्यकर्त्यांना चांगलाच. मुंबई सरकारला हें तत्व कळून आलें हें ठीक आहे. त्यांची इच्छा त्यांच्या हिताची आहे यांत मुळींच संशय नाहीं, ती पूर्ण होणें न होणें आतां त्यांच्या स्वाधीन उरलेलें नाहीं. ज्या न्यायाधीशांनीं रा. टिळकांना सहावर्षें काळेपाण्याची शिक्षा सुनावली त्यांनीं सर्व गोष्टींचा— कायद्याचा व परिस्थितीचा—विचार करूनच आपला निकाल दिलेला होता असें सरकारतर्फे उत्तर देण्यांत आलें होतें याची या वेळेस आठवण होते. काळेपाण्याची शिक्षा किती वर्षें वयाच्या मनुष्यास देणें कायद्यानें शक्य आहे, त्या शिक्षेबरोबर दंडाची शिक्षा देतां येते किंवा नाहीं, वगैरे कायद्याचे भाग न्यायाधीशांना जास्त चांगले समजतात किंवा अमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांस ते विशेष अवगत असतात हा प्रश्न विशेषसा कठीण नाहीं. पण प्रस्तुतच्या प्रकरणांत मात्र हा प्रश्न मोठा घोंटाळ्याचा झाला आहे. न्यायाधीशानें न्यायाकरितां ह्मणून जें जें फर्माविलें त्यांतलें बहुतेक उग्र स्वरुप इतक्या थोड्या मुदतींत नाहींसें करणाऱ्या अधिकाऱ्यांना न्यायाची कांहींच मुर्वत ठेवावयाची जरूर वाटत नाहीं काय? असा सरळ प्रश्न करण्याचे सध्यांचे दिवस नव्हत. तथापि असें ह्मणतां येईल कीं अधिकाऱ्यांनीं राजकरणी धोरणाकरितां न्यायाधीशांच्या ठरावांत फरक केला. पण जनता हळूंच असें विचारील—आणि या पूर्वीं तिनें विचारलें होतेंच—कीं न्यायाचा परिणाम तुमच्या हुकमतीवर होऊं नये असें राजकरणी धोरणाकरितां तुह्मांस करतां येतें तर त्याच धोरणाकरितां न्यायाधीशापर्यंत तुह्मी जावयाचेंच नव्हतें. रा. टिळकांसारखे वयस्क आणि ढासळलेल्या शरीर प्रकृतीचे अनेक लोक आज तुरुंगांत आहेत, पण सरकार पदोपदीं न्यायाधीशांचें निकालांचा अंमल बदलीत नाहीं किंवा त्यांना पोटाशीं घेऊन हिंडत फिरत नाहीं. रा. टिळकांच्या बाबतींत सरकारनें आपली नेहमींची वहिवाट सोडली आहे, हें ठीक आहे. पण तसें करण्यापासून जी कांहीं फलप्राप्ति इच्छित असेल ती होणें आतां दुरापास्त आहे. रा. टिळकांना आपल्या निर्दोषपणाचा पक्का भरंवसा आहे. प्रिव्हीकौन्सिलमध्यें आपलें गाऱ्हाणें मांडून तेथें न्याय मिळविण्याची त्यांची सर्व तयरी झालेली आहे. तेव्हां मध्यंतरी हजार रुपये दंड परत झाला, किंवा काळेपाण्याची शिक्षा जाऊन साधी कैद झाली हें त्यांच्या दृष्टीनें सारखेंच आहे. निरपराधी मनुष्याला एक पळाची अटक देखील खपत नाहीं. आणि भोगावेंच लागल्यास कसल्याही कडक शिक्षेला तो डगमगत नाहीं. अशा न्याय प्रिय पुरुषांपैकीं रा. टिळक हे आहेत. त्यांनीं न्यायाच्या मंदिरांत देखील मेहेरबानीची वांच्छा केली नाहीं. ते त्या मंदिराबाहेरील अधिकाऱ्यांच्या मेहरबानीची किंमत काय करणार हें उघडच आहे. मग मुंबई सरकार हा मेहेरबानीचा बोजा त्यांच्या शिरावर ठेवण्यास हात धुवून त्यांच्या पाठीस लागलें आहे तें कां? मुंबई हायकोर्टाची स्थिति मात्र अगदींच अनुकंपनीय झाली आहे. पण तें अनियंत्रित सत्ताधीश असल्यामुळें अप्रिय असें कांहीं त्यांचे संबंधानें न लिहिणें हेंच बरें. मुंबई सरकारास मात्र प्रजेच्या कल्याणाचा मोठा उमाळा आलेला दिसतो. दगडांत डोकीं फोडून घेण्यास तयार झालेल्या लोकांची इच्छा मात्र पुरी करण्याची त्या सरकारची बुद्धि दिसत नाहीं. 'आह्मांला टिळक महाराज दाखवा' येवढें त्यांचें ह्मणणें देखील सरकारनें मान्य केलें नाहीं. लोक न्यायांत ढवळाढवळ करून आह्माला सुख द्या किंवा आमचें समाधान करा असें कधीं ह्मणत नाहींत. मात्र अन्याय करूं नका आणि न्यायांत फाजील ताणाताण करूं नका येवढेंच रास्त ह्मणणें त्यांचें असतें. न्यायाच्या दृष्टीनें रा. टीळक तुमच्या ताब्यांत रहाणें भाग असेल तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. पण एकवार त्यांचें आह्माला दर्शन करावा. येवढी भीक ज्यानीं जनतेला घातली नाहीं त्यांनीं रा. टिळकांवर आणखी कितीही मेहेरबानी केली तरी लोकांना ती काय होय? उलट मानी पुरुषाला मेहेरबानीमुळें जेवढें दुःख होतें तेवढें कशानेंही होत नाहीं. रा. टिळकांवर अशा प्रसंगीं मेहरबानी केल्यानें उलट दुःखावर डागण्या मात्र बसत आहेत. सरकार कर्तुमकर्तुं शक्तिमान नाहीं असें कोणीही ह्मणत नसतां येवढा फार्स होण्याचें कारण काय होतें तें कळत नाहीं.

## दिवाणी कज्जे दलाली.

तात्विकदृष्ट्या उपयुक्त अशा साधनांचा दुरुपयोग किती करतां येईल हें पाहावयाचें असल्यास दिवाणी कज्जेदलालींचे आंकडे फार उपयोगी पडतील. स. १९०६ मध्यें हिंदुस्थानांतलि सर्व कोर्टांत मिळून एकंदर— १८८०२०६ दिवाणी फिर्यादी दखल केल्या गेल्या. या सर्व फिर्यादींत दाव्याची रक्कम साडेतेहतीस कोटि रुपये आहे. या पैकीं ३११०३९ फिर्यादी ह्मणजे एकंदर आंकड्यांत शे. १६.६ इतक्या फिर्यादि दहा रुपयांच्या आंतील रकमेबद्दलच्या आहेत. दहा रुपयांपेक्षां जास्त पण पन्नासांपेक्षां कमी इतक्या रकमेबद्दलच्या फिर्यादी ८१८९७४ ह्मणजे शें. ४३.७ आहेत. ह्मणजे वर सांगितलेल्या एकंदर फिर्यादी पैकीं सुमारें शें. ६० फिर्यादी ५० रुपयांपेक्षां कमी रकमेबद्दलच्या आहेत. ५० पासून १०० रु. पर्यंतच्या फिर्यादी शें. १८ या प्रमाणांत आहेत. रु. १०० पासून ५०० पर्यंतच्या ३३८०१० आहेत. ह्मणजे हिंदुस्थानांतील दिवाणी कोर्टांत दाखल होणाऱ्या फिर्यादींत शें. ९७ फिर्यादी पांचशें रुपयांच्या आंतील रकमेबद्दच्या आहेत. ह्मणजे सरासरीनें ज्यांची रक्कम रु. १० पेक्षां जास्त नाहीं अशा ३११०३९ फिर्यादी कोर्टांटात दाखल झालेल्या आहेत. इतक्या फिर्यादींची सुनावणी होऊन त्यांचा अखेर निकाल लागण्यास किती त्रास पडत असेल व किती काळाचा व्यय होत असेल याचा पक्का हिशेब काढतां येईल तर या यापेक्षांहि मन जास्त व्यग्र होईल. एकापेक्षां अधिक वादी व प्रतिवादी बहुधा प्रत्येक फिर्यादींत असावयाचे. शिवाय प्रत्येक कज्जांत साक्षिदार, वकील, वकिलांचे मध्यस्थ, कारकून हे असल्या खेरीज गत्यंतरच नाहीं. ह्मणजे प्रत्येक कज्जांत किमानपक्ष पांच माणसें आहेत अशा हिशेबानें पाहिलें तरी सुमारें पंधरा लक्ष लोक या कज्जेदलालींत गुंतलेले दिसून येतात फिर्यादी किती लांबणार याचा नेमच नाहीं. येवढे लोक या निरर्थक उद्योगांत गुंतलेले असतात त्या पेक्षां या फिर्यादी कोर्टांत न नेतां आपसांत तुटल्या असत्या तर बरें झालें नसतें काय? बरें फिर्यादीची रक्कम तरी मोठी असती तर कांहीं ह्मणतां आलें नसतें. दहा रुपयांचा वाद आपसांत तुटूं नये इतका हिंदुस्थानांतील लोकांचा परस्परावरील किंवा गांवांतील चार संभावीत लोकांवरील विश्वास उडावा ही केवढी शरमेची गोष्ट आहे! सरकारनें दिवाणी कोर्टें ठेवलीं. हा त्यांनीं अपराध केला कीं काय? उठल्या बसल्या दमडी अधेल्या करतां फिर्यादी चालविण्याला लोक प्रवृत्त होतात त्यांत शेवटीं अनहित कोणाचें आहे हें लोकांच्या ध्यानांत अद्याप येत नाहीं हें केवढें आश्चर्य आहे! सरकारला शिक्षणाकडे किंवा इतर लोकोपयोगी कामांकडे जास्त पैसा खर्चवत नाहीं याचें कारण दिवाणी कोर्टांसारखीं खातीं चालूं ठेवावीं लागतात. पण लोकांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं एकीकडे शिक्षणावर जास्त खर्च करा ह्मणून ओरड करावयाची व दुसरीकडे दिवाणी कोर्टें जास्त जास्त निघण्याला तयारी करून द्यावयाची किंबहूना तसें होण्याची आवश्यकता उत्पन्न करावयाची हा शहाणपणा कोठचा? सरकारी कोर्टांवर प्रजेपासून वसूल केलेल्या करांतून खर्च होत असला ह्मणून कोर्टें कज्जेदलालांच्या फिर्यादी विनखर्चानें थोडीच दाखल करून घेतात! तेथें स्टांपाच्या रूपानें फी द्यावीच लागते. इतकेंच काय, पण या कोर्टांत ज्या करारांवरून किंवा कागदपत्रावरून फिर्यादी घेतल्या जातात त्यांवर देखील फीची दक्षणा आरंभीं द्यावीच लागते. पैशाचा दुबार व्यय होऊन पुनः लोकांना समाधान नाहीं तें नाहींच. अव्वल कोर्टाच्या निकालावर वरिष्ट कोर्टांत अपील लावण्याची तजवीज वास्तवीक सोईची आणि न्यायाची आहे. पण कज्जेदलालींत निर्ढावलेल्या लोकांना दोनदांच काय पण पंचवीसवेळां अपील करण्याची मोकळीक ठेवली तरी देखील त्यांचें समाधान होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. दिवाणी कोर्टांत हरघडीस जाऊन उमे रहाण्याची आमच्या लोकांना लागलेली चटक ज्या दिवशीं नाहींशी होईल तो सुदिन.

## स्थानिक स्वराज्याचा आढावा

स्थानिक स्वराज्य या नांवाखालीं जे कांहीं एक खातें आहे त्या संबंधाचे आं-

फडे बरेच उपयोगी असतात. स. १९०६-०७ मध्यें हिंदुस्थानांत एकंदर २७१० म्युनिसिपालिट्या होत्या. ह्मणजे शे. ७ इतकी वस्ती म्युनिसिपल हद्दींत रहाते. म्युनिसिपासिट्यांची संख्या गेल्या पांच वर्षांत कमी कमी होत गेलेली आहे. सर्व म्युनिसिपालिट्यांची सरासरी काढली तर लोकनियुक्त प्रतिनिधींचा संख्या निम्याचे जवळजवळ आहे. सर्व म्युनिसिपालिट्यांत मिळून बिनसरकारी व सरकारी सभासदांचें प्रमाणें ३.१ असें पडतें. जातवारीप्रमाणें पाहिलें तर शें. १३ सभासद परदेशीय असून बाकीचे देशी आहेत. कलकत्याच्या म्युनिसिपालिटींत तर देशी सभासदांपेक्षां युरोपियन सभासदांची संख्या जास्त आहे. साधारणमानानें दरएक म्युनिसिपालिटीचें उत्पन्न सुमांर रु. ४४६३१ आहे. ऑक्ट्रॉय ड्युटीचें उत्पन्न बाकीच्या सदरांपेक्षां बहुतेक प्रांतांत जास्त आहे. दर वर्षी दरमाणसीं रु. २४ इतका म्युनिसिपल कर साधारण मानानें पडतो. त्यांत मुंबइचा नंबर पहिला लागतो. तेथील म्युनिसिपालिटी दर माणसीं रु. १०-६९ कर घेते. प्रांतानिहाय पाहिलें तरी मुंबई इलाख्याचाच नंबर सर्वांत वर आहे. पण निरनिराळ्या प्रांतांच्या कराच्या मानांत विशेषसा फरक नाहीं. म्युनिसिपालिट्याकडून प्रतिवर्षी रु. ९.६१ ( कोटी ) खर्च होतो. या पैकीं शें. १९.८ शहरसफाई, १३.९ रस्ते वगैरे कामें, ७.७ मोऱ्या गटारें, १०.१ पाणी, ९.७ शिक्षण व १०.१ साधारण कामकाज यांवर खर्च होतो.

## बहिष्कार

बहिष्कार हें अग्निरूप अस्त्र आहे. त्याची सर्व शक्ती निश्चयावर, करारीपणावर व काटकपणावर अवलंबून आहे. याचा प्रयोगहि कालवेल पाहून केला पाहिजे. स्वदेशीचा विजय होण्यासाठीं तें शस्त्र अवश्य हातीं घेतलें पाहिजे ही आमच्या राजकर्त्यांच्या जुन्या इतिहासांतील मुख्य गोष्ट होय. आपलेपणा उज्वल करण्यासाठीं, आपलेपणानें सर्व जग आपलेसें करण्यासाठीं, आणि आपलेपणानेंच दुसऱ्याचा परकीयपणा मोडून टाकण्यासाठीं बहिष्काराचा स्वीकार अवश्य केला पाहिजे. बहिष्कार विलायती वस्तूसाठीं पाहिजे ह्मणजे विलायतीचा सुंदरपणा गौरवानें आपल्या स्वदेशीमध्यें आपोआप उतरेल. विदेशी व स्वदेशी हे भेद अगोदर फार जागृत केले पाहिजेत आणि कालांतरानें हे भेदच मित्रभावाला कारण होऊन सार्वत्रिक आप्तभाव प्रसृत करितील. दोन योद्धे कुस्ती करितात आणि जेव्हां त्यांचा सामना अगदीं तोलास तोल देऊन होतो तेव्हां त्यांच्यामध्यें प्रेमभाव जडतो व एकमेक परस्परांस आदरानें, आदबीनें व सौजन्यानें लेखूं लागतात. हीन, लघु व निर्बळ एका बाजूला; आणि प्रबळ, गुरु व तेजस्वी दुसऱ्या बाजूला या दोहामध्यें साम्य नाहीं आणि ह्मणूनच दोघांची मैत्री जुळणेंच नाहीं. तसा प्रकार हिंदी प्रजा व ब्रिटिश सरकार यांच्यामध्यें अनुभवाला येतो. सर्व इंडियनांची मनोदेवता सांगते कीं हा नेभळेपणा आह्माला पाताळांत तिमिरामध्यें लोटून देत आहे. आपल्या पायावर आह्मी उभे राहण्याला शिकलें पाहिजे आणि त्यासाठीं या विलायती व्यापारी पांगुळ गाड्याला फारकत दिली पाहिजे. बहिष्काराचें तत्व असेंच आहे. विलायती नको असें नाहीं तर आपल्याच देशाची आह्माला विलायत बनवावयाची आहे. विलायतीचा तिटकारा नाहीं तर आपल्या हीनदीन दशेचा कंटाळा आला असून आह्मी पराक्रमानें रावणी विलायती सनदा आमच्या देशांत समुद्राप्रमाणें खेळविणार आहों. बहिष्कार ह्मणजे या नव्यां प्रयत्नाची ही अग्नीची भट्टी आहे. यांत आपल्या देशाची अशोधित स्वदेशी टाकली ह्मणजे ती बावनकशी सोनें बनेल. विलायती वस्तूंचें रमणीय सौंदर्य आमच्या देशाच्या सोन्याला येतें किंवा नाहीं हें पाहण्याचा प्रयत्न चालू आहे. सिंहीणीचें दूध पिण्याला व तदनुरूप स्वदेशी तालीमबाजी आह्मी सुरूं केली आहे. यांत आपण जीव धरला, डोंगर चढून शिखरावर गेलों आणि तेथें सूर्यप्रकाशांत आपण तेजस्वी झालों तरच आपण विलायती सिंहाबरोबर मित्रभावानें, ब्रिटिश प्रजेच्या मर्दुकीनें व साम्राज्याच्या वैभवानें नांदू लागूं. विलायती उत्कृष्ट नमुना पुढें ठेऊन तन्मय ' तद्रूप व सर्वंकष असा स्वदेश उभा करण्याचा प्रयत्न ह्मणजे बहिष्कार होय. बहिष्कारानें विलायतची चीड येत नाहीं, उलटें विलायतेचें खरें महत्व डोळ्यापुढें खेळूं लागतें, परगुणाचें चीज करण्याची महत्वाकांक्षा उद्भवते आणि स्वदेशी व विलायती हा आपपरभाव सरकारला विसरावयाचा प्रसंग संनिध संनिध येत आहे. बहिष्कार विलायतेलाच गुरु करितो विलायतेच्या अग्रस्थानीं स्वदेशीला वर उचलून नेतो, आणि ईर्षा, महत्वाकांक्षा व प्रतिष्ठा यांतील सद्गुणांचें सर्वस्व स्वदेशी मध्यें प्रचलित करितो. ईश्वरी उत्क्रांतीचा पहिला नियम हाच आहे कीं आपलेच पाय खंबीर लागतात आणि तसें ते कार्यक्षम होईपर्यंत दुसऱ्याचा आधार जवळ असूनही आपण तो आधार दूरच ठेवितो. असा हा बहिष्कार कांहीं कालपर्यंत विलायतीला दूर ठेवील पण स्वदेशीला इतकी खंबीर करील कीं विलायतही त्यामुळें फार उच्चतम पदवीला व श्रेष्ठ गौरवाला चढेल. या दृष्टीनें बहिष्काराचा आश्रय इंडियनांनीं केला आहे. राजकीय प्रगतीची ही पहिली पायरी आहे; आणि तिच्यावर चढून आह्मी राजकर्त्यांच्या आदराला व सत्काराला पात्र होऊं इच्छितों.

## बहिष्काराची अमर्यादा

बहिष्कार जितका चांगला तितका तो विकर्मी लोकांच्या हातीं वाईटही आहे. ज्या बहिष्काराच्या मूळाशीं महत्वाकांक्षा नाहीं व स्वकीय प्रगतीकडे लक्ष्य नाहीं तेथें बहिष्काराचे ईश्वरी गुण लोपले ह्मणून समजावे, व अशा कृत्यांतील जयश्रीही मनुष्याला पतित व घोरकर्मी करिते. बहिष्कारा संबंधानें अशी अमर्यादा आमच्या शहरीं दृष्टोत्पत्तीस येतें. येथील श्रीराम नाटक गृहाला बहिष्कार कांकीं त्याचा ट्रस्टी सद्गृहस्थ ' राष्ट्रीय मंडळा ' च्या व्याख्यानांस आपली इमारत देत नाहीं. न देण्याचें कारण सर्वश्रुत आहे. सरकारी अमान्यतेची छाया राष्ट्रीय मंडळावर पडत चालली आहे. त्या बहिष्कृत नाटकगृहांत नाटक करणारी 'महाराष्ट्र नाटकमंडळी' वरही देखील बहिष्कार कांकीं मुष्टिफंडाच्या भिक्षेला ते खेळ देत नाहींत! असे बहिष्कार घालणें ह्मणजे बहिष्काराची अनवस्था होय. यांत पडलेली मंडळी चांगली सूज्ञ आहेत पण मनुष्य एकदां मात्सर्यानें शहाला पडला व त्यांत त्याला थोडासा जय आला ह्मणजे त्याचा बरेवाईटपणा तो अगदीं विसरून जातो. नाटकाला जाऊं नका असा सक्तीनें उपदेश होऊं लागला तेव्हां करमणुकीच्या गोष्टीकडे साहजिकच लोकांनीं डोळा वक्र केला. सध्यां ह्या दीव्य बहिष्कारामुळें मंडळी एकवटून गेली आहेत त्यांच्या मधील ओजस्विता नाहींशी होईल असे अप्रयोजक प्रयोग पुनः दृष्टीस पडणार नाहींत असा आह्मी भरंवसा बाळगतों. 'श्रीराम' थिएटरवरील बहिष्कार व नाटक मंडळीवर बहिष्कार हे आह्मी पोरखेळ समजतों. कधीं कधीं अशा खेळामधून देखील पुष्कळशा गोष्टी विकोपाला जातात आणि तसलाच प्रकार येथील 'राष्ट्रीय मंडळानें' घडवून आणिला ही दुःखाची गोष्ट होय. चांगलीं कार्यें फारच थोडीं घडत आहेत आणि त्यांमधील तत्संबंधी कार्यशक्ती निरर्थक गोष्टीकडे खर्चली जाऊं नये ह्मणून आह्मी ही सूचना आग्रहानें मुद्दाम करीत आहों. आतां तें नाटकगृह बंद आहे आणि नाटकवालेहि गेले आहेत. तेव्हां डोकीं शांत ठेऊन आमच्या आक्षेपांचा विचार राष्ट्रीय मंडळांतील पुरस्कर्त्या चालकांनीं करावा. नवीन तरुण पिढी नुकतीच बहिष्काराच्या सोज्वल कृतीला प्रवृत्त होते आहे अशा वेळीं अशा बेलगामी कार्याकडे त्यांची दृष्टी न वळेल तर बरें. राजश्री टिळकासारख्यांच्या नामम- हिम्यानें या चळवळी चालू आहेत तर त्यांच्या मार्गांत हीं विघ्नें परंपरा न आणण्याविषयीं त्या बाबतींत पुढाकार घेणाऱ्या देशभक्तांनीं फारच खबरदारी घेतली पाहिजे. हा अग्नीशीं खेळ आहे हें ओळखून आप्रणींनीं वागलें पाहिजे.

## सद्वर्तन

चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन घेण्याचा प्रघात कायद्यानें प्रतिष्ठित आहे. जामीनकीचा उपाय प्रतिबंधक आहे आणि गुन्ह्याकडे प्रवृत्ति असलेल्या गृहस्थांकडून हे जामीन घेत असतात. हल्लींच्या काळीं या कलमाचा परिघ पुष्कळसा वाढविला असून राजद्रोहाचीं संभाषणें करण्यांवर या नव्या कलमाचा कटाक्ष फार जोराचा आहे. जे सार्वजनिक भाषणें करितात आणि ज्यांच्या भाषणा मधून कायद्याच्या मर्यादा उल्लंघल्या जातात त्यांच्या कडून जामीन घ्यावा आणि त्यांच्या तोंडाला खीळ घालावी असा मूळचा हेतु आहे. जामीन मोठ्या रकमेचे मागितले ह्मणजे कित्येकांस तुरुंगाचा दरवाजा पतकरावा लागतो. वर्तमान पत्रकारामागें १२४ (अ) पिनलकोड हात धुवून लागलाच आहे. भाषणाची बंदी या जामीनकीच्या कलमानें होते. राजद्रोहाला इंडियाच्या साता समुद्रा पलिकडे हद्दपार करण्याचा सरकारचा विचार आहे आणि तो झपाट्यानें चालू आहे.

खामगांवचे रा. व्यास यांच्यावर सध्यां बुलडाण्यास खटला चालू आहे. व आकोल्यास रा. पुरोहित यांचा खटला आज सुरूं होणार आहे. उमरावतीचे डेप्युटीकमिशनर यांनीं तेथील रा. वामनराव जोशी यांच्या पासून जामीन व जात मुचका मागितला आहे. आणि यवतमाळचे डॉ. रा. रा. नरहर शिवराम परांजपे यांच्यावरही अशाच प्रकारचा खटला चालू करण्यांत आला आहे. या तीन्ही खटल्याचा निकाल होईपर्यंत सध्यां आह्माला कांहीं अधिक लिहितां येत नाहीं.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—पाऊस नसून ऊन चांगलें कडक पडतें. सध्यां पीकें उत्कृष्ट जोमावर असून हिरवीगार सृष्टी फार रमणीय दिसते. एकंदर पर्जन्य ३२।३१ इंच झाला. थोडी थंडीही पडूं लागली आहे.

प्लेग—सार्वजनिक आरोग्य डळमळूं लागलें आहे. उमरावती व खामगांव येथें प्लेगाचा धडाका चालू आहे. आकोल्यास उपसर्ग लागूं होण्याचा काल समीप येत चालला आहे. आकोटास प्लेगाचे मृत्यु कांहीं झाले. खेडींपाडीं अद्याप सुरक्षित आहेत. शरदृतु हा आरोग्याला जसा परिपोषक तसा प्लेगालाहि बलवर्धक आहे कीं काय न कळे!

ता. १२ रोजीं संपणाऱ्या अठवड्यांत खालील प्रमाणें प्लेगाचे मृत्यु झाले.

| प्लेगानें. | लागले. | मेले. |
|---|---|---|
| आकोला. | ४ | १ |
| उमरावती | ७६ | ७४ |
| खामगांव | ७६ | ४६ |

देशसेवकचे संपादक रा. रा. अच्युतराय कोल्हटकर बि. ए. एलएल बी यांच्या वरील राज्यद्रोहाचा खटला सेशन कमिट करण्यांत आला.

हिंदिकेसरीचे संपादक रा. रा. माधवराव सप्रे यांच्या वरील राज्यद्रोहाचा खटला ता. २ नोव्हेंबर रोजीं सेशन कोर्टासमोर चालू होईल.

हे सेशन खटले करण्यापेक्षां आरोपीचे जामीन घेऊन मोकळें करणें विशेष बरें झालें असतें. या बाबतींत आह्मी वऱ्हाडच्या अधिकाऱ्यांचें अभिनंदन करतों.

वर्षाव—येथील मारुतीच्या पटांगणांत या आठवड्यांत व्याख्यानांचा एकसारखा वर्षाव होत आहे. रा. पुराणीक व रा. शिवरामभाऊ ओक यांनीं एकंदर चार व्याख्यानांचा लाभ अकोलेकरांस करून दिला.

ईशप्रार्थना— श्री मारुती समोर राजश्री टिळक यांचें काळेपाणी बदलून साधी कैद केल्याबद्दल ईश्वराची प्रार्थना गेल्या बुधवारीं रात्रौ करण्यांत आली.

" यंदा वऱ्हाड शिक्षक समाजाची बैठक अकोला येथें व्हावयाची असून ती ता० [illegible] आक्टोबरला सुरू आहे. त्या समारंभाकरितां टाऊनहॉलची मागणी केली आहे.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं येथील व्यापारी रा. रा. नयमल सोमाणी मारवाडी यांस काळज्याच्या विकारानें एकाएकीं गेल्या शनिवारीं देवाज्ञा झाली.

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस—
सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप रायी ( ग्वालेर ) | श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

**सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.**

स्थापना सन १९०७

**भांडवल एक लक्ष रुपये.**

**प्रत्येक भाग २५ रुपयाचा याप्रमाणें एकंदर भाग ४०००.**

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदहू कंपनीचें मेमोरेंडम व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून

**पी. सी. जोगळेकर आणि कंपनी म्या. एजंटस्**

नं. १३


## दवाखाना.

आमचे दवाखान्यांत सर्व तऱ्हेच्या वनौषधी, मात्रा, गुटिका, चूर्ण वगैरे विक्रीस तयार आहेत. बाळांतरोग, गर्मी परमा, मुळव्याध, कवळ, पानथरी, हरतऱ्हेचे हिवताप इ. रोग कळविल्यास परिक्षा करून अनुभवीक औ[षधे] माफकदरानें पाठवूं. घरीं बोलविल्यास वेगळी फी घेतली जाईल. गजकर्ण मलम ।= बाटली ५९.

**शिवचरणगीर रामगीर वैद्य,**
कुरणखेडकर
दवाखाना शहर आकोला

दोन घडयाळें एकदम बोलाविणारांस पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिशया बोलविणाऱ्यास रा. भिस्टम घडयाळ बक्षीस सारखेंच मुधा शिशीस ।.



रासकोप सिस्टम . किं रु. ३। स्वदे पेटंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वली रु. ४। आठ दिवसाच्या किल्लीचें खिशातील घडयाळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

के. मुरा. आणि कं.
मुंबई पोस्ट नं. ९

नं. ४७

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्या वेळांत आणि उत्तम रीतीनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. व हेर गांवच्या लोकांकडून रेलवेभाडें व जे वग खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.
सायकल टीचर.

पत्ताः----
अहमद अली कासमजी बोहरा
आकोला ( शहर )

नं ४८ इं. ७

नाहि सत्यात् परोधर्म

# येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेर गांवी पाठवित असतो माल खात्रीचंद माफक दरानें व योग्य अटतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व वक्तशिर पाठवीला जाईल. आह्मांस शेकडो पत्र आली आहेत.

पत्ताः—
**श्रीनिवास बाळकृष्ण हां[डे] जनरल मर्चंट व कामशन एजंट.**
येवले.

नं ७२


## नोटीस

या नोटीशीनें कारंजा म्युनिसिपाल्टिचे हद्दींत राहणारे सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, सन १९०८ व १९०९ इसवी सालाबद्दल घरपट्टीच्या ठरावाच्या याद्या तयार झाल्या असून त्या म्युनिसिपल ऑफिसांत पहाण्याकरितां ठेविल्या आहेत. सदहू याद्या ऑफिस उघडें असल्याचे वेळीं पहाण्यास मिळतील ज्या कोणा इसमास वरील पट्टीचे आकारणी बद्दल तक्रार करणें असेल तीं त्यानें सदहू नोटिशीचे तारखेपासून एका महिन्याचे आंत कमेटीचे ऑफिसांत लेखी करावी.

कारंजा

ता० १९-९-१९०८

R. M. Dongoanker

सेक्रेटरी
म्यु. कमीटी कारंजा

नं. घ. ४०

## नोटीस

नोटीस बेशमी जैराम वल्द शिवराम वहीले कुणबी राहणार पिंपळगांव राजा तालुके मलकापूर यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमच्याशीं पाट केल्यास २ दोन महिने झाले त्यानंतर १ महिना पावेतों तुमचे घरीं होते नंतर तुह्मी माझे अंगावरील दागीने काढून घेऊन मला घरांतून काढून दिले. तुह्मी लोकाच्या नादीं लागून जिनगीची अफरातफर करण्याच्या विचारांत आहांत करितां माझ्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी मला ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत आपले घरीं घेऊन जावें व आणखी कळवितें कीं तुमच्या हिश्यास आलेली सर्व स्थावर जंगम इस्टेटेची मालकीण तुमचे पश्चांत मी आहे. करितां तुह्मी जिनगी गहाण खरेदी वगैरे कोणास देऊं नये. दिल्यास तें रद्द असें कळावें ता० २३-९-०८

सही

माणकाई मर्द जैराम वहिले कुणबी निशाणी हातची बांगडी वस्ती पिंपळगांवराजा तालुके मलकापूर

नं. घ. ४१

## नोटीस.

नोटीस बेशमी चुन्नीलाल मुलचंद पलीवाल ब्राह्मण रा. सुनगांव ता. जळगांव पो. सुनगांव यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मेहेरलाल चुन्नीलाल या दुकानचा मालक मेहेरलाल पन्नालाल हा असून हल्लीं तो मयत झाला आहे. त्याची हल्लीं वारस मी आहे. त्या संबंधानें तुह्मास नोटिशीनें कळविलें तें खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ तुमचा माझा संबंध कांहींच नाहीं. कारण तुमच्यांत व माझ्यांत ४ पिढ्यांचें अंतर आहे. तरी वारसाचा हक्क होत नाहीं. आणि मयत मेहेरलाल यांनीं मरते समयीं मजला दत्तक घेण्याची परवानगी दिली आहे.

२ मेहेरलाल हे देहांत असतांना सुनगांवचे दुकान संबंधी हिस्से वगैरे करून सुनगांव हें एकट्यांनीं घेतलें आहे. त्या मोबदल्यात तुह्माला **नगदी रुपये दिले व याबद्दल** आमचे जवळ लेख आहे. व सुनगांव येथील दुकान, शेतें वगैरेचा सर्व हक्क आमचा आहे. वरील कारणावरून तुमचा व आमचा कांहीं संबंध राहीला नाहीं. तुमचा कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. वरून नोटिशीनें कळविलें जातें कीं तुह्मी कजबे सुनगांव येथील दुकानदारीचे नात्यानें कोणतेंच प्रकारची वहिवाट करूं नये. व दुकानचे नांवावर कर्ज वगैरे काढूं नये. तुमचीं कोणतेच प्रकारची मालकी नाहीं व मेहेरलाल यांचीं जीं शेतें गांवोगांवीं आहेत त्यांचा लागवण वगैरे वसूल करूं नये व शेतें वगैरे गहाण किंवा खरेदी देऊं नये. गहाण व खरेदी करून दिल्यास तें रद्द समजलें जाऊन तुमचेवर फौजदारी केली जाईल. व कोर्टांत जमा असलेले पैसे घेऊं नये. तसेंच तुह्मी तुमची दुकानांत मालकी नसतां तुह्मी तीन इसमास मुखत्यार पत्र करून दिलें तें रद्द असें. तुह्मी आमचे इस्टेटी वगैरे संबंधी कारवाई कराल तर तुमचेवर फौजदारी केली जाईल. व दुकानचे नांवावर कर्ज वगैरे काढूं नये. ही नोटीस दिली सही. ता. २० माहे सप्टेंबर सन १९०८ इ. मु. सुनगांव

सही

गंगाबाई जवजे मेहेरलालजी
मारवाडी दुकान सुनगांव
मु० तर्फे खंडेराव शंकर

नं. घ. ४२ द. खुद्द.

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं कजबे सुनगांव येथें मेहेरलाल चुन्नीलाल या नांवाचा दुकानचा मालक मेहेरलाल पन्नालाल आहे तो हल्लीं मयत झाला आहे. वरून जाहिर नोटीस देण्यांत येतें कीं त्याचा चुलत पुतण्या चुन्नीलाल मुलचंद मारवाडी याशीं कोणी देवघेव करूं नये. त्याचा वारस वगैरे संबंधी हक्क राहीला नाहीं- सुनगांव येथील दुकानदारीची मयत मेहेरलाल यांनीं पूर्वीच हिस्से वगैरे करून आपसांत लेख झाले आहेत. व आमची अनामत वगैरे ज्या दुकानीं असेल ती वरील इसमास देऊं नये. दिल्यास तुमचे पासून रितीप्रमाणें घेतली जाईल. सदर इसमानी या दुकानचे नात्यानें देवघेव केल्यास रद्द **समजली जाईल. ही नोटीस दिली सही ता. २०-९-१९०८ इ. मु. सुनगांव**

सही

गंगाबाई जवजे मेहेरलालजी
मारवाडी दुकान सुनगांव
ता. मलकापूर तर्फे मु०
खंडेराव शंकर

नं. घ. ४३

## आर्यवनौषधालय मुर्डी

हाईनेस व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल याजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमचीं औषधें वारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सार्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंबक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होतें. ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसात एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातूपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुत्राची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. वाळंतरोग, मधूमेह जुनाट परमा, मुष्टीमैथूनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दर:-एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६९ गो. ४ रु. २७९ गो० ६ रु. ५९० गो० रु.

२ अपूर्व नेत्राजनः—यानें वडस, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, च इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें जनन खर रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुताची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूडः—दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे .

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ७ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठींस मलम, पात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागव तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म धातू. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

### अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका जो धंदा केला त्यांचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावे आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो पूर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास घोले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करित असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMBAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if I ; miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay nd terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising brough decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others* mploying a portion of their annual income or profits in effecting f,, once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he di seearly, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes huppismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained n application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

No. 2

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें